Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com
* वर्ष ५४ * अंक १५७ * * नागपूर * | रविवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## मध्यप्रदेशात १०० गावांचा संपर्क तुटला

■ **वृत्तसंस्था, कोलकाता दि. १४:**
मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर-चंबळमध्ये आसन, क्वारी, सिंध आणि चंबळ नद्यांना उधाण आले आहे. अनेक ठिकाणी पूल आणि पुलांवरून पाणी वाहत आहे. त्यामुळे १०० हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. मुसळधार पावसामुळे मुरैना येथे ट्रॅक्टर-ट्रॉली नाल्यात पडली. त्यात ३ जण वाहून गेले. एकाची सुटका करण्यात आली, तर इतर दोघांचा शोध सुरू आहे. त्याचवेळी धर्मपुरा येथे एका ६ वर्षाच्या मुलाचा बुडून मृत्यू झाला. उत्तर प्रदेशात मुसळधार पावसामुळे ४८ तासांत २१ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात अनेक ठिकाणी गंगेच्या पाण्याची पातळी वाढत असून, अनेक नद्यांना उधाण आले आहे.


# तीन कुटुंबांनी जम्मू-काश्मीर उद्ध्वस्त केले

■ **वृत्तसंस्था, डोडा, दि. १४:**
जम्मू-काश्मीरला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी घराणेशाहीने उद्ध्वस्त केले. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्यावर जे केले ते पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत, असा घणाघात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला.

जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदी शनिवार १४ सप्टेंबर रोजी डोडा येथे पोहोचले. रॅलीला संबोधित करताना ते पुढे म्हणाले, आम्ही आणि तुम्ही मिळून सुरक्षित काश्मीर बनवू, ही मोदींची हमी आहे. यावेळी जम्मू-काश्मीरच्या निवडणुका भविष्याचा फैसला करणार आहेत.

या रॅलीतून मोदी चिनाब खोरे, डोडा, किश्तवाड आणि रामबन या तीन जिल्ह्यांतील ८ विधानसभा जागांवर भाजप उमेदवारांना मतांचे आवाहन करणार आहेत. १८ सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्यात या ८ जागांसह २४ जागांवर मतदान होणार आहे.

**पीडीपी, काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्सवर मोदींचा निशाणा**



परिवारवादाबद्दल मोदी म्हणाले, जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक तीन कुटुंब आणि जम्मू-काश्मीरच्या तरुणांमध्ये आहे. एका बाजूला तीन कुटुंबे, तर दुसऱ्या बाजूला स्वप्ने घेऊन निघालेली तरुण मंडळी. एक कुटुंब काँग्रेसचे, एक कुटुंब नॅशनल कॉन्फरन्सचे आणि एक कुटुंब पीडीपीचे आहे. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्याशी जे केले ते पापापेक्षा कमी नाही.

दहशतवादावर मोदी म्हणाले, जम्मू-काश्मीरमधील तीन कुटुंबांनी येथे फुटीरतावाद आणि दहशतवादासाठी मैदान तयार केले. याचा फायदा देशाच्या शत्रूंनी घेतला. त्यांचा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय चालू राहावा यासाठी हे लोक दहशतवादाला खतपाणी घालत होते. त्यांच्या गुन्ह्यांमुळे आमच्या मुलांना जीव गमवावा लागला.

## गणपती बाप्पांना काँग्रेसने अटक केली

### मुख्यमंत्री शिंदे यांची टीका, कर्नाटकमधील घटनेचा दाखला

■ **वृत्तसंस्था, धाराशिव, दि. १४:**
काँग्रेसने गणपती बाप्पांना अटक करण्याचे काम केल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी कर्नाटकमधील एका घटनेचा दाखला देत महाविकास आघाडीवर निशाणा साधताना केली. काँग्रेस हे पाप कुठे व कसे फेडणार? असा सवालही त्यांनी यासंबंधी उपस्थित केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी धाराशिव येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात शिंदे यांनी महाविकास आघाडीवर उपरोक्त टीका केली. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राजकारण करणाऱ्या लोकांनी कर्नाटकात गणपती उत्सव बंद करण्याचे काम केले. काँग्रेसने कर्नाटकात गणपती बाप्पाला अटक करण्याचे काम केले. गणेशोत्सवात गणपती बाप्पांसोबत त्यांनी हे काम केले. ते हे पाप कुठे फेडणार?



एकनाथ शिंदे यांनी यावेळी आरक्षण संपवण्याच्या कथित विधानाप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही निशाणा साधला. राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा केली. आता माज्या बहिणी या काँग्रेसवाल्यांना घरी पाठवण्याचे काम करतील, असे ते म्हणाले.

## थोडक्यात

### महायुतीचे तिन्ही पक्ष विधानसभेत सोबतच लढणार



■ **मुंबई :** भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. आज मुंबईत नड्डा यांनी आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने बैठकही घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर भाजपच्या बड्या नेत्यांची ही बैठक पार पडली. या बैठकीत नड्डा यांनी पक्षातील नेत्यांना महत्त्वाचा सल्ला दिला. तसेच, आगामी विधानसभा निवडणुकीची रणनिती आखण्यासाठीची कानमंत्रदेखील दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यावर भर देण्यास सांगण्यात आले आहे. नड्डा म्हणाले की, शिवसेना व राष्ट्रवादीला सोबत घेऊनच निवडणूक लढा. भाजपच्या नेत्यांनी मोठ्या भावाची भूमिका घेत दोन्ही पक्षांना सांभाळून घ्यावं. त्यासोबतच बंडखोरी टाळण्यासाठी पक्षातील नेत्यांना विश्वासात घेण्याच्या सूचना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे हे देखील उपस्थित होते.

### ईद-ए-मिलादनिमित्त १८ सप्टेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

■ **मुंबई :** महाराष्ट्र सरकारने १८ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याबाबत काँग्रेस नेते नसीम खान आणि एआयएमआयएम नेते वारिस पठाण यांच्या वतीने सरकारकडे मागणी करण्यात आली होती शिंदे सरकारने मुस्लिम समाजाच्या मागणीनुसार ही घोषणा केली असल्याचे म्हटले आहे.

हा निर्णय मुंबईसाठी लागू करण्यात आला असला तरी इतर जिल्ह्यांमध्ये समाजाच्या मागणीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

### इमारतीला आग, १३ जखमी

■ **मुंबई :** मुंबईतील घाटकोपर भागातील एका इमारतीला आग लागल्याची घटना घडली आहे. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग आटोक्यात आणली. ९० हून अधिक लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. तर या घटनेत १३ जण जखमी झाले आहेत.

## जेकेमधील चकमकीत तीन दहशतवाद्यांचा खात्मा

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १४:**
जम्मू-काश्मीरमध्ये शनिवारी पंतप्रधान मोदींच्या रॅलीपूर्वी दोन ठिकाणी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. बारामुल्लामध्ये तीन दहशतवादी ठार झाले आहेत. काल किश्तवाडमध्ये दोन जवान शहीद झाले होते. तर अन्य दोघे जखमी झाले आहेत. दोन्ही ठिकाणी लष्कर आणि पोलिसांची संयुक्त कारवाई सुरू आहे.

व्हाइट नाइट कॉर्प्सचे नायब सुभेदार विपिन कुमार आणि कॉन्स्टेबल अरविंद सिंग अशी शहीद जवानांची नावे आहेत. सुरक्षा दलांनी लपलेल्या ३-४ दहशतवाद्यांना घेरले आहे. चत्तरू पट्ट्यातील नैदघम गावात जैश-ए-मोहम्मदचे तीन दहशतवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम राबवली.

वृत्तसंस्था एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास चकमक सुरू झाली. कारवाई सुरू आहे. एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, लष्कराने परिसराला



वेढा घातला असून परिस्थिती गंभीर आहे.

दुसरीकडे, शुक्रवारी रात्री उशिरा बारामुल्लाच्या चक टेप्पर क्रिरी पट्टण भागातही चकमक सुरू झाली. काश्मीर झोन पोलिसांनी वर एका पोस्टमध्ये ही माहिती दिली. पोलिस आणि लष्कर घटनास्थळी हजर आहे. सध्या फारशी माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान कठुआच्या खंडारामध्येही लष्कराची कारवाई सुरू होती. येथे रायझिंग स्टार कॉर्प्सच्या जवानांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

## ममता बॅनर्जी डॉक्टरांच्या भेटीला

**कोलकाता रेप, मर्डर**

■ **वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १४:**
पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी कोलकाता येथे स्वास्थ भवनाबाहेर आंदोलन करणाऱ्या ज्युनियर डॉक्टरांची भेट घेतली. १० सप्टेंबरपासून येथील डॉक्टर आंदोलनाला बसले आहेत. ममता म्हणाल्या की, माझे पद नाही, तर जनतेचे स्थान मोठे आहे. मी मुख्यमंत्री नाही, पण तुमची दीदी म्हणून तुम्हाला भेटायला आले आहे.

ममता यांनी आतापर्यंत तीनदा डॉक्टरांशी बोलण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मात्र, डॉक्टरांनी त्यांचे तीनही प्रस्ताव फेटाळून लावले. त्यांच्या ५ मागण्या आहेत. यावर त्यांनी चर्चेसाठी चार अटी ठेवल्या आहेत.

## सर्व माध्यमांच्या शाळात मराठी सक्तीची

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:**
राज्य मंडळाच्या शाळांसोबतच इतर मंडळाच्या शाळांमध्ये देखील मराठी विषय हा गांभीयार्ने शिकायला जावा यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आतापर्यंत इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा विषयाची परीक्षा घेऊन श्रेणी दिली जायची. मात्र, आता मराठी भाषा विषय शिकवणे अनिवार्य करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या पासून मराठी भाषा विषयाची परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना श्रेणी ऐवजी गुण दिले जाणार आहेत.

राज्यामधील सर्व खासगी आणि सरकारी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अध्ययन सक्तीचे करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घेऊन श्रेणी स्वरूपाचे मूल्यांकन न करतात गुणांकन पद्धतीने परीक्षेचे मूल्यांकन केले जाणार आहे.

सरकारकडून मराठी भाषा सक्तीची अंमलबजावणी संदर्भात सूचना करण्यात आली आहे. श्रेणी स्वरूपातील मूल्यांकनामुळे इतर माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषय गंभीर्याने शिकवला जात नसल्याचे, समोर आल्यानंतर सूचना देण्यात आल्या आहेत.

## हिमाचल मशीद वाद लोक रस्त्यावर उतरले

■ **शिमला :** मशिदींमधील बेकायदा बांधकामाच्या वादावरून हिमाचल प्रदेशातील ४ जिल्ह्यांमध्ये निदर्शने सुरू आहेत. हिंदू संघटनांनी शिमल्याला लागून असलेल्या बिलासपूर, हमीरपूर आणि सिरमौर जिल्ह्यांतील पोंटा साहिबमध्ये निषेध रॅली काढल्या. शिमल्यातील संजौली मशिदीविरोधातील आंदोलनात पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या विरोधात या संघटना आंदोलन करत आहेत.

## एकनाथ खडसेंविषयी गणेशोत्सवानंतर निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४:**



देवेंद्र फडणवीस यांनी मुलीची शपथ घेऊन मला राज्यपाल करण्याची ग्वाही दिली होती, या आमदार एकनाथ खडसे यांच्या दाव्यावर स्वतः फडणवीस यांनी शनिवारी प्रतिक्रिया दिली.

मी एकनाथ खडसे काय म्हणाले ते ऐकले नाही. पण त्यांच्याविषयी आमच्या केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतला असून, हा निर्णय आम्हाला मान्य असेल, असे ते म्हणालेत. पत्रकारांनी शनिवारी याविषयी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छेडले असता त्यांनी आपण खडसेंचे विधान ऐकले नसल्याचे स्पष्ट केले.

एकनाथ खडसेंचे विधान मी ऐकले नाही. पण खडसेंच्या बाबतीत आमच्या केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतला आहे. तो निर्णय आम्हाला सर्वांना मान्य आहे. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करून त्याबाबत गणेशोत्सवानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे देवेंद्र फडणवीस नागपूर विमानतळावर पत्रकारांशी बोलताना म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी मला बोलावून राज्यपाल पदाची ऑफर दिली होती, असा दावा खडसे यांनी केला होता.

## सोयाबीन उत्पादकांना केंद्राचा मोठा दिलासा

### हमीभावाने ९० दिवस खरेदी, कांदा निर्यात शुल्क घटवले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:**
राज्यात सोयाबीनचा पेरा ५२ लाख हेक्टर पेक्षा जास्त झाला आहे. तसेच यावर्षी पाऊस पाणी व्यवस्थित झाल्याने राज्यात सोयाबीनचे उत्पन्न बंपर होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने सोयाबीन खरेदीसाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला होता. केंद्र सरकारनेही राज्याची मागणी मान्य केली असून आता ९० दिवस सोयाबीनची खरेदी केली जाणार आहे.

दुसरीकडे, सरकारने कच्चे तेल आणि रिफाइंड सूर्यफूल तेलावरील सीमा शुल्क अनुक्रमे २० टक्के आणि ३२.५ टक्के केले आहे. हा बदल १४ सप्टेंबरपासून लागू होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील शुल्क ४० टक्क्यांवरून २० टक्के केले आहे. दरम्यान, केंद्र सरकारने हा बदल केल्याने राज्य सरकारने केंद्राप्रती आभार व्यक्त केले आहेत.




## दहा वर्षानंतर बाळ झाले... आईच्या कुशीतच दगावले...

# भीषण अपघातात तान्हुल्यासह चौघेजण ठार, वडील गंभीर

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १४:**
बारसे आटोपून पुण्याला परत जाताना अपघातात बाळासह आई, आजी आणि एका मुलीचा मृत्यू झाला. विवाहाच्या १० वर्षानंतर बाळ जन्माला आल्याने आनंदात असलेल्या देसरकर कुटुंबावर क्षणार्धात नियतीने घाला घातला. सदर घटना छ. संभाजीनगरच्या लिंबे जळगावजवळ घडली

अमरावती येथील अजय देसरकर हे पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करतात. त्यांची पत्नी मृणाली दोन महिन्यांपूर्वीपासून गावाकडे आली होती. अजय, मृणाली यांना १० वर्षानंतर पूत्ररत्न प्राप्त झाले होते. चार दिवसांपूर्वीच अमोघ असे त्याचे नामकरण करण्यात आले .चार दिवसांपूर्वीच बारशाचा कार्यक्रम झाला.

दरम्यान, अजय हे कुटुंबियांसह कारने पुण्याला जात असताना लिंबेजळगाव परिसरात स्कार्पियो कारने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात कारमधील पाचजण जखमी झाले.



जखमींना नागरिकांनी तत्काळ रुग्णालयात दाखल केले. तथापि, दीड महिन्याचा अमोघ, त्याची आई मृणाली, आजी आशालता पोपळघट तसेच आशालता यांची नात दुर्गा सागर गिते (७) यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

अजय यांच्या कारला धडक मारणाऱ्या वाहनातील विशाल चव्हाण (वय २२), कृष्णा कारभारी केरे (वय १९) यांना पोलिसांनी वाळुंज अटक केली आहे.

**काळाने हिरावला आनंद**

अजय व मृणाली यांना दहा वर्षांनंतर बाळ झाल्याने त्यांनी मोठ्या आनंदात बारशाचा कार्यक्रम केला. पुण्यात मृणाली व बाळाची काळजी घेण्यासाठी अजय यांनी त्यांच्या सासू आशालता पोपळघट यांना सोबत नेत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. वाळूंज ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पंतप्रधान मोदी यांनी धान, कापूस, सोयाबीन व तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांसाठी घेतलेला निर्णय मोलाचा : उपमुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

शेतकऱ्यांचा भल्याचा विचार करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या खाद्य तेलावरील आयात शुल्क वाढविण्यासह बासमती तांदळाच्या नियार्तीसाठी सुद्धा किमान निर्यात किंमत (एमईपी) ही पूर्णपणे मागे घेण्यात आली आहे. कांद्यावरील किमान निर्यात मुल्य रद्द करण्याचा निर्णय हा अत्यंत लाखमोलाचा आहे.

रिफाईन तेलावर आयात शुल्क 32.50 टक्के करण्यात आला आहे. या निर्णयामुळे धान उत्पादन, सोयाबीन, कापूस व इतर तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.




## बासमती तांदूळ व कांद्यावरील निर्यात मुल्य रद्द करण्याचा निर्णय

शेतकऱ्यांच्या अत्यंत हिताचा हा निर्णय घेतल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार मानले. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने आमच्या बळीराजासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मी त्यांचा अतिशय मनापासून आभारी आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला जास्त भाव मिळण्याच्या दृष्टीने हे निर्णय निश्चितपणे क्रांतीकारी आहेत. या शब्दात त्यांनी निर्णयाचे स्वागत केले.

खाद्यतेलाच्या आयातीवर आधी कोणतेच शुल्क नव्हते, त्यावर आता 20 टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना अधिक किंमत मिळेल. याशिवाय रिफाइंड सोयाबीन, सूर्यफूल आणि पामतेलावर कस्टम शुल्क 12.50% वरून 32.50% करण्यात आले आहे.

सोयाबीन खरेदीचा निर्णय केंद्र सरकारने आधीच घेतला असून त्याचा शेतकऱ्यांना फायदा झाल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कांद्यावरील निर्यात शुल्क 40 टक्क्यांवरुन 20 टक्के इतके कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिवाय कांद्याची निर्यात करताना किमान निर्यात किंमत (एमईपी) ही पूर्णपणे संपविली आहे. यातून कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळणार असून त्यांनाही चांगला आर्थिक लाभ होईल असे ते म्हणाले.

# दिव्यांगांची सेवा हीच ईश्वरसेवा

■ केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन, आधार संस्थेतर्फे श्रवणयंत्राचे वितरण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

ज्यांना पाय नाहीत त्यांना कृत्रिम पाय लावून देणे, गरजूंना श्रवणयंत्र देणे, ट्रायसिकल देऊन दिव्यांगांच्या उदरनिवार्हाचा प्रश्न सोडविणे ही कामे करताना माज्या मनाला कमालीचे समाधान प्राप्त होते. माज्यादृष्टीने दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शनिवार) येथे केले.

आधार संस्था व वेकोलिच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांना सॉफ्टमोडसहित श्रवणयंत्र वितरित करण्यात आले. धनवटे कॉलेजच्या मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला ना. श्री. नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी वेकोलिचे अध्यक्ष तसेच व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी, एस्पायर नॉलेज अँड स्किल्स इंडियाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय गांधी, धनवटे नॅशनल कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे, समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन आणि दिव्यांग सशक्तिकरण केंद्राचे (सीआरसी) संचालक प्रफुल्ल शिंदे, आधार संस्थेचे अध्यक्ष सुमित ताटे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात नायरा चचाने, स्वयम महाजन, युग चोरकर, अंजली सहारे, मीनाक्षी बघेल या विद्यार्थ्यांना नितीन गडकरी यांच्या हस्ते श्रवणयंत्र देण्यात आले.

गडकरी म्हणाले, आपल्या भागात ४ टक्क्यांहून अधिक दिव्यांग आहेत. प्रत्येकाला ज्या साहित्याची गरज आहे, ते साहित्य देण्याचा माझा प्रयत्न असतो. आतापर्यंत ४० हजार दिव्यांगांना साहित्य वितरित केले आहे. मध्ये एका शिबिरात याच महाविद्यालयाच्या मैदानावर जवळपास ८० दिव्यांगांना कृत्रिम पाय लावून दिले होते. ती मुले बुलेट चालवताना आणि फुटबॉल खेळताना बघून आनंद झाला होता. केवळ नागपुरातीलच नव्हे तर संपूर्ण विदभार्तील दिव्यांगांची यादी तयार करा.

आपण त्यांना आवश्यक ते साहित्य देऊ, असे आवाहन नितीन गडकरी यांनी आयोजकांना केले. कमाल टॉकीज चौकात निमार्णाधीन असलेल्या डायग्नोसीस सेंटरची माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. या सेंटरमध्ये सर्व सीटी स्कॅन, एमआरआयसह सर्व चाचण्या व पॅथॉलॉजी टेस्ट अत्यल्प दरात होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गटई कामगार योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीचा व्यवसाय करणारे गटई कामगार हे रस्त्याच्या कडेला उन्हापावसात बसुन आपला व्यवसाय करत असतात. त्यांना उन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे, तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावा याकरीता 100 टक्के शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना समाज कल्याण विभाग राबविते. या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागातर्फे करण्यात आले आहे.

अर्जदाराचा स्वतःचा प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला. चालु वषार्तील प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन काडार्ची झेरॉक्स प्रत, आधार कार्ड झेरॉक्स प्रत सोबत जोडावी. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत आहे ती जागा ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका व छावणी क्षेत्र यांनी भाडयाने/ खरेदीने असल्याबाबतचे भाडेचिठ्ठी कराराची प्रत किंवा खरेदी क्षेत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.

# रिद्धापूर रेल्वे स्थानक आणि मेमू ट्रेन थांब्याचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

मध्य रेल्वे नागपूर विभागाच्या वतीने बहुप्रतिक्षित रिद्धपूर रेल्वे स्थानकाचे उद्घाटन 13/09/2024 रोजी डॉ. अनिल बोंडे, खासदार (राज्यसभा) आणि वरिष्ठ रेल्वे अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी वाढविण्याच्या दिशेने ही महत्त्वाचे पाऊल आहे.

महानुभाव पंथाच्या अनुयायांसाठी रिद्धपूरला खूप महत्त्व आहे कारण श्री गोविंद प्रभू आणि चक्रधर स्वामी यांसारख्या पूज्य संतांच्या कायार्चे पवित्र स्थान आहे, दरवर्षी हजारो भक्त आणि यात्रेकरू आकर्षित होतात. या स्थानकाच्या उद्घाटनामुळे, रिद्धपूरचा समृद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा आता भारताच्या आधुनिक वाहतूक नेटवर्कशी जोडला गेला आहे, ज्यामुळे यात्रेकरू आणि अभ्यागतांसाठी प्रवेशयोग्यता सुधारली आहे.




**रिद्धपूर रेल्वे स्थानकात नवीन सुविधाः**

प्लॅटफॉर्मः प्रवाशांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी एक समर्पित प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. ॲप्रोच रोडः चांगला बांधलेला ॲप्रोच रोड स्थानकापर्यंत सहज प्रवेश देतो, ज्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुरळीत होतो. वेटिंग शेडः प्रवाशांना त्यांच्या ट्रेनची वाट पाहत असताना अनपेक्षित हवामानापासून वाचवण्यासाठी एक आरामदायी वेटिंग शेड बांधण्यात आले आहे.

बुकिंग काउंटरः तिकीट सेवांसाठी स्टेशनमध्ये पूर्णतया कार्यरत बुकिंग काउंटरसह हॉल्ट तिकीट काउंटर आहे. प्रकाशयोजनाः रात्रीच्या वेळी सुरक्षितता आणि सोयीसाठी उत्तम प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. प्रसाधनगृह सुविधाः आरोग्य आणि स्वच्छतेला प्राधान्य देत, पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र, स्वच्छ स्वच्छतागृहांची सोय करण्यात आली आहे.

**भविष्यातील विस्तार योजनाः**

परिसराच्या विकासाला चालना देण्यासाठी, मध्य रेल्वेने रिद्धपूर रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी 12.69 कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.

**विस्तार योजनांमध्ये हे समाविष्ट आहेः**

भविष्यातील मेल/एक्सप्रेस गाड्यांसाठी उच्चस्तरीय प्लॅटफॉर्मचे बांधकाम. ऊन आणि पावसापासून प्रवाशांचे संरक्षण करण्यासाठी शेडची स्थापना. प्रवासी सुविधांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी नवीन स्टेशन इमारत देखील बांधली जाईल.

या विकासामुळे रिद्धापूरच्या रहिवाशांसाठी केवळ सुविधाच वाढणार नाहीत, तर भक्तांसाठी या पवित्र भूमीत अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश करून स्थानिक पर्यटनाला, विशेषतः धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल. हा प्रकल्प प्रवाशांना आधुनिक प्रवासी सुविधा देताना रिद्धपूरच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याच्या मध्य रेल्वेच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.

रिद्धपूर रेल्वे स्थानकाच्या विस्तारामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे, विशेषतः धार्मिक पर्यटनाच्या वाढीमुळे. चांगल्या पायाभूत सुविधांमुळे अभ्यागतांचा अधिक ओघ वाढेल, ज्यामुळे स्थानिक व्यवसायांना चालना मिळेल आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढेल.

# पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया शिबिरात ९ रुग्णांवर शस्त्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम व सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) यांचे वतीने नुकताच एन. के. पी. साळवे वैद्यकीय महाविद्यालय तथा लता मंगेशकर हॉस्पीटल नागपूर येथे विकृती असलेल्या कुष्ठरुग्णांकरीता पुर्नरचनात्मक शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात जिल्ह्यातील 12 विकृती असलेल्या रुग्णांना भरती करण्यात आले. 23 ऑगस्ट रोजी 9 रुग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. उर्वरित 3 रुग्णांवर पुढील कालावधीत त्यांच्या वैद्यकीय अहवालानुसार शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

शासनाने ठरवून दिलेल्या 12 उद्दिष्टांपैकी 12 पुर्नरचनात्मक शस्त्रक्रिया होणार आहे. या रुग्णांवर शस्त्रक्रिया झाल्यावर शासनातर्फे 12 हजार रुपये अनुदान रुग्णांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. सजल मित्रा, अधिष्ठाता एन. के. पी. साळवे वैद्यकीय महाविद्यालय तथा लता मंगेशकर हॉस्पीटल नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. शस्त्रक्रिया नागपूरचे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. अनिल गोल्हर, एन. के. पी. साळवे वैद्यकिय महाविद्यालय तथा लता मंगेशकर हॉस्पीटलचे विभाग प्रमुख डॉ. सुशील मानकर, डॉ. सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) दीपिका साकोरे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पडवे यांचे उपस्थितीत करण्यात आल्या. शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ. शाजीया शम्स, डॉ. संजय पुल्लकवार डॉ. सिद्धीक अहेमद, व वैद्यकीय अधिकारी सुलू नागपूर जिल्हा कुष्ठरोग पर्यवेक्षक देविदास अवसरकर यांनी सहकार्य केले.

## मार्जिन मनी योजनेचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील घटकांकरीता मार्जिन मनी योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयान्वये शासन स्तरावरून निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे 16 मार्च 2021 च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचनांचा समावेश करण्यात आला आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी मार्जिन मनी योजनेचे प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे आवाहन केले आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी मार्जिन मनीचे प्रस्ताव सर्व अटी व शतीर्ची पुर्तता करून सहायक आयुक्त, समाज कल्याण, बी-विंग, सामाजिक न्याय भवन, शासकीय आय.टी. आय. समोर, श्रद्धानंदपेठ, नागपूर येथे सादर करावे.

# गाई म्हशीच्या दूधात 'मलई' खाणारेच अधिक

## एसएनएफ मोजणी यंत्रातील छेडछाडीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

गाईच्या व म्हशीच्या दुधाच्या उत्पादन खचार्बाबत, माहिती अधिकारात मागितलेल्या माहितीनुसार प्रचंड तफावत आहे. उदा. मराठवाडा विभागाचा गाईच्या दुधाचा उत्पादन खर्च ४२.३३ रुपये लिटर आहे, तर सोलापूरचा ६२.२८ रुपये लिटर आहे. सर्व जिल्ह्यातील उत्पादन खर्च संकलित करून दर ठरविण्यासाठी "दुग्ध मूल्य आयोगाची' स्थापना करावी, अशी मागणी दूध संघर्ष महाअभियानाचे समन्वयक सतीश देशमुख यांनी केली आहे. हा दुग्ध मूल्य आयोग ह्या पद्धतीमधील त्रुटी काढून शास्त्रोक्त पद्धतीने अद्ययावत खर्च काढेल व वाढलेल्या निविष्ठांच्या खर्च गृहीत धरून दुधाच्या एफआरपी मध्ये दर वर्षी वाढ करील, असे ते म्हणाले.

दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध दर न देण्यासाठी दूध संघ कोरोना काळापासून दूध पावडरचा स्टॉक वाढल्याचा एकच कांगावा करीत आहे. आंतराष्ट्रीय बाजारपेठेतील पावडरचे दर कोसळल्याचे सांगून ते शासनाकडून अनुदान उकळतात. आंदोलन न करता, दूध संघाला पावडर नियातीसाठी ३० रुपये प्रती किलो जाहीर झाले आहे. महाराष्ट्र शासन "शेतकरी, दूध ग्राहकांचे संरक्षण आणि मानके अंमलबजावणी कायदा, २०२४' लागू करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे.

पण ही दिशाभूल असून, ह्यात दुधाचे मोजमाप व भेसळ व्यतिरिक्त इतर मागण्यांचा उल्लेख सोयीस्कररित्या टाळण्यात आल्याचे देशमुख यांनी सांगितले.

ते पुढ बोलताना म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या २१ नोव्हेंबर २०१३ च्या जीआर नुसार सरकारने दूध संघ व वितरकाचे कमिशन व वरकड खर्च निश्चित केला होता. त्यावेळी दूध खरेदी दर २० रुपये असताना वरकड खर्च ३.३५ रु. (१६.७%) होता. आणि आज दूध खरेदी दर २६ रुपये असताना शहरातील विक्री दर ५६-६० रुपये आहे. म्हणजे कमिशन ३२ रुपये आहे. जे तब्बल १२३ % आहे. शिवाय उप पदाथार्चा नफा व सरकारच्या अनुदानाची मलई वेगळी. सरकारने ह्या अमर्याद लुटीवर नियंत्रण आणून पूर्वीच्या पद्धती प्रमाणे जीआरमध्ये दूध संघ व वितरकाचे कमिशन व वरकड खर्च निश्चित करून त्याचा उल्लेख करावा.

फॅट आणि एसएनएफ मोजणी यंत्रामधील मुद्दाम केलेल्या छेडछाडीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे दररोज नुकसान होत आहे.

दूध संकलन केंद्रांवर प्रमाणित केलेले मिल्कोमीटर वापरावे लागतील व वजन काटे आणि मिल्कोमीटर यांचे शासकीय यंत्रणेमार्फत नियमित प्रमाणीकरण व तपासणी केली जाईल, असा निर्णय राज्य सरकारने ३ एप्रिल २०२३ ला घेतला होता. यासाठी स्वतंत्र निरीक्षकाची नियुक्ती करण्यात येणार होती. त्याची पुढील कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

# उपराजधानीत स्वाईन फ्ल्यूची रुग्णसंख्या घटली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



मागील वर्षांच्या तुलनेत यंदा शहरात स्वाइन फ्लूच्या रुग्णांमध्ये घट झाली असली तरी मृत्यूची संख्या आरोग्य अधिकाऱ्यांसाठी चिंताजनक आहे. नागपूर महानगर पालिकेच्या आकडेवारी नुसार जानेवारी ते ऑगस्ट अखेरपर्यंत शहरात स्वाईन फ्लूचे 94 रुग्ण आणि 4 मृत्यूची नोंद झाली आहे.

जिल्हास्तरीय आकडेवारी अधिक चिंताजनक चित्र दर्शविते त्याच कालावधीत 161 पुष्टी झालेल्या प्रकरणे आणि 15 मृत्यू पैकी नागपूर ग्रामीणमध्ये 24 पॉझिटिव्ह प्रकरणे आणि 4 मृत्यूची नोंद झाली आहे. पॉझिटिव्ह आढळलेल्यांपैकी 25 नागपूरचे रहिवासी नाहीत आणि 21 महाराष्ट्राबाहेरील आहेत. मृतांपैकी पाच नागपूर जिल्ह्याबाहेरचे होते. जे अनिवासी लोकांमध्ये रोगाचा प्रसार ठळकपणे दर्शवतात. याशिवाय महाराष्ट्राबाहेरील दोन जणांचा नागपूरला गेल्यावर या आजाराने मृत्यू झाला.

नागपुरात 2022 मध्ये अधिक गंभीर उद्रेक झाला होता. 371 स्वाइन फ्लूचे रुग्ण आणि 22 मृत्यू तथापि, 2023 मध्ये, फक्त 79 प्रकरणे आणि 1 मृत्यूची नोंद झाल्याने तीव्र घट झाली होती. या वर्षी, स्वाइन फ्लूच्या मासिक तपशीलांमध्ये संमिश्र कल दिसून येतो. जानेवारीमध्ये 6 फेब्रुवारीमध्ये 8 आणि एप्रिल, मे आणि जूनमध्ये प्रत्येकी 2 प्रकरणे नोंदवली गेली आहे. स्वाइन फ्लू च्या प्रकरणांमध्ये घट झाली उच्च मृत्यू दराने आरोग्य कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये चिंता वाढवली आहे.

# शहरात ४१९ कृत्रिम टँकची व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

नागपूर महानगरपालिकातर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी कृत्रिम हौदांची व्यवस्था करण्यात आली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात घनकचरा व्यवस्थान विभागातर्फे संपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे. अशात आता नवव्या व दहाव्या दिवसाच्या श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी मनपा सज्ज असून, शहरातील २०९ ठिकाणी ४१९ कृत्रिम टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख तथा उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजवर हजारो श्रीगणेश मूतीर्चे विसर्जन विविध ठिकाणी करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांमुळे नागरिकांनी मोठया संख्येत मातीच्या श्रीगणेश मूतीर्ची स्थापना यावेळेस केली आहे. तलावांच्या संरक्षणासाठी मनपातर्फे घरगुती गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन टँकची व्यवस्था शहरातील विविध प्रभागात करण्यात आली आहे. यात गांधीसागर तलाव, सोनेगांव तलाव येथे मोठे कृत्रिम टँक निर्माण करण्यात आले आहेत. तर सार्वजनिक गणेश मंडळासाठी कोराडी येथे विसर्जन टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गणेश भक्तांच्या सोयीनुसार शहरात ४१९ विसर्जन टँकची व्यवस्था करण्यात आली.

**नावात बदल**

माझे नाव MOHD. ANWAR आहे आणि मी माझ्या लहान मुलाच्या नावात बदल करीत आहे. त्याचे जुने नाव MOHD. ANSAR असे होते आता त्याचे नवीन नाव MD. ANSAR ANVAR ANSARI झाले आहे. पत्ता : प्लॉट क्र १४९६, योगी अरविंद नगर, यशोधरा चौक, पिली नदी नागपूर - ४४००२६

माझे जुने नाव MOHAMMAD. ANVAR ANSARI होते आणि आता माझ्या नावात बदल करून माझे नवीन नाव MOHD. ANWAR असे झाले आहे. पत्ता : प्लॉट क्र १४९६, योगी अरविंद नगर, यशोधरा चौक, पिली नदी नागपूर - ४४००२६

# मनपा व सुधार प्रन्यासचा भोंगळ कारभार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :



व सुधार प्रंन्यासचा भोंगळ कारभारा मुळे जय गुरुदेव नगर व ग्रीन प्लॅनेट सोसायटी मध्ये ये जा करण्याकरिता नागरिकांना मोठा त्रास होत आहे. मनपा व सुधार प्रंन्यास ने ग्रीन प्लॅनेट सोसायटी मधून सिमेंट रोड बनवला परंतु जय गुरुदेव नगरला न जोडता काम बंद करून निघून गेले. रोड बनवण्याचे काम सुरू असताना मंदिरच्या बाजूला टीनचे शेड लावण्यात आले होते.

रोडच्या ठेकेदारांनी स्वतः बनविलेला टीन शेड न काढता निघून गेल्यामुळे छाया जयस्वाल यांनी माजी नगरसेवक मंगला खेडके यांच्या मदतीने अतिक्रमण केले. सुधार प्रंन्यासने अतिक्रमण हटवण्याकरिता कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला.

परंतु माजी नगरसेवक यांचा हस्तक्षेप असल्यामुळे हे अतिक्रमण न हटवता सुधार प्रंन्यासचे कर्मचारी निघून गेले असल्याचे ग्रीन प्लॅनेट सोसायटीतील नागरिकांनी सांगितले.

ग्रीन प्लॅनेट सोसायटी ते जय गुरुदेव नगर मधून ओंकार नगर मानेवाडा कडे जाण्याकरिता सोयीचा होत असलेला रोड बंद केल्यामुळे ग्रीन प्लॅनेट सोसायटी मधील नागरिकांना मोठा त्रास होत आह, असे रोड ने जाणाऱ्या नागरिकांचे म्हणणे आहे.

याकरिता ग्रीन प्लॅनेट सोसायटी मधील नागरिक जनता दरबार मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भेटून निवेदन दिले.

परंतु काही झालेले नाही असे ग्रीन प्लॅनेट सोसायटी मधील नागरिकांचे मनने आहे.

# अपघातात जखमी तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

वाडी ठाण्यांतर्गत रस्त्यावर जखमी अवस्थेत मिळालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. असीम मंडल (25) रा. हुगली, पश्चिम बंगाल असे मृताचे नाव आहे. असीम मजुरीसाठी नागपुरात आला होता. गत 10 सप्टेंबरच्या सकाळी 6 वाजताच्या सुमारास तो वडधामना मशिदीजवळ जखमी अवस्थेत आढळला. डोक्याला आणि तोंडाला गंभीर मार होता.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **RAFIQ KHAN.** MY NEW NAME IS **RAFIQUE KHAN .**
**ADD:** NEAR MAHESH NAGAR PLOT NO 36 NEW AHBAB COLONY NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **MOHD MATEEN.** MY NEW NAME IS **SHAIKH MATEEN.**
**ADD:** 446, M. HASANJI GODOWN, SATRANJI PURA, NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **MO FARHAN RAZA.** MY NEW NAME IS **FARHAN RAZA.**
**ADD:** 446, M. HASANJI GODOWN, SATRANJI PURA, NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **SANJAYKUMAR SATYANARAYAN AGARWAL.** MY NEW NAME IS **SANJAY SATYANARAYAN AGRAWAL.**
**ADD:** FLAT NO 505, JAI HANUMAN APT WARDHAMAN NAGAR NAGPUR -440008

GNYANVARDHINI BAHUDDESHIYE SHIKSHAN SANSTHA
**NAVYUVA COLLEGE OF NURSING**
Opposite OLD R.T.O., Kardha, Bhilevada, Bhandara.
Email: navyuvagnmcollege@gmail.com • Mob.: 8975667540

**Applications are invited from the Students of Hindi Minority & Non Minority Students for the Academic Year 2024-25**

| Sr. No. | Name of the Course | Total Intake | Minority Intake | Non-Minority Intake |
|---|---|---|---|---|
| 01 | G.N.M Nursing Course | 60 | 31 | 29 |

Admission Dates for the Minority Education Institute
1. Last Date for the Application: 19/09/2024
2. Date of Publication of Merit List: 19/09/2024
3. Admission Date: 20/09/2024

SPECTRUM

# संविधानामुळेच लोकशाही अस्तित्वात आहे !

नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाचा स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पवार्ची सुरुवात केली होती. त्यामुळे दरवर्षी 26 जानेवारी ह्या दिवशी साजरा केला जातो. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य. थोडक्यात या दिवसापासून भारतीय जनतेला राज्य चालविण्याचा अधिकार मिळाला. 2007 मध्ये युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने 15 सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. लोकशाहीच्या तत्त्वांचा प्रचार आणि समर्थन करण्याच्या उद्देशाने आणि सर्व सदस्य राष्ट्रांना आणि संघटनांना हा दिवस योग्यरीतीने साजरा करण्यासाठी आमंत्रित केले जे वाढविण्यात योगदान देते. लोकशाहीमध्ये समान वैशिष्ट्ये आहेत, लोकशाहीचे कोणतेही एक मॉडेल नाही आणि लोकशाही कोणत्याही देशाची किंवा प्रदेशाची नाही. लोकशाही हे एक सार्वत्रिक मूल्य आहे जे लोकांचे स्वतःचे राजकीय, आर्थिक ठरवण्यासाठी मुक्तपणे व्यक्त केलेल्या इच्छेवर आधारित आहे.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य. हे विविध मार्गांनी केले जाऊ शकतेः लोक नवीन कायद्यांबद्दल आणि विद्यमान कायद्यांबद्दल निर्णय घेण्यासाठी भेटतात. याला सहसा थेट लोकशाही म्हणतात. प्रत्यक्ष लोकशाही आणि प्रातिनिधिक लोकशाही हे लोकशाहीचे दोन सर्वात सामान्य प्रकार आहेत.

लोकशाही ही एक राजकीय व्यवस्था आहे ज्यामध्ये नागरिक ज्या समाजात राहतात त्या समाजावर शासन करण्याची भूमिका असते. लोकशाहीचे तीन मुख्य प्रकार म्हणजे अभिजात, सहभागी आणि बहुवचनवादी. इतर अनेक उपप्रकार अस्तित्वात आहेत.

जरी ही अथेनियन लोकशाही केवळ दोन शतके टिकून राहिली असली तरी, लोकशाहीचे जनक क्लेइस्थेनिस यांनी लावलेला शोध आधुनिक जगामध्ये प्राचीन ग्रीसच्या सर्वात चिरस्थायी योगदानापैकी एक होता.

थेट लोकशाहीची ग्रीक प्रणाली जगभरातील प्रातिनिधिक लोकशाहीचा मार्ग मोकळा करेल. कार्ल पॉपर म्हणतात की लोकशाहीचा शास्त्रीय दृष्टिकोन म्हणजे, थोडक्यात, लोकशाही म्हणजे लोकांचे शासन आहे आणि लोकांना राज्य करण्याचा अधिकार आहे असा सिद्धांत आहे. राजकीय व्यवस्था म्हणून लोकशाहीची संकल्पना प्राचीन ग्रीस, विशेषतः अथेन्समध्ये विकसित झाली.

अथेनियन लोकशाहीचे जनक क्लिस्थेनिस यांनी अशी व्यवस्था सुरू केली, जिथे सर्व पुरुष नागरिकांना समान राजकीय अधिकार, भाषण स्वातंत्र्य आणि राजकीय सहभागाची संधी होती. लोकशाहीच्या वैशिष्ट्यांमध्ये सहसा संमेलनाचे स्वातंत्र्य, संघटना, वैयक्तिक मालमत्ता, धर्म आणि भाषण स्वातंत्र्य, नागरिकत्व, शासनकर्त्यांची संमती, मतदानाचे अधिकार, जीवन आणि स्वातंत्र्याच्या हक्काच्या अवास्तव सरकारी वंचितांपासून स्वातंत्र्य आणि अल्पसंख्याकांचे हक्क यांचा समावेश होतो.

अथेन्सचे क्लीस्थेनिस हे अथेनियन लोकशाहीचे संस्थापक म्हणून ओळखले जाणारे राजकारणी होते, त्यांनी अथेन्स चे मुख्य आर्चॉन (सर्वोच्च दंडाधिकारी) म्हणून काम केले. अथेन्सला बहुधा लोकशाहीचे जन्मस्थान मानले जाते कारण थेट लोकशाहीची प्रणाली विकसित करणारे ते पहिले शहर-राज्य होते ज्यात नागरिकांनी सरकारच्या निर्णय प्रक्रियेत थेट सहभाग घेतला होता.

लोकशाही हा शासनाचा एक प्रकार आहे जिथे लोकांचा अधिकार असतो. लोकशाहीत, नागरिक त्यांचे नेते निवडण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी मतदान करतात. हे सुनिश्चित करते की प्रत्येकाचा आवाज ऐकला जातो. नागरिकांना हक्क आणि स्वातंत्र्य आहे.

सप्टेंबर 1997 मध्ये आंतर-संसदीय संघ ने लोकशाहीवर एक सार्वत्रिक घोषणा स्वीकारली. ती घोषणा लोकशाहीची तत्त्वे, लोकशाही सरकारचे घटक आणि व्यायाम आणि लोकशाहीच्या आंतरराष्ट्रीय व्याप्तीची पुष्टी करते. तथाकथित शांततापूर्ण लोक शक्ती क्रांतीने फर्डिनांड मार्कोसची 20 वर्षांची हुकूमशाही उलथून टाकल्यानंतर फिलीपिन्सचे अध्यक्ष कोराझॉन सी. अक्विनो यांच्या पुढाकाराने 1988 मध्ये नवीन आणि पुनर्संचयित लोकशाहीवरील आंतरराष्ट्रीय परिषदा प्रक्रिया) सुरू झाल्या.

सुरुवातीला एक आंतर-सरकारी मंच, क्ळठफळ प्रक्रिया सरकार, संसद आणि नागरी समाजाच्या सहभागासह त्रिपक्षीय संरचनेत विकसित झाली. 2006 मध्ये दोहा, कतार येथे झालेल्या सहाव्या परिषदेने प्रक्रियेच्या त्रिपक्षीय स्वरूपाला बळकटी दिली आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना आणि मूल्यांना पुष्टी देणाऱ्या घोषणा आणि कृती योजनेचा समारोप झाला.

ICNRD-6 च्या निकालाचा पाठपुरावा करून, प्रक्रियेचे अध्यक्ष, कतार यांनी स्थापन केलेल्या सल्लागार मंडळाने आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला. संयुक्त राष्ट्र महासभेच्या ठरावाचा मसुदा तयार करण्यात कतारने पुढाकार घेतला आणि संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांशी सल्लामसलत केली. IPU च्या सूचनेनुसार, 15 सप्टेंबर (लोकशाहीवरील सार्वत्रिक घोषणापत्राची तारीख) हा दिवस म्हणून निवडला गेला जेव्हा आंतरराष्ट्रीय समुदाय दरवर्षी आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन साजरा करेल.

8 नोव्हेंबर 2007 रोजी नवीन किंवा पुनर्संचयित लोकशाहींना चालना देण्यासाठी आणि एकत्रित करण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांच्या संयुक्त राष्ट्रांच्या प्रणालीद्वारे समर्थन नावाचा ठराव एकमताने स्वीकारण्यात आला. आयपीयूचे ने जगभरातील भ्रमनिरास आणि दुरावलेल्या तरुणांना राजकीय निर्णय घेण्यात गुंतवायचे असल्यास कृती आणि मानसिकतेत बदल करण्याचे आवाहन केले आहे. आयपीयूचे अध्यक्ष अब्देलवाहद राडी यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, तरुणांना नेहमी भविष्याशी जोडणे हा एक क्लिच आहे. तरुणांमध्ये केवळ भविष्याची व्याख्याच नाही, तर वर्तमानावर निर्णय घेण्याचीही शक्ती आहे. तथापि, ते मोठ्या प्रमाणात अनुपस्थित आहेत.

आयपीयूचे म्हणणे आहे की तरुणांच्या सहभागाला त्याचा विशेष अर्थ आहे आणि 2010 मध्ये आयपीयू असेंब्लीने स्वीकारलेल्या ठरावाचा पाठपुरावा करून लोकशाही प्रक्रियेत तरुण पुरुष आणि महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी एक कार्यक्रम सुरू होत आहे . 10 आणि 11 ऑक्टोबर 2014 रोजी तरुण संसदपटूंची पहिली जागतिक परिषद आयोजित करण्याची घोषणा केली आणि सर्व संसदांना उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले गेले. लोकशाही सिद्धांत हे राजकीय सिद्धांताचे एक प्रस्थापित उपक्षेत्र आहे जे प्रामुख्याने लोकशाहीच्या संकल्पनेची व्याख्या आणि अर्थ तसेच नैतिक पाया, दायित्वे, आव्हाने आणि लोकशाही शासनाची एकूण इष्टता तपासण्याशी संबंधित आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, लोकशाही मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचा आदर करणारे वातावरण प्रदान करते आणि ज्यामध्ये लोकांच्या मुक्तपणे व्यक्त केलेल्या इच्छेचा वापर केला जातो. त्यानिमित्त सर्वांना जागतिक लोकशाही दिनाच्या शुभेच्छा !

# ऑल इंडिया रेडिओचाच एक भाग- दूरदर्शन

दूरदर्शन हे भारताचे एक प्रथम टीव्ही चॅनल आहे. दूरदर्शन मनोरंजनपर कार्यक्रम प्रसारित करते. दूरदर्शन हे प्रसार भारती या भारत सरकारच्या संस्थेद्वारे चालवले जाते. आपल्या भारत देशामध्ये दूरदर्शवरून पहिले प्रसारण दि.१५ सप्टेंबर १९५९ रोजी नवी दिल्लीतील आकाशवाणी भवन या तात्पूरत्या उभारलेल्या स्टुडिओतून करण्यात आले. आज प्रसार भारती या संस्थेच्या अखत्यारीत असलेले दूरदर्शन त्यावेळी ऑल इंडिया रेडिओचाच एक भाग होता. सन १९७२ साली दूरदर्शनचे मुंबई केंद्र सुरू झाले.

कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी
रामनगर, गडचिरोली.
९४२३७१४८८३

दूरदर्शन भारतातील पहिले चॅनल आहे. दूरदर्शन मोफत आहे. ऑल इंडिया रेडिओचा एक भाग म्हणून दूरदर्शनवर नियमित दैनिक प्रसारणांची सुरुवात सन १९६५ मध्ये करण्यात आली. सन १९७५पर्यंत भारतातील फक्त सात शहरांमध्ये टीव्ही सेवा होती आणि दूरदर्शन ही भारतातील टीव्ही सेवा देणारी एकमेव कंपनी होती. जी आज देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचली.

सन १९८५ नंतर घरोघरी दूरचित्रवाणी संच दिसू लागले. आणि मालिकांविषयीच्या चर्चा रंगू लागल्या. चिमणराव आणि गुंड्याभाऊ, चाळ नावाची वाचाळ वस्ती, गोट्या, बंदिनी, एक शुन्य शुन्य, सर्जा राजा, प्रतिभा आणि प्रतिमा, ज्ञानदीप, आमची माती आमची माणसं या मालिका ज्ञान, माहिती आणि निखळ मनोरंजन देण्याचं काम करीत होत्या. व्यत्यय नावाची पाटीही चांगलाच भाव खाऊन जायची.

हिंदीतल्या बुनियाद, हमलोग, ये जो है जिंदगी, रजनी, तमस, रामायण, महाभारत, दी वर्ल्ड धिस वीक, दर्पण या मालिकांनी तर मनोरंजनाच्या विश्वात अफाट प्रेक्षकवर्ग मिळवला. अनंत भावे, प्रदीप भिडे, शम्मी नारंग, अविनाश कौर सरीन यांचे आत्मविश्वासाने परिपूर्ण असलेले वृत्तनिवेदन दर्शकांना भारावणारे होते.

भारतीय राष्ट्रीय दूरदर्शन हे जगातील सर्वात मोठे प्रादेशिक नेटवर्क- जाळे आहे. डीडी-१ या वाहिनीचे एक हजार बेचाळीस प्रादेशिक ट्रान्समिटर्सपर्यंत जाळे पसरले आहे. देशात ८५ टक्के लोकसंख्येपर्यंत डीडी-१चे कार्यक्रम पोहेचतात. या व्यतिरिक्त ६५ अतिरिक्त ट्रान्समिटर्स जोडलेले आहेत. भारतीय राष्ट्रीय उपग्रह- इन्सॅटवर अनेक ट्रान्सपाँडर्स जोडून प्रसारण क्षेत्र वाढविण्यात आले आहे.

देशात ४९ शहरांमध्ये दूरदर्शनचे कार्यक्रम निर्मिती केंद्र कार्यरत आहेत. दूरदर्शवरून पहिले प्रसारण दि.१५ सप्टेंबर १९५९ रोजी नवी दिल्ली येथील आकाशवाणी भवन या तात्पूरत्या उभारलेल्या स्टुडिओतून करण्यात आले. आज प्रसार भारती या संस्थेच्या अखत्यारीत असलेले दूरदर्शन त्यावेळी ऑल इंडिया रेडिओचाच एक भाग होता.

१९७२ साली दूरदर्शनचे मुंबई केंद्र सुरू झाले. पहिली काही वर्ष महाराष्ट्रात मुंबई-पुण्यातच कार्यक्रम दिसत. त्याचा पसारा खऱ्या अर्थाने वाढला तो सन १९८२ साली देशात झालेल्या एशियाड क्रीडा स्पर्धांमुळे..!! तेव्हा दूरदर्शन खेड्यापाड्यात पोचले.

सुरुवातीला या माध्यमाला अनेकांनी विरोध केला. लोकांना टीव्हीची नाही तर भाकरीची गरज आहे, असे म्हणणारे पुष्कळ होते. गमंतीची गोष्ट अशी, की लोकांनीच हे म्हणणे खोटे पाडले. ज्या खेड्यांत वीज नव्हती, तेथे ती आल्यावर अनेकांनी पहिल्यांदा टीव्ही संच विकत घेतले होते.

दूरचित्रवाणीचा म्हणावा तसा प्रसार सन १९६५पर्यंत झाला नाही. त्या वर्षापासून केंद्र सरकारने दूरचित्रवाणीचे जाळे देशात प्रसृत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. हॅंबर्गहून सहा तज्ज्ञांचे एक मंडळ भारतात आले आणि त्यांनी पहिले आधुनिक दूरचित्रवाणी कलामंदिर भारताच्या राजधानीत उभारले. त्यानुसार दोन हजार दूरचित्रवाणी संचांना एकाच वेळी दूरदर्शनाचा लाभ होईल आणि त्याचे क्षेत्र ४० किमी असेल, अशी तांत्रिक व्यवस्था करण्यात आली.

याच साली केंद्र सरकारच्या माहिती आणि नभोवणी खात्याने डॉ.एस.भगवंतम् यांच्या अध्यक्षतेखाली दूरचित्रवाणी विकास, प्रसार, नवीन पद्धती व तंत्र यांच्या अभ्यासासाठी एक समिती नेमली. या समितीने आपला अहवाल सादर करून सबंध देशभर उच्च दर्जाचे दूरदर्शन कार्यक्रम दिसावेत, म्हणून तेरा परिवाह योजनेचा विकास- थर्थीन चॅनेल प्लॅन यावर भर देण्याची व दूरचित्रवाणीच्या स्वायत्त निगमासंबंधीची शिफारस केली. त्यानंतर डॉ.अशोक के.चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने १९६४मध्ये नेमलेल्या दुसऱ्या समितीने आपला अहवाल १९६६मध्ये केंद्र सरकारकडे सादर केला.

त्या समितीने नभोवाणी व दूरचित्रवाणी या दोहोंसाठी दोन स्वायत्त निगम निर्माण करण्याची शिफारस केली. तसेच निरक्षरता घालविण्याचे व शिक्षणप्रसाराचे एक प्रभावी साधन म्हणून दूरचित्रवाणीचा सर्व देशभर पुढील दहा वर्षांत झपाट्याने प्रसार करण्यात यावा, असे सुचविले. सरकारने या दोन समित्यांच्या काही मौलिक सूचना मान्य केल्या. तथापि दोन स्वायत्त निगम स्थापण्याची शिफारस स्वीकारली नाही.

दूरदर्शनवरून बातमीपत्राची नियमित सेवा १९६५ पासून सुरू झाली. १९७२ मध्ये दूरदर्शन सेवा मुंबईत आली. तीन वर्षांनी चेन्नई, श्रीनगर, अमृतसर व लखनौ या शहरांमध्ये दूरदर्शनचे प्रसारण सुरू झाले. उपग्रहाद्वारे सामाजिक शिक्षण अथवा अत्याधुनिक तंत्रज्ञानातून सामाजिक शिक्षण देण्याचा पहिला प्रयोग भारतात केला गेला.

सॅटेलाईट इंस्ट्रक्शनल टेलेव्हिजन एक्सपरीमेंटची चाचणी सन १९७५-७६ या वर्षी घेण्यात आली. याद्वारेच जगात प्रथमच सामाजिक शिक्षणाचा प्रचार घरोघरी करण्यात आला. सन १९८२मध्ये दिल्ली आणि अन्य ट्रान्समिटर्स दरम्यान उपग्रहांमार्फत प्रसारण सुरू करण्यात आले.

या बरोबरच राष्ट्रीय प्रसारणास सुरुवात झाली. रंगीत दूरदर्शनचे युगही याचवेळी सुरू झाले. सन १९८२मध्ये दूरदर्शन राष्ट्रीय प्रसारक म्हणून अस्तित्वात आले. पूर्वी खाजगी टीव्ही वाहिन्या नव्हत्या, त्यामुळे दूरदर्शन ही एकमेव वहिनी होती. त्यावरील कार्यक्रम खुप लोकप्रिय झाले. जसे की सन १९८७ मध्ये रामायण, महाभारत, शक्तिमान, श्रीमान श्रीमती आदी शृंखलांनी तर लोकांना अक्षरशः वेडावून सोडले होते.

दूरदर्शन संस्थेची उद्दिष्टे आकाशवाणीच्या उद्दिष्टांप्रमाणेच आहेत- देशी, विदेशी बातम्यांचे संकलन करून बातमीपत्रे प्रक्षेपित करणे. देशाचा योजनाबद्ध सर्वांगीण विकास कसा होईल, याबद्दलचे विचार व माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे प्रत्यक्ष शैक्षणिक धडे, कृषिविषयक प्रात्यक्षिके इत्यादींद्वारे कृषिशिक्षण देणे, कुटुंबनियोजन व तत्संबंधीची माहिती देणे, मनोरंजन करणे वगैरे विविध स्वरूपाची उद्दिष्टे आहेत.

मनोरंजन व माहितीकरीता नभोनाट्य, देशी अथवा विदेशी चित्रपट, संगीताचे बहुविध कार्यक्रम, चर्चासत्रे, व्याख्याने कार्यक्रम ठेवण्यात येतात. दूरदर्शन ही दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम प्रक्षेपित करणारी भारत सरकारची एक संस्था आहे. माहिती व नभोवाणी खात्यापासून स्वतंत्ररीत्या दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम संयोजित करण्यासाठी दूरदर्शन ही संस्था १ एप्रिल १९७६ रोजी स्थापन करण्यात आली. भारतात दूरचित्रवाणीचा विकास १९६० नंतरच घडून आला.

१५ सप्टेंबर १९५९मध्ये पहिले दूरचित्रवाणी केंद्र यूनेस्कोच्या मदतीने प्रायोगिक स्तरांवर दिल्ली येथे सुरू करण्यात आले. प्रथम त्याचे स्वरूप एक मार्गदर्शी दूरचित्रवाणी प्रकल्प असे होते आणि त्यावरून आठवड्यातून फक्त शैक्षणिक कार्यक्रम होत. हळूहळू ते सर्वांगांनी परिपूर्ण करण्यात आले. फोर्ड प्रतिष्ठानातर्फे शैक्षणिक दूरचित्रवाणीचा भारतात कसा प्रसार होईल? हे पाहण्याकरिता एक मंडळ १९६० साली आले. मंडळाने दिल्ली दूरचित्रवाणी व तिचा परिसर यांचा अभ्यास करून भारतातील शैक्षणिक दूरचित्रवाणीकरिता एक आराखडा तयार करून दिला. त्याप्रमाणे माध्यमिक शाळांत नियमित शालेय पाठांचे कार्यक्रम दाखविण्यात येऊ लागले. दूरदर्शन सेवारंभ दिनाच्या सर्व टिव्हीप्रेमींना हार्दिक शुभेच्छा !!

■ ■ ■ ■

# अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस.



मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते.

घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली.

पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले.

१९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली.

म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले.

विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती.

मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले.

१४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■ ■

# प्रभु सदैव आपणास पाहत आहेत

काही लोक जीवन जगत असतांना ईश्वर नेहमी आपल्या बरोबर आहे या बाबतीत अनभिज्ञ असतात. जर आपण दिवसभरात दुसऱ्याचा व्यवहारकडे लक्ष दिले तर आपल्या लक्षात येईल कि आपल वर्तन वेगळे होते.

आपल्या वागण्यात वेगळपण असते. जेव्हा ते लोक आपल्याला पाहत असतात, ज्यांना आपल्याला खुश करायचे असते, भले ते आपले मालक, वरिष्ट अथवा अन्य कोणी असो, परंतु जेव्हा आपणास हे समजते कि प्रभु आपणास पाहत आहे, तेव्हा आपण अधिक चांगल्या प्रकारे व्यवहार करणार नाही का?

जेव्हा कोणी आपल्याकडे पाहत असतो तेव्हा आपण त्यांच्याशी चांगला व्यवहार करतो हे स्वाभाविक आहे. जेव्हा आपण काम करत असतो, किंवा आपण शेजाऱ्यानं बरोबर अथवा मित्रां बरोबर असतो, आपण त्यांच्याशी असा व्यवहार करतो ज्यामुळे त्यांना आपण एक चांगले माणूस आहे असे वाटेल. त्यावेळी आपण आपल्या वाईट सवई लपविण्याचा प्रयत्न करीत नाही का?



संत राजिंदरसिंहजी महाराज

जर आपण हे समजून घेतले कि जे आपण दुसऱ्यांपासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतो, ते परमेश्वरा करीता एखाद्या खुल्या पुस्तका प्रमाणे आहे. तेव्हा आपण नेहमी हे लक्षात ठेवले पाहिजे कि आपण नेहमी दुसऱ्यांशी चांगले वागावे. लोकांना असे वाटते कि परमेश्वर कुठे आहे? संत आणि महात्म्यांनी आपल्याला नेहमी हे शिकविले आहे कि परमात्मा आपल्या अंतरी आहे. आपण जिथे आहोत आणि जसे आहोत, परमात्मा सर्व काही पाहत आहे.

परमेश्वरी शक्ति आपल्याला जीवन देत असते. आपले शरीर जड तत्वानी बनलेले आहे, हे आपले खरे रूप नाही, जी शक्ति आपल्या शरीराला चालविते, जिला आत्मा म्हटले गेलेले आहे, तीच परमात्म्याची अंश आहे. आपला आत्मा परमेश्वराचा अंश असल्या कारणाने, आपले प्रत्येक विचार, प्रत्येक बोल आणि प्रत्येक कृती परमेश्वराला माहीत असते.

आपण याला एक कॉम्प्युटर नेटवर्क प्रमाणे विचार करू शकतो. जो मास्टर कॉम्प्युटर अथवा मुख्य कॉम्प्युटर असतो, तो नेटवर्क च्या बाकी कॉम्प्युटर बरोबर जोडलेला असतो. जो ऑपरेटर मुख्य कॉम्प्युटरवर काम करीत असतो, तो प्रत्येक कॉम्प्युटर मध्ये काय चालू आहे, त्याची सर्व माहिती पाहू शकतो.

नेटवर्कच्या इतर कॉम्प्युटरला हे माहीत नसते, कि मुख्य कॉम्प्युटर ऑपरेटर इतर कॉम्प्युटर चालणारी सर्व माहिती असते. जर त्यांना हे माहीत आहे कि त्यांना कोणाचा ई-मेल किवा टेक्स्ट मेसेज उघडून पाहण्याची परवानगी आहे, तर ते कदाचित अधिक सावध राहतील.

परंतु ते या गोष्टी पासून अनभिज्ञ असतात आणि ते असे काही लिहितात, टाईप करतात कि जे कोणालाही सांगावयाचे नसते .

अशा प्रकारे परमात्मा सुध्दा, सृष्टीचा नेटवर्कचा मुख्य कॉम्प्युटर ऑपरेटर आहे आणि आपला आत्मा त्या नेटवर्क मधील बाकी कॉम्प्युटर शी जोडलेले आहे. जो पण आपण विचार करतो, बोलतो आणि कार्य करतो, ते सर्व परमात्म्याला माहीत असते. जर आपणास या गोष्टीची जाणीव झाली कि परमात्मा आपल्याला सदैव पाहत आहे, आपले विचार आणि शब्द ऐकत आहे आणि आपली कृती पाहत आहे, तर विचार करा कि आपल्या वागणुकीत लवकरात लवकर सुधारणा होईल.

आपण या गोष्टीवर खूप लक्ष दिले पाहिजे कि आपण अहिंसा, सत्यता, पवित्रता आणि नम्रता इत्यादि गुणांच्या बाबतीत उल्लंघन करणार नाही. जर आपण आपल्या चुका सुधारल्या, दररोज ध्यान-अभ्यासासाठी वेळ दिला आणि निष्काम सेवा पण केली, तर निश्चित रूपाने आपली अध्यात्मिक प्रगती खूप वेगाने होईल.

■ ■ ■ ■

# मॅरेथॉन, अवार्ड फंक्शन, जाहिरात किंवा टी.व्ही. प्रोग्राम स्पॉन्सरशिप हे CSR खर्च आहेत का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना





गेल्या काही आठवड्यापासून आपण कंपनीच्या CSR Policy बद्दल बघत आहोत. आज ही आपण या बद्दलची मात्र नवीन माहिती नेहमीच्या प्रश्नोतर रुपात बघणार आहोत, जे व्यवहारात करदात्यांना तथा ज्ञानपिपासू वाचकांना उपयोगी ठरावी.

**प्रश्न** : कंपनीने CSR कार्यासाठी केलेली कोणती माहिती आणि कुठे दाखवणे कायद्याने गरजेचे आहे?

■ कंपनी कायद्याच्या कलम 135 (5) प्रमाणे खालील तीन गोष्टी कंपनीला दाखवणे आवश्यक आहे, नसता कंपनीवर कायदेशीर कारवाईस सामोरे जाण्याची पाळी येऊ शकते.

1) पहिली बाब अशी की सरासरी नफ्याच्या 2% एवढा नफ्याचा आकडा वार्षिक अहवाला मध्ये जे CSR साठी आहे. त्याचा उल्लेख कंपनीला आपल्या बोर्ड रिपोर्ट मध्ये दाखवणे आवश्यक आहे.

2) दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कंपनीज (अकाऊंटस) रुल्स 2014 च्या नियम 12 (1इ) अनुसार कंपनीज ना फडउ ला रिपोर्ट दाखल करणे गरजेचे आहे. हे रिपोर्ट फार्म CSR 2 मध्ये भरावे लागते तथा यात चालू वर्षाचा निकाल नफा तथा गेल्या तीन वर्षाचा नफा तथा CSRसाठी तीन वर्षाचा सरासरी नफा ROC ला कळवणे अत्यंत आवश्यक आहे, नसता त्या संबंधित कंपनीवर कारवाई होऊ शकते.

3) तसेच नोटिफिकेशन नंबर GSR 207 (ए) 24 मार्च 21 अनुसार , 1 एप्रिल 21 नंतर त्या कंपनी ने CSR वर किती खर्च केला हे प्रॉफिट ॲण्ड लॉस अकाऊंट मध्ये दाखवणे आवश्यक आहे. वर कंपनी ने वेळोवेळी ROC ला कळवावे,नसता कारवाई होऊ शकते असे आले आहे.

**प्रश्न** : ROC म्हणजे नेमके काय?

■ ROC चा अर्थ Registrar of Companies असा आहे. रजिस्टार ऑफ कंपनीज हे एक सरकारी ऑफिस आहे. हे ऑफिस Ministry of Corporate affairs म्हणजे सरकारच्या अंतर्गत चालते. हे कार्यालय कंपनीज तथा एल.एल.पी. इ. या वर देखरेख करते. एल. एल.पी. याला लिमिटेड लायबीलिटी पार्टनरशिप असे म्हणतात. हे कॉर्पोरेट अफेअर्स कार्यालय मंत्रालयाच्या अंतर्गत येते, जे भारतातील कंपन्याचे प्रशासन हाताळते.

**प्रश्न** : मॅरेथॉन, अवार्ड, इ.खर्च इत्यादी CSR खर्च आहेत का?

■ नाही, मॅरेथॉन चा खर्च अवार्ड फंक्शन इ.खर्च कंपनीने केला असेल तथा असा खर्च CSR मध्ये दाखवला असेल तर कायद्याने चालत नाही. असा खर्च कंपनी CSRअंतर्गत करू शकत नाही.

**प्रश्न** : जाहिरात किंवा T.V. प्रोग्रॅम ची स्पॉन्सरशिप खर्च CSR खर्च होऊ शकतो का?

■ जनरल सरक्युलर न. 21/ 2014 तारीख 18/6/2014 च्या पॅरा न. (ii) अनुसार तथा सरक्युलर नं. 01/2016 तारीख 12 जानेवारी 2016 मिनिस्ट्री ऑफ कॉरपोरेट अफेअर्स यांनी स्पष्ट केले आहे की कंपनी ला असा खर्च CSR मध्ये दाखवता येणार नाही. जर कंपनी ने CSR खर्च आपल्या रिपोर्ट मध्ये दाखवले नाही किंवा चुकीचे आकडे दाखवले, तर त्या कंपनीवर कायदेशीर काय कारवाई होऊ शकते. तथा पेनाल्टी काय भरावी लागते, इत्यादी अनेक विषयावर आपण पुढील काही लेखात चर्चा करणार आहोत.

■ ■ ■ ■

## अशोकायन

### गणेश वंदना

**प्रथम पुजेचा**
**मान तुम्हा**
**अगाध तुमची**
**त्रिभुवनी किर्ती ..**

**कार्यारंभी करितो**
**हृदयस्थ प्रार्थना**
**विघ्नहरा पुरवा**
**माझी कामना ..**

**बुध्दीची देवता तू**
**देईजे मम सद्बुध्दी**
**कृपादृष्टीने होवो**
**माझी कार्य सिध्दी ..**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### विचारधारेवरची निष्ठा कधीचीच संपली..

**वाचक लिहितात**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते सीताराम येचुरी यांचे परवाच निधन झाले. त्यांच्या निधनावर शोक व्यक्त करताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांची वाचण्यात आलेली पोस्ट मनाला भावली. ठाकरे म्हणतात, एकदा का एखादी विचारधारा स्वीकारली की त्या विचारधारेवर निष्ठा असलेली माणसं फक्त कम्युनिष्ट पक्षातच दिसतात.

आजच्या राजकीय परिस्थितीत नेमके याचे उलटे दिसते. सरड्यालाही लाज वाटावी याप्रमाणे राजकीय नेते पक्ष आणि निष्ठा बदलतात. मतदारांसमोर जाताना एखाद्याा पक्षाचे गोडवे गातात, कालांतराने पक्ष बदलला की सोडून गेलेल्या पक्षाच्या ज्येष्ठांना शिव्या शाप देतात. आजकालच्या नेत्यांनी कधीतरी पक्षाची विचारधारा, नेमके कोणासाठी आणि कशासाठी काम करायचे? याचा अभ्यास केलेलाच नसतो. तसेही राजकीय क्षेत्र मोठ्या प्रमाणात नासले आहे. विचारधारा, निष्ठा पाळतो कोण? केवळ आपले घर भरण्यासाठी आणि स्वार्थासाठी राजकारणाचा वापर होतो आहे.

■ जनार्धन खंडागळे, नागपूर.

# TATA.ev ईव्हींवरील अद्भुत किमतींसह साजरा करत आहे फेस्टिवल ऑफ कार्स

**मुंबई, १४ सप्टेंबर :** TATA.ev या भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटी रिवॉल्यूशनच्या अग्रणी कंपनीने आपल्या फेस्टिवल ऑफ कार्स सेलिब्रेशन्सचा भाग म्हणून Tiago.ev, Punch.ev आणि Nexon.ev या सर्वाधिक विक्री होणाऱ्या मॉडेल्सवर अभूतपूर्व किमतींची घोषणा केली आहे. ग्राहकांसाठी ईव्ही अधिक उपलब्ध होण्याजोगे करण्यावर लक्ष केंद्रित करत . साठी किंमत जवळपास ३ लाख रूपयांपर्यंत आणि Punch.ev साठी किंमत जवळपास १.२० लाख रूपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे.

TATA.ev ग्राहकांना स्थानिकीकरण व तंत्रज्ञान सुधारणांचे फायदे देत आहे आणि गेल्या महिन्यात लाँच करण्यात आलेल्या Curvv.ev सह आयसीई किंमतीत समानता आणण्यामध्ये यशस्वी ठरली आहे. या स्पेशल ऑफरसह TATA.ev सर्वाधिक विक्री होणाऱ्या Nexon.ev च्या किमती आयसीई मॉडेल्सच्या किमतीप्रमाणे सादर करत आहे, जे मर्यादित कालावधीसाठी आहे. याव्यतिरिक्त, Punch.ev आणि Tiago.ev वरील फेस्टिव्ह ऑफर्सनी देखील या वेईकल्सच्या किमती जवळपास त्यांच्या आयसीई काऊंटरपार्टसच्या किमती इतक्या केल्या आहेत. या आकर्षक किमतींव्यतिरिक्त, ग्राहकांना अत्यंत कमी कार्यसंचालन खर्च, शांतमय व आरामदायी ड्राइव्ह, तसेच वरील दोन श्रेणींमधील वैशिष्ट्यांचा आनंद घेण्याची संधी मिळेल.

ग्राहक देशभरातील ५,५०० हून अधिक टाटा पॉवर चार्जिंग पॉइण्ट्सपैकी कोणत्याही पॉइण्टवर ६-महिने मोफत चार्जिंगचा आनंद घेऊ शकतात, ज्यामुळे इंटर-व इंट्रा-सिटीप्रवास विनासायास, तसेच मोफत आनंद घेता येईल. ग्राहकांसाठी आकर्षक किमतींमध्ये त्यांची आवडती ईव्ही बुक करण्यासोबत मालक बनण्याची ही उत्तम वेळ आहे, जेथे ही स्पेशल फेस्टिव्ह ऑफर फक्त ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहे.

या अभूतपूर्व सेलिब्रेशनची घोषणा करत टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लि.चे चीफ कमर्शियल ऑफिसर विवेक श्रीवत्स म्हणाले, TATA.ev मध्ये आमचा अडथळ्यांना दूर करत आणि नियमित कार ग्राहकांसाठी ईव्ही अधिक उपलब्ध करून देत ईव्हींना मुख्य प्रवाहात आणण्याचा एकमेव उद्देश आहे. या स्पेशल, मर्यादित कालावधीच्या किमतींसह आम्ही ईव्हींचे मालक बनण्यासाठी उच्च खर्चाला कमी करत आहोत आणि ईव्हींच्या किमती जवळपास पेट्रोल आणि / किंवा डिझेलवर चालणाऱ्या वेईकल्सच्या किमती इतक्याच करत आहोत. ग्राहकांना आता आमच्या आधुनिक, उच्च-कार्यक्षम, शून्य उत्सर्जन आणि झीरो नॉइज ईव्ही ड्राइव्ह करण्याचा आनंद घेण्याची संधी आहे. या ईव्ही कमी कार्यसंचालन खर्च आणि ड्रायव्हिंगच्या वेळी आरामदायीपणा देतात. ग्राहकांना टाटा पॉवर चार्जर्स येथे पूरक सार्वजनिक चार्जिंग ऑफरिंग म्हणून देखील अतिरिक्त फायदा मिळेल. आम्ही ग्राहकांचे त्यांच्या जवळच्या टाटा मोटर्स आणि TATA.ev शोरूम्समध्ये स्वागत करण्यास उत्सुक आहोत, जेथे ते ईव्ही क्रांतीमध्ये सामील होतील.

# बंधन म्युच्युअल फंडने नवीन बंधन बिझनेस सायकल फंड लाँच केला

**नागपूर, १० सप्टेंबर :** बंधन म्युच्युअल फंडने बिझनेस सायकल-आधारितगुंतवणूक थीमवर आधारित बंधन बिझनेस सायकल फंड ही ओपन-एंडेड इक्विटी योजना सुरू करण्याची घोषणा केली.आर्थिक चक्राच्या विविध टप्प्यांनुसार निधी प्रभावीपणे क्षेत्र वाटप समायोजित करतो विस्तार, शिखर, आकुंचन आणि मंदी, ज्याचा उद्देश विकासाच्या संधी काबीज करणे आणि बाजारातील विविध परिस्थितींमध्ये जोखीम व्यवस्थापित करणे आवश्यक आहे.नवीन फंड ऑफर (NFO) मंगळवार, १० सप्टेंबर २०२४ रोजी गुंतवणुकीसाठी उघडेल आणि मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ रोजी बंद होईल.बंधन बिझनेस सायकल फंडात गुंतवणूक परवानाधारक म्युच्युअल फंड वितरक, आर्थिक सल्लागार, ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा थेट https://bandhanmutual.com/nfo/bandhan-business-cycle-fund/ वर करता येते.

या नवीन फंडच्या लाँचबद्दल भाष्य करताना, बंधन एएमसीचे सीईओ श्री विशाल कपूर म्हणाले, बंधन बिझनेस सायकल फंड उदयोन्मुख संधी मिळवण्यासाठी आर्थिक चक्र, इक्विटी मार्केट ट्रेंड आणि सेक्टर डायनॅमिक्सचा वापर करून ३६० डिग्रीचा दृष्टिकोन स्वीकारतो.हा फंड पोर्टफोलिओ वैविध्य वाढविण्यासाठी डिझाइन केला आहे आणि बाजाराच्या परिस्थितीवर आधारित क्षेत्र वाटप समायोजित करून आर्थिक चढउतारांशी संबंधित जोखीम व्यवस्थापित करताना जास्तीत जास्त परतावा मिळवण्याचा हेतू आहे.बंधन बिझनेस सायकल फंड हा दीर्घकालीन गुंतवणुकीच्या क्षितिजासह आणि उच्च जोखमीची भूक असलेल्या गुंतवणूकदारांसाठी आदर्श आहे ज्यांना त्यांच्या पोर्टफोलिओला सेक्टर-रोटेशन स्ट्रॅटेजीसह वैविध्यपूर्ण करायचे आहे जे आर्थिक चक्राचा लाभ घेऊन परतावा वाढवू शकतात.

व्यवसाय चक्रे आर्थिक वाढीचा नैसर्गिक ओहोटी आणि प्रवाह प्रतिबिंबित करतात, प्रत्येक टप्पा विविध क्षेत्रांना अनन्य प्रकारे प्रभावित करते.उदाहरणार्थ, आर्थिक आणि रिअल इस्टेट विस्ताराच्या टप्प्यात चांगली कामगिरी करू शकतात, तर ग्राहक उत्पादने आणि उपयुक्तता सेवा बाजारातील आकुंचन दरम्यान अधिक लवचिक असतात.टॉप-डाउन सेक्टर निवडीच्या दृष्टिकोनासह, फंडाचे लक्ष्य निफ्टी ५०० इंडेक्समध्ये वेटेजद्वारे टॉप ५ पैकी किमान ३ क्षेत्रांमध्ये लक्षणीय बदल घडवून आणण्याचे आहे.हे १५% पर्यंत उच्च रोख पोझिशन्सद्वारे व्यवस्थापित तरलतेसह, मजबूत व्यवसायांवर लक्ष केंद्रित करून, बाजार भांडवलीकरणामध्ये विविधता प्रदान करते.त्याचे क्षेत्र वाटप धोरणात्मकदृष्ट्या अनुकूल करून, बंधन बिझनेस सायकल फंड प्रचलित आर्थिक परिस्थितीशी सुसंगत गुंतवणूक ठेवत जास्तीत जास्त परतावा मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवते.

# शाश्वत हरित उपक्रमांवर भर देत एनएलसी इंडियाकडून आपले कॉर्पोरेट प्लॅन २030 आणि व्हिजन २047 या उपक्रमांना नव्याने चालना

**नवी दिल्ली, १४ सप्टेंबर :** केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री, जी. किशन रेड्डी यांच्या मार्गदर्शनाद्वारे, देशाने शाश्वत आणि अल्प-कार्बनच्या भविष्याच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे.

COP२६ मध्ये संकल्प केल्यानुसार भारत आपल्या विकास लक्ष्यांच्या दिशेने आगेकूच करताना अल्प-कार्बन उत्सर्जन वाटचालीसाठी वचनबद्ध आहे. २०३० पर्यंत ५०० गीगावॉट बिगर-जीवाश्मऊर्जा क्षमता गाठण्याचे राष्ट्राचे उद्दिष्ट आहे. एक अग्रगण्य आणि जबाबदार केंद्रीय सार्वजनिक उपक्रम म्हणून, एनएलसी इंडिया लिमिटेडची ऊर्जा सुरक्षा आणि शाश्वतता ही दुहेरी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी २०३० पर्यंत तिच्या एकूण वीज निर्मिती क्षमतेत तिप्पट वाढ करण्याची योजना आहे.

एनएलसीआयएलची नवीकरणीय ऊर्जानिर्मितीची क्षमता १.४३ GW वरून १०.११ GW पर्यंत वाढवून, एकूण नियोजित क्षमतेच्या ५०% नवीकरणीय ऊर्जा अशा प्रकारच्या मिश्र ऊर्जानिर्मितीचे उद्दिष्ट आहे.

वरील योजनेत नवीकरणीय स्वरुपात ५०,००० कोटी रुपये गुंतवणुकीची व्यवस्था आहे ज्यामुळे भारताच्या नवीकरणीय लक्ष्याला पाठबळ मिळेल आणि २०७० पर्यंत शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य होईल. हे वाढीव लक्ष्य हवामानविषयक कृतीसाठी भारताचे योगदान आणि वचनबद्धता म्हणून COP २६ शिखर परिषदेत घोषित करण्यात आलेल्या सरकारच्या पंचामृत उपक्रमासोबत जुळणारे आहे.

संपूर्णपणे एनएलसीआयएलची अनुदानित असलेली आणि नवीकरणीय ऊर्जानिर्मितीवर विशेष भर देण्यासाठी स्थापन झालेली निगेल (NLC India Green Energy Limited) कंपनी तिच्या इच्छित नवीकरणीय ऊर्जा कार्यक्षेत्रात नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहे. सध्या २ गिगावॉट नवीकरणीय ऊर्जा केंद्रांची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे. स्पर्धात्मक बोली आणि हरित ऊर्जा क्षेत्रात उदयाला येणाऱ्या संधींची चाचपणी करण्यामध्ये सहभागी होऊन आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार करण्याचे निगेलचे उद्दिष्ट आहे. या विस्तारामुळे भारताचे पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी होईल, ऊर्जा निर्मितीत विविधता येईल आणि कोळसा आयात कमी होईल.

त्याशिवाय देशभरात संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा करणे सुनिश्चित करण्यासाठी मदत होईल.

एनएलसीआयएलने आपल्या ऊर्जा निर्मिती कार्यक्षेत्रामध्ये २०३० मध्ये नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ५०% वरून २०४७ पर्यंत ७७% पर्यंत वाढवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ज्यामुळे कंपनीला २०७० पर्यंत निव्वळ शून्य(उत्सर्जन) गाठता येईल. २०३० नंतर खूप बदललेल्या ऊर्जा लँडस्केपसह, NLCIL नवीन थर्मल पॉवरची अपेक्षा करत नाही. क्षमता जोडणे त्याऐवजी, विद्यमान थर्मल पॉवर स्टेशन्समधून उत्सर्जन कमी करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम डोमेनमध्ये मार्गदर्शक कृती असेल. २०३० नंतर खूपच बदललेल्या ऊर्जा परिदृश्यासह, NLCIL नवीन औष्णिक ऊर्जा प्रकल्पाची भर घालण्याच्या विचारात नाही. त्याऐवजी सध्या कार्यरत असलेल्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पातील उत्सर्जन कमी करणे हेच या कंपनीच्या वाटचालीचे सूत्र असेल.

# स्पेल बी २०२४ च्या १४ व्या आवृत्तीसह एसबीआय लाइफ इन्शुरन्स आणि मिर्ची परतले

**मुंबई, १४सप्टेंबर :** भारतातील सर्वात विश्वासार्ह जीवन विमा कंपन्यांपैकी एक, एसबीआय लाइफ इन्शुरन्सने मिर्ची सोबत भागीदारी करत, एसबीआय लाईफ स्पेल बी २०२४ ची १४ वी आवृत्ती स्पेलबाउंड लाँच करण्याची अभिमानाने घोषणा केली. वर्षानुवर्षे भारतातील तल्लख बुद्धिमत्ता प्रकाशात आणणारी, स्पेल बी यंदा एक विस्तृत दृष्टी घेऊन समोर आले आहे. केवळ शब्दलेखनाचे कर्तृत्व समोर आणण्यापेक्षा ते आणखी एक संधी घेऊन परतले आहेत. तरुण मनांना भविष्यात महान नेता बनवण्याच्या दृष्टीने शिकवणे, सर्जनशीलता आणि प्रगतीच्या दृष्टीने वाटचाल करणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. स्पर्धेची १४वी आवृत्ती ३० शहरांमध्ये, ५००+ शाळांमध्ये होणार असून यात ३ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. भारतातील अव्वल ५० विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. सर्वोच्च कामगिरी करणाऱ्यांना देशव्यापी मान्यता मिळेल; तर अंतिम विजेत्याला स्पेलमास्टर ऑफ इंडिया २०२४ असा मुकुट देण्यात येईल. विजेतेपदाच्या सन्मानापलीकडे, विजेत्याला १ लाख रुपयांचे भव्य बक्षीस आणि डिस्नेलँड, हाँगकाँगची संस्मरणीय सहल अनुभवायला मिळेल.

या वर्षीची थीम, बी स्पेलबाउंड! ही फक्त एक कॅचफ्रेज नाही तर त्याहून जास्त आहे; या व्यासपीठाचे सखोल ध्येय ते प्रतिबिंबित करते. स्पेल बी २०२४ अजूनही सर्वोत्तम स्पेलर्स शोधण्यावर लक्ष केंद्रित करत असतानाच, ते आता भविष्यातील नेत्यांचे पालनपोषण करण्याला तितकेच महत्त्व देते. शब्द केवळ अक्षरे नसून ती सक्षमीकरणाची साधने आहेत, यावर एसबीआय लाइफचा विश्वास आहे. हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना त्या साधनांसह सज्ज करण्याचा प्रयत्न करते -त्यांना शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्याचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जीवनाच्या व्यापक आकांक्षांना नेव्हिगेट करण्याचा आत्मविश्वास प्रदान करते.

या व्यासपीठाचे महत्त्व सांगताना, एसबीआय लाइफ इन्शुरन्स मधील कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स आणि सीएसआरचे ब्रँड प्रमुख रवींद्र शर्मा म्हणाले, ; एसबीआय लाइफमध्ये, आम्ही नेहमी संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या खऱ्या क्षमता ओळखता येतील. स्पेल आणि बी च्या भागीदारीने आम्हाला हे व्हिजन देशव्यापी तरुण मनापर्यंत पोहोचवण्याची संधी दिली. गतवर्षी मिळालेल्या जबरदस्त यशाने या व्यासपीठाच्या परिवर्तनीय सामर्थ्यावर आमचा विश्वास दृढ झाला आहे. स्पेल मास्टर्स ऑफ इंडिया सोबतच्या आमच्या सातत्यपूर्ण भागीदारीनंतर आम्ही केवळ उत्कृष्ट स्पेलर्सच निर्माण करत नाही तर समाजावर प्रभाव टाकणारे नेते देखील निर्माण करतो.

ते पुढे म्हणाले, या स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येक स्पर्धकाच्या केवळ बौद्धिक क्षमताच तीक्ष्ण होत नाहीत तर धैर्य, सचोटी आणि नाविन्य यासारख्या मूल्यांची सखोल समज निर्माण होते. या प्लॅटफॉर्मद्वारे, आम्ही भारतातील सर्वोत्तम स्पेलर्स शोधत आहोत आणि भविष्यातील नेत्यांना आकार देत आहोत जे स्पेलिंगच्या पलीकडे जात पारदर्शकता, धैर्य, नम्रता, सचोटी, नाविन्य आणि टिकाव या मूलभूत मूल्यांना मूर्त रूप देतील. ही प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातील रचनात्मक मूल्ये आहेत जी त्यांना त्यांच्या समवयस्कांचा आदर करतानाच त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मदत करतात.

या कार्यक्रमाच्या लॉन्चिंगवर टिप्पणी करताना, पूजा गुलाटी, इव्हीपी आणि राष्ट्रीय संचालक आयपीज म्हणाल्या, अर्थपूर्ण आणि आरोग्यदायी शिक्षण-आधारित गुणधर्मांद्वारे शाळांशी संलग्न राहणे हे मिर्चीसाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. स्पेल बी ही आमची प्रमुख मालमत्ता आहे गेल्या १३ हंगामात आम्ही त्यांचे सहयोगी असल्याचा आम्हाला अभिमान आहे. या वर्षी देखील आम्ही आणखी बरीच मूल्ये आणण्यासाठी उत्सुक आहोत. संपूर्ण भारतातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना चालना देणारा अनुभव या वर्षी प्रेक्षकांना मंत्रमुग्धतेच्या पुढच्या पातळीपर्यंत नेईल. सीझन १४ हा या कार्यक्रमाचा सर्वात मोठा हंगाम असेल, ज्यात भारतातील ५०० हून अधिक शाळांचा समावेश असेल.

प्रगतीचा मंत्र देणारा एक उपक्रम म्हणून, स्पेल बी स्पर्धा बौद्धिक वाढीला चालना देण्यासाठी आणि तरुणांमध्ये नेतृत्व आणि जीवन कौशल्ये वाढवण्याच्या एसबीआय लाइफच्या वचनबद्धतेला मूर्त रूप देते.

# व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेडने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी


**मुंबई, १४ सप्टेंबर :** व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेड (पूर्वी ICC रियल्टी (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे), व्यवसाय आणि विश्रांती विभागांमध्ये लक्झरी ऑफरिंगवर प्राथमिक लक्ष केंद्रित करणाऱ्या हॉस्पिटॅलिटी कंपनीने ("DRHP") बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे (स्वत:) ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. कंपनीच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये प्रत्येकी य१ च्या दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअर्सच्या ताज्या इश्यूचा समावेश आहे आणि एकूण य२,००० कोटींपर्यंतचा हा आयपीओ आहे. एकूण ऑफर आकारात प्रत्येकी य१ च्या दर्शनी मूल्याच्या एकूण य२,००० कोटींपर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेड ही पूर्वी ICC रियल्टी (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या नावाने ओळखली जात होती. ही कंपनी पंचशील रियल्टीच्या हॉस्पिटॅलिटी विभागाच्या रूपात स्थापन करण्यात आली होती. हा पुण्यातील रिअल इस्टेट समूह असून, ज्याची व्यावसायिक, किरकोळ, लक्झरी निवासी आणि डेटा सेंटर विभागांमध्ये उपस्थिती आहे. २०१७ मध्ये कंपनीतील ५०% भागभांडवल संपादन केल्यानंतर, BRE Asia -(पूर्वी Xander Investment Holding XVI Limited म्हणून ओळखले जाते), ब्लॅकस्टोनची संलग्न कंपनी, कंपनीमध्ये ५०% भागधारक बनली.

व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेड ही एक हॉस्पिटॅलिटी कंपनी आहे, ज्यामध्ये व्यवसाय आणि विश्रांती विभागांमध्ये लक्झरी ऑफरवर प्राथमिक लक्ष केंद्रित केले जाते. सर्व हॉस्पिटॅलिटी मालमत्ता मॅरियट, हिल्टन, मायनर आणि यटमॉसफियरसह जागतिक ऑपरेटरद्वारे चालविल्या जातात किंवा फ्रँचायझी केल्या जातात. लक्झरी हॉस्पिटॅलिटी मालमत्तांमध्ये जेडब्ल्यू मॅरियट, पुणे, द रिट्झ-कार्लटन, पुणे, कॉनरॅड मालदीव, अनंतरा, मालदीव आणि राया बाय यटमॉसफियर, मालदीव यांचा समावेश आहे. पोर्टफोलिओमध्ये भारत आणि मालदीवमधील ११ ऑपरेशनल हॉस्पिटॅलिटी मालमत्तांचा समावेश आहे, ३१ मार्च २०२४ पर्यंत लक्झरी, अप्पर अपस्केल आणि अपस्केल सेगमेंटमध्ये एकूण २,०३६ की आहेत, जेव्हा २००७ मध्ये ऑपरेशन सुरू केले, तेव्हा यांची संख्या केवळ ८३ होती.

व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेडकडे विविध भौगोलिक क्षेत्रांमध्ये आणि विविध हॉस्पिटॅलिटी विभागांमध्ये महत्त्वपूर्ण हॉटेल मालमत्ता विकसित करण्याचा आणि संपादन करण्याचा यशस्वी ट्रॅक रेकॉर्ड आहे. विकास आणि संपादनात आघाडी घेत कंपनीने पोर्टफोलिओ वाढविला आहे आणि गेल्या काही वर्षांत बेंगळुरू, वाराणसी आणि मालदीव यांसारख्या नवीन भौगोलिक क्षेत्रांमध्ये प्रवेश केला आहे. लक्झरी हॉस्पिटॅलिटी मालमत्तेव्यतिरिक्त, त्यांनी उच्च श्रेणीतील मालमत्ता विकसित केल्या आहेत आणि विकत घेतल्या आहेत. त्या मालमत्ता पुणे आणि बेंगळुरूमध्ये उपयुक्त ठरत आहेत. ३१ मार्च २०२४ पर्यंत ऑपरेटिंग पोर्टफोलिओमध्ये त्यांनी विकसित केलेल्या १,३३१ कीजसह सात हॉस्पिटॅलिटी मालमत्ता आणि ७०५ कीज असलेल्या चार हॉस्पिटॅलिटी मालमत्तांचा समावेश आहे, ज्या त्यांनी विकत घेतल्या आहेत. विस्ताराचा भाग म्हणून २०१९ पासून १,०७० की जोडल्या आहेत, यात ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या पोर्टफोलिओमधील ५०% पेक्षा जास्त कीजचा समावेश आहे.

# शब्दकोडे क्रमांक १९३४



**आडवे शब्द :-**
१) प्रचीती
५) एखाद्यास फडाफडा बोलणे (वा प्र.)
९) युद्धासाठी उताविळ झालेला
१२) वेगळा
१३) गौप्यस्फोट गुप्तगोष्ठ फोडणे
१४) वरवधूची मिरवणूक
१५) घट्ट मारलेला विळखा
१७) कोवळी फांदी
१९) देवदासी
२०) गीत
२२) गोष्ट
२४) गोणपाट
२५) चपलता, नवा जोम
२८) स्क्रू ड्राइवर
३२) तादाम्य, एकरूप
३५) दोन वेळा
३६) प्रजेची खुषी
३९) गणित आणि अणुचे संशोधन करणारा ऋषी
४०) गवंडी
४१) विशेष
४२) मृत्तिका
४३) अजगर
४४) गंध
४६) रात्र
४७) स्तुती करणारा
४८) वडिलांचा भाऊ
५०) दासांचा सेवक
५३) पदर
५४) साखर, गुळाचा रस ५५) दात
५६) उन्नती, उत्कर्ष, चलती
५९) सापाने टाकलेली त्वचा
६१) काळे ज्वालाग्रही खनिज
६३) प्रजा
६५) संकोच, बंधन
६६) कैफी पदार्थ
६७) उसळणे, अन्न, पाणी घशाशी येणे
६८) जंगली
६९) धोबी
७१) मध्यम प्रमाण
७३) काम, नशीब
७४) सापाची एक जात
७५) वार्ताहर
७६) अभिप्राय

**उभे शब्द :-**
१) भाषांतर करणारा
२) मालाने भरून आणलेल्या गाड्यांची खेप
३) माराची उमटलेली खूण
४) पती
६) अस्थिर,
७) बातमी
८) जेवू घालणारा
१०) बावळट मुलगी
११) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१६) बरोबरची खूण
१८) सोने
२१) चौकशी, विचारपूस
२३) थापा मारणारा
२६) उसाचे गुऱ्हाळ
२७) अस्वल
२९) खंदक
३०) नशा आणणारा एक पदार्थ
३१) मयूर
३३) दहावी रास
३४) फ्लॅट, शहरातील छोटे घर
३५) दोन वेळा
३७) बारा वर्षाचा काळ
३८) जावई
४१) संसद सदस्य
४३) कहाणीतील गाव
४५) नम्रपणाची वृत्ती, मनधरणी
४६) गाढव
४८) कावळ्यांचे ओरडणे
४९) भरीवच्या विरुद्ध
५१) पाठविणे, हजर करणे
५२) आकाश
५४) वाघूळ, एक लहानसा प्राणी
५७) दागदागिने
५८) कष्ट करणे
६०) चलाख, हुशार
६२) सामान्य
६४) थेट, सरळ
६५) आश्रय, थारा
६८) उणेपणा, चिलखत
७०) सोन्याचा धागा
७१) पावसाची झड
७२) सारखा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सा रे ग म प: नयी आवाज, नये अंदाज में

**मुंबई, १४ सप्टेंबर :** भव्य संगीत सोहळ्ययासाठी सज्ज व्हा कारण झी टीव्हीवरील बिर्ला ओपस पेंट्यस सा रे ग म प सुरू करत आहेत नव्या आवाजांसह एक रोमहर्षक प्रवासाला, त्यांना मार्गदर्शन करतील ज्यांच्या गीतांनी भारताचा प्रत्येक मूड टिपला आहे असे मेंटॉर्स सचिनजिगर, सचेतपरंपरा आणि गुरू रंधावा

मुंबई, १३ सप्टेंबर : सा रे ग म प, भारताचा आयकॉनिक सिंगिंग रियलिटी शो हा भावी कलाकारांसाठी त्यांची कला लोकांसमोर मांडण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून दीर्घ काळापासून अस्तित्वात असून मागच्या पर्वामध्ये दर आठवड्ययाला झी म्युझिक कंपनीने ह्या नवीन उदयास येणाऱ्या कलाकारांना त्यांची मूळ ओरिजिनल सिंगल गाणी प्रदर्शित करण्याची संधीही दिली. आपल्या सुमारे तीन दशकांच्या ह्या प्रवासामध्ये शो ने भारतातील काही अतिशय सुंदर आवाज शोधून त्यांचे संगोपनही केले. आता, सा रे ग म प पुन्हा एकदा आणखी बळकट होऊन ताज्या नव्या आवाज आणि मेंटॉर्ससह आपले वचन नयी आवाज, नये अंदाज घेऊन येत आहे. ह्या शो चे प्रसारण दर शनिवार आणि रविवारी रात्री ९ वाजता करण्यात येणार असून ह्या पर्वामध्ये नावाजलेले संगीत कलाकार गुरू रंधावा, सचिनजिगर आणि सचेतपरंपरा हे मेंटॉर्सच्या रूपात तर विपुल रॉय सूत्रसंचालकाच्या रूपात दिसून येईल.

मेंटॉर्स सचिन आणि जिगर म्हणाले, आम्ही रियलिटी टीव्हीच्या नवीन क्षेत्रामध्ये प्रवेश करत आहोत आणि सा रे ग म प पेक्षा अधिक चांगला शो आम्हांला मिळूच शकला नसता. त्याशिवाय सा रे ग म प मध्ये प्रथमच मेंटॉर्सचे नवीन पॅनल पाहायला मिळेल. ह्या गुणी आणि भावी गायकांना मार्गदर्शन करण्याची आम्हांला आशा आहे, ज्यामुळे ते अधिक विकसित होतील आणि त्यांची क्षमता दाखवू शकतील. मेंटॉर्स म्हणून प्रत्येक स्पर्धकाच्या खास ताकदी आणि कौशल्ये ओळखण्यासाठी आम्ही उत्साहात आहोत, त्यामुळे त्यांची क्षमता पूर्णपणे विकसित करण्यासाठी आम्हांला त्यांची मदत करता येईल. लाँचच्या वेळेस परफॉर्म करताना आम्हांला खूप मजा आली आणि संगीत क्षेत्रातील सर्वांकडून खूपच उत्तम प्रतिसाद लाभला. आम्ही अतिशय उत्साहात आहोत आणि ह्या पर्वामधील एक से एक कलाकारांची कला प्रेक्षकांनीही पाहावी यासाठी उत्सुक आहोत.

मेंटॉर्स सचेत आणि परंपरा म्हणाले, सा रे ग म प चा हिस्सा बनणे हा आमचा सन्मान आहे. हा एक अतिशय विश्वासार्ह गायन रियलिटी प्लॅटफॉर्म आहे. आमच्यासाठी हा अनुभव आणखी खास आहे कारण इथे आमच्या आयुष्याचे वर्तुळ पूर्ण होत आहे. अतिशय थोड्यया कालावधीमध्ये एका रियलिटी शोमधील स्पर्धकांपासून आता मेंटॉर्स बनण्याचा आमचा प्रवास आहे. हा एक उत्तम प्लॅटफॉर्म असून आयकॉनिक गुरू रंधावा आणि गुणी जोडी सचिन-जिगर यांच्यासमवेत एका मंचावर असणे ही आमच्यासाठी अतिशय खास बाब आहे. ह्या शोमधील विभिन्न आवाजांचा शोध घेण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. लाँच इव्हेंटमध्ये तर ऊर्जा अगदी जबरदस्त होती. इंडस्ट्रीमधील आमच्या सहकलाकारांकडून आम्हांला उत्तम प्रतिक्रिया लाभली. ह्या पर्वामध्ये आम्ही कुठल्यातरी खास गोष्टीचा भाग आहोत याची जाणीव पदोपदी होत आहे. ही जी जादी उलगडणार आहे ती प्रेक्षकांनी अनुभवावी यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

मेंटॉर गुरू रंधावा म्हणाला, एवढ्यया दीर्घ काळानंतर रियलिटी टीव्हीकडे परत येताना घरी परत आल्यासारखे वाटत आहे जिथे संगीत आणि उपजत कला एकत्र येतात. मी सा रे ग म पमध्ये मेंटॉरच्या रूपात येत असल्याची बातमी पसरल्यापासून उत्साहाचे अनेक संदेश मला येत आहेत. माझे चाहते मला ह्या भूमिकेत पाहण्यासाठी खूपच उत्सुक आहेत. त्यांचे अढळ समर्थन माझ्यासाठी खूपच विशेष आहे. इथे मी ह्या पर्वाच्या परीक्षकापेक्षा एक मित्र आणि मार्गदर्शक बनण्यासाठी आलो आहे. पुढील सिंगिंग स्टार्सच्या पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी मी उत्सुक आहे. मी इथे अशा स्पर्धकांच्या शोधात आहे जे मंचावर आपली उपस्थिती अक्षरशः गाजवू शकतील आणि केवळ उत्तम आवाजापलीकडे जाऊन अधिक काहीतरी प्रदान करू शकतील. हे परफॉर्मन्स आणि प्रेक्षकांसोबत एक नाते बनवण्याबद्दल आहे. लाँच इव्हेंटमध्ये लाईव्ह परफॉर्म करण्याचा अनुभव खरंच छान होता आणि इंडस्ट्रीमधील माझ्या सहकलाकारांकडून मिळालेली प्रतिक्रिया उत्तम होती. ह्या पर्वामध्ये प्रेक्षकांसाठी काय आहे त्यासाठी मी ही उत्साहात आहे. ते नक्कीच काहीतरी खास असणार आहे.

सूत्रसंचालक विपुल रॉय म्हणाला, झी टीव्हीच्या सर्वांत आयकॉनिक शोज्यपैकी एक सा रे ग म प चे सूत्रसंचालन मी करत आहे. झी टीव्हीला सिने स्टार्स की खोज ह्या त्यांच्या शोमधून अनेक वर्षांपूर्वी माझा शोध लागला होता, त्यामुळे आता पुन्हा ह्या वाहिनीवर येताना घरीच परत आल्यासारखे वाटत आहे. लाँच इव्हेंटचे सूत्रसंचालन करताना खूपच धमाल आली. एकूणच वातावरणामध्ये ऊर्जा ओसांडून वाहत होती आणि एवढ्यया असामान्य संगीत कलाकारांनी मी वेढला गेलो होतो. ती संध्या अविस्मरणीय आहे. आम्ही अगोदरच सुरूवातीच्या काही भागांसाठी चित्रीकरण केले आहे, मी तुम्हांला हे सांगू शकतो की हे पर्व नक्कीच खास असेल. मेंटॉर्ससोबत माझी बातचीत गुरूसोबत थट्टामस्करी असो किंवा सचिनजिगर आणि सचेतपरंपरासोबत मस्ती हे सगळं माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. ते जे काही करतात त्यात ते जबरदस्त आहेत, पण तरीही सेटवर गोष्टी हलक्याफुलक्या कशा ठेवायच्या हे त्यांना बरोबर कळते. एक सूत्रसंचालक म्हणून माझे काम सेटवरील मूड मस्त आणि सकारात्मक ठेवणे हे आहे, त्यामुळे स्पर्धकांना प्रेरणा मिळते आणि ते त्यांचा सर्वोत्तम परफॉर्मन्स देऊ शकतात. हे सगळं एकत्र जमून येताना पाहण्याचा अनुभव छान आहे. ही एक अफलातून राईड असणार आहे.

# भक्तिमार्ग

**यंदा शाडूच्या मातीच्या गणपतींची संख्या वाढली. रसायनांचा वापर टाळण्याविषयी जागृती होत आहे. मूर्ती दान करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. हे बदल सकारात्मक आहेत. अवैज्ञानिक आणि कालबाह्य विचारधारेची जोखडं आता खाली उतरत आहेत. बदलत्या काळाला सामावून घेत नव्या आव्हानांची चर्चा करत हा उत्सव साजरा होत राहिला तर समयोचित ठरेल. गणेशोत्सवाच्या जल्लोशाच्या पार्श्वभूमीवरील हे चिंतन उत्सवाचं संचित ठरावं.**

## जोशभऱ्या उत्सवाचे संचित

खास बात

सदानंद मोरे

गणपती ही सर्वजनांची देवता ... अनेकांचं हे आराध्य दैवत, हिंदू संस्कृतीमध्ये अनेक देवी-देवतांचे उत्सव साजरे होतात. कुलाचाराप्रमाणे या देवतांची उपासना केली जाते. प्रत्येक कुटुंबाचं आराध्यदैवत या निमित्ताने पुजलं जातं. खंडोबा, तुळजाभवानी, अंबा माता आदी दैवतांसंबंधीचे कुलाचार, कुल परंपरेनुसार वर्षानुवर्षे याच पद्धतीने पाळले जात आहेत. गणपतीची आराधना ही अशाच उपासनेचा एक भाग आहे. लोकमान्य टिळकांनी या दैवताला घराच्या चौकटीतून बाहेर काढलं आणि उपासनेबरोबर साजरीकरणाचा रंगही या पूजेत मिसळला. इंग्रजी सत्तेला हाकलून देण्यासाठी जनमत तयार करणं, सर्व वर्गातील लोकांना सम पातळीवर आणून विचार करण्यास प्रवृत्त करणं, जनांमध्ये देशाभिमान जागृत करणं, राष्ट्रभक्तीची मशाल चेतवणं आणि स्वातंत्र्याची पहाट उजडावी या हेतुने लांबलेली कालरात्र संपुष्टात आणणं हा उपासनेला उत्सवीकरणाचा रंग देण्यामागील मूळ हेतू होता. आता तो जमाना मागे पडला आहे मात्र उत्सवीकरणाचा अंमल मात्र दिसामाजी वाढत आहे.

आत्तापर्यंतच्या प्रवासात या उत्सवाने अनेक वळणं घेतली पण उत्सवाचा मूळ गाभा फारसा बदलला नाही. आजही या उत्सवाकडे विवेकाने बघणारे समाजप्रबोधन या मूळ गाभ्याला धक्का न लावता गणेशोत्सव साजरा करताना दिसतात. यंदाही या हेतूने साजरे झालेले आणि साजरे होत असलेले अनेक उपक्रम, कार्यक्रम आपण अनुभवले. एखादा उत्सव सार्वजनीक होतो तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवणं ही अवघड आणि काहीशी किचकट बाब ठरते कारण तो कोणा एकाच रहात नसून सर्वांचाच होतो. प्रत्येकजण आपल्या विचाराप्रमाणे, कुवतीप्रमाणे आणि अभिरुचीप्रमाणे या सणाकडे बघतो आणि त्याच धारणेने सण साजरा करतो. आज आपण ही बाब अनुभवत आहोत. गणपती ही ज्ञानाची, विद्येची देवता. अन्याय्य बेड्या तोडण्यासाठी लोकमान्यांनी या देवतेचा आधार घेणं इष्ट समजलं. जनांना शहाणं करण्यासाठी या माध्यमातून व्याख्यानमाला, विचारवंतांची भाषणं आदी कार्यक्रम सुरु झाले. कालांतराने या प्रबोधनपर कार्यक्रमांची जागा संगीतोत्सवाने घेतली. म्हणजेच एका अर्थी जागृतीची जागा मनोरंजनाने घेतली. उत्सवाने घेतलेलं हे पाहिलं वळण होतं. गणेशोत्सवादरम्यान शास्त्रीय संगीताचे बहारदार कार्यक्रम होऊ लागले. या कार्यक्रमांच्या माध्यमातून रसिकांसमोर आलेले अनेक कलाकार कालांतराने संगीतविश्वात सर्वोच्च स्थान ग्रहण करणारे ठरले. स्व. पंडित भीमसेन जोशी हे नाव उदाहरणादाखल पुरेसं आहे. भारतरत्न म्हणून गौरवल्या गेलेल्या पंडितजींचे सूर सर्वप्रथम ऐकले ते याच उत्सवाने. या वळणापर्यंतही उपासना आणि प्रबोधन या दोन्हीमध्ये संतुलन साधलं जात होतं कारण या कार्यक्रमानेही जागृतीचा भार उचललेला असायचा. गणेशोत्सवात मेळे भरायचे. त्यातदेखील संपन्न अभिरुची बघायला मिळायची पण त्यानंतर मात्र आपण संतुलन डळमळलेलं अनुभवतो आहोत. ते स्वाभाविकही आहे. केवळ गणेशोत्सवाचं नव्हे तर आणखीही अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ही बाब अनुभवायला मिळते. दहीहंडीचं आजचं स्वरूप डोळ्यांसमोर आणलं तर या विधानातील सत्यता पटण्यास वेळ लागणार नाही. मात्र क्षणभर या विद्रूपीकरणाकडे दुर्लक्ष करून सार्वजनीक उत्सवांचा विचार करायचा झाल्यास खूप काही मिळत नसलं तरी या उत्सवांनी खूप काही गमावलंही नाही हे प्रकर्षाने जाणवतं. मुख्य म्हणजे गणेशोत्सवासारखे सार्वजनिक उत्सव जनांना आपापल्या झापडबंद आयुष्यातून बाहेर काढतात हे ही नसे थोडके.

लोकमान्य टिळकांच्या काळात त्यांच्या या भूमिकेला विरोध करणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. त्यांच्या विरोधात असणारा बुद्धिवादी गट गणपतीसारख्या देवतेला सामान्य लोकांमध्ये नेवून ठेवण्याच्या कट्टर विरोधात होता. मात्र या निमित्ताने विधायक शक्ती एकत्र येतील हा दृढ विश्वास असल्यामुळेच हा उत्सव सुरु झाला आणि तळागाळापर्यंत रुजला. हाच विश्वास आजचा गणेशोत्सवही देऊन जातो. प्रत्येक काळामध्ये विघातक आणि विधायक अशा दोन्ही शक्ती कार्यरत असणारच. उत्सवाच्या निमित्ताने यातील विधायक शक्तींना पुष्टी मिळाली तरी बरंच काही साधलं असं म्हणता येईल. आजच्या गणेशोत्सवात आपण ही बाब अनुभवत आहोत. यंदाही गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनेक सामाजिक समस्यांचा उहापोह झाला, रक्तदान शिबिरांचं आयोजन, अवयवदानाप्रती जागृती निर्माण करणं, निधीअभावी अडचणींचा सामना करणाऱ्या सामाजिक संस्थाना आर्थिक निधी उपलब्ध करून देणं, निराधारांना आर्थिक पाठबळ देणं, समाजातील विचारवंत, कर्मयोग्यांचा आदर-सत्कार करणं, त्यांचं काम जगापुढे आणणं अशा एक ना अनेक उपक्रमांमधून हा उत्सव समाजमनाला प्रेरणा देताना दिसत आहे. सगळ्यात महत्वाचं म्हणजे या उत्सवाने हिंदू समाजाला एकत्र येण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिलं आहे. हिंदू समाजाने एकत्र येण्याच्या जागा कमी आहेत असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं प्रसिद्ध विधान आहे. त्यात तथ्यही आहे. कारण जाती-पातीच्या भक्कम भिंती भेदून एकत्रं येणं आजही वाटतं तेवढं सोपं नाही. मात्र गणेशोत्सवाच्या निमित्ताने या कणखर भिंतीही हलकेच भेदल्या जातात आणि जनसागर एकत्र येऊन गणेशरंगात रंगतो. माझ्या मते उत्सवाची ही सर्वात मोठी देणगी आहे .



या उत्सवाच्या निमित्ताने बरीच मोठी आर्थिक उलाढाल अनुभवायला मिळते. देवाच्या चरणी अर्पण केलेल्या वस्तू, नगद रक्कम आणि अन्य वस्तूंची मोजदाद काही कोटींच्या घरात असते. सामाजीक भान जागृत असणारी सार्वजनीक गणेश मंडळं समाजोपयोगी कार्यांसाठी या रकमेचा विनियोग करतात. उदाहरणार्थ गेल्या दोन वर्षातल्या भयानक दुष्काळात अनेक मंडळांनी मदतीचा हात पुढे केलेला आपण अनुभवला. विद्येची देवता असणाऱ्या गणरायाच्या चरणी अर्पण केली जाणारी रक्कम सरस्वतीचा दरबार समृद्ध करण्यासाठी उपयोगी पडणं उचीत ठरेल. सध्या अनेक संस्था निधीअभावी आपापले उपयुक्त उपक्रम गुंडाळताना दिसत आहेत. उदाहरणार्थ पुण्यातील साहित्य परिषद आपल्याकडच्या ठेवींमधून साहित्यिकांना पुरस्कार देत असे. मात्र, हळूहळू व्याजाचे दर कमी झाले आणि पुरस्कारांची संख्याही रोडावली. सोलापूरला तेलगू मंडळी एक व्याख्यानमाला चालवत असत. मात्र पर्याप्त निधीअभावी ही सकस व्याख्यानमालाही बंद पडली आहे. आक्रसलेले अथवा बंद पडलेले असे अनेक उपक्रम नव्या दमाने सुरु करण्याची ताकत अनेक मंडळांमध्ये आहे. हे भान जागृत ठेवून आर्थिक मदत देऊ केली तर गणेशोत्सवाचं ढासळलेलं संतुलन सावरण्यास फारसा वेळ लागणार नाही .

गणपती हा गणांचा अधिपती आहे. तो सगळ्यांमध्ये राहणारा आहे. त्याला कशाचंच वावडं नाही. तो राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, वैचारीक, आर्थिक आदी विषयांना सामावून घेतो. या लवचिकतेचा फायदा खूप मोठा आहे. म्हणूनच यंदा राहून गेलेलं, दुर्लक्षीत राहिलेलं काम पुढच्या वर्षी करू या. यंदा आपण बरेच सकारात्मक बदल पहात आहोत. उदाहरणार्थ शाडूच्या मातीच्या गणपतींची संख्या वाढली आहे. लहानगेही थर्माकोलच्या सजावटीस नकार देताना आपण पाहिलं आहे. रसायनांचा वापर टाळण्याविषयी जागृती होत आहे. वाहत्या पाण्यात गणपती विसर्जन करण्याचा अट्टाहास कमी होत आहे. त्या ऐवजी घरात अथवा विसर्जन हौदामध्ये गणपती विसर्जन करण्याचे प्रमाण वाढत आहे. मूर्ती दान करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. हे सर्व बदल सकारात्मक वळणाकडे नेणारे आहेत. कधी ना कधी पारंपरीक, संकुचीत, अवैज्ञानिक आणि कालबाह्य विचारधारेची जोखडं खाली उतरवायला हवीत. नव्या जगाची ती गरज आहे. बदलत्या काळाला सामावून घेत बदलत्या आव्हानांची चर्चा करत, बदलत्या समस्यांवर तोडगे शोधत हा उत्सव साजरा होत राहिला तरच तो समयोचित ठरेल यात शंका नाही.

---

**भगवान शंकराच्या मूर्तीकडे पाहिलं तर तीन या आकड्याचा शंकराशी खूप जवळचा संबंध असल्याचं आपल्या लक्षात येतं. शंकराला तीन नेत्र आहेत. शंकराला प्रिय असलेल्या बेलाला तीन पानं असतात. त्याच्या कपाळावर भस्माच्या तीन रेघोट्या असतात. तीन देवांमध्ये त्याचा तिसरा क्रमांक लागतो. शंकराला तीन वेळा प्रदक्षिणा घालावी लागते. ओम नम: शिवाय हा मंत्रही तीन अक्षरी आहे. शंकराशी संबंधित प्रत्येक गोष्टीत तीन हा आकडा का आहे? शंकराचा तीन या आकड्याशी काय संबंध आहे?**

## महत्त्व तीनचं...

जाणून घ्या



शंकराला अमरत्वाचं वरदान लाभलंय. शंकराला आदी आणि अंत नाही. महाप्रलयातही तो नष्ट होणार नाही.

* शंकराला कलीकाळाचं भय नाही. तो वेळेच्या बंधनात बांधला गेलेला नाही. त्याला त्रिकाल ज्ञानी असं म्हटलं जातं. मृत्यू शंकराला स्पर्शही करू शकत नाही. काळाला शंकराचं भय वाटतं. तो काळानुसार चालत नाही तर त्याच्यानुसार काळाला चालावं लागतं.

* शंकर त्रिलोकदर्शी आहे. तो एकाच वेळी तिन्ही लोकांवर लक्ष ठेऊ शकतो. तिन्ही लोकांच्यावर वर असलेली शक्तीच असं करू शकते.


* सत्त्व, राजस आणि तामस असे पुरूषाचे तीन गुण मानले जातात. या तीन गुणांपासून मुक्त होणारी व्यक्तीच उच्च पदाला पोहचू शकते. त्रिशूळाच्या मदतीने शंकर आपल्या भक्तांच्या या गुणांपासून मुक्त करतो. यामुळे मनुष्याला तरल आध्यात्मिक अनुभूती मिळू शकते. मोक्ष मिळतो. मोक्षानंतर जन्म-मृत्यूच्या चक्रातून आपली सुटका होते. तसंच शंकर आपल्या भक्तांना तीन जन्मातल्या पापांपासून मुक्ती देतो.

* शंकराला तीन प्रदक्षिणा घातल्यानंतर पापांपासून मुक्ती मिळते. पहिल्या प्रदक्षिणेमुळे बुद्धीची पापं नष्ट होतात. दुसऱ्या प्रदक्षिणेमुळे वाचेमुळे झालेली पापं नष्ट होतात. तर तिसऱ्या प्रदक्षिणेमुळे शरीरामुळे झालेली पापं नष्ट होतात असं मानलं जातं.

---

## महत्व आरतीचं...

भक्ती मार्ग



हिंदू धर्मात आपल्या इष्ट देवतेची आरती करण्याला मोठं महत्त्व आहे. आरती केल्याने मन आणि वातावरण कसं अगदी प्रसन्न होऊन जातं. देवाची पूजा झाल्यानंतर आरती म्हटली जाते. आरतीद्वारे परमेश्वराचे गुण गायले जातात. आपण सर्वसामान्य माणसं पूजा करतो. या पूजेमध्ये काही त्रुटी राहण्याची शक्यता असते. धर्मशास्त्राची माहिती नसल्याने असं घडू शकतं. अशा परिस्थितीत आरती म्हटल्याने पूजेतल्या सगळ्या त्रुटी, दोष दूर होतात, असं मानलं जातं. आरती म्हटल्यानेच नाही तर आरती पाहिल्यानेही पुण्य मिळतं, असं धर्मशास्त्र सांगतं. आरतीतली आपली उपस्थितीही पुण्य मिळवून देऊ शकते.

आरतीला एक चाल असते. तालासूरात गायलेली आरती अधिक लाभदायी ठरते. यामागे धार्मिक कारणं आहेतच शिवाय वैज्ञानिक कारणंही आहेत. तालासूरात गायलेल्या आरतीमुळे भक्तांचे कान तृप्त होतात. आपल्याला आगळं समाधान मिळतं. भक्त डोलू लागतात. मन:शांतीचा लाभ होतो. आरतीतल्या स्तुतीमुळे देवी-देवता लगेच प्रसन्न होतात. ही झाली धार्मिक कारणं. प्रात:समयी तालासूरात आरती म्हणणं आपल्या आरोग्याच्या दृष्टीनेही लाभदायी आहे. आरती तालासूरात, लयीत म्हटल्याने आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव जागृतावस्थेत येतो. शरीराला ऊर्जा मिळून रक्ताभिसरणाची क्रिया सुधारते. आरती म्हटल्याने घशाचे विकारही दूर होतात. तसंच व्यक्ती आनंदी राहू लागते. समूहात आरती म्हटल्याने माणसाला एकटं वाटत नाही, अशा अनेक लाभांमुळे आरतीची परंपरा सुरू झाली असावी. आरतीदरम्यान घंटा वाजवल्याने वातावरणातली नकारात्मक ऊर्जा दूर होते तसंच अनेक शारीरिक व्याधी दूर होतात. घंटेच्या निनादामुळे हवेतले घातक विषाणू मरतात, असं एका संशोधनातून सिद्ध झालंय आरतीनंतर तीर्थाचं सेवन करणं फलदायी मानलं जातं. अशा अनेक लाभांमुळे आरती म्हटली पाहिजे.

---

## गर्वहरण सिकंदराचं...

बोधकथा

सिकंदरने सगळ्या जगावर राज्य केलं. पण देवाघरी जाताना त्याचे हात रिकामेच होते. सिकंदर भारतावर चाल करून आला तेव्हा एका फकिरासोबत त्याची भेट झाली. सिकंदराला पाहून तो फकिर हसू लागला. यामुळे सिकंदर व्यथित झाला, प्रचंड चिडला. त्याला हा आपला अपमान वाटला. सिकंदर त्याला म्हणाला, मी सिकंदर आहे. सगळ्या जगावर राज्य करतो. एक तर तू मला ओळखत नाहीस किंवा तुझा मृत्यू जवळ आलाय. हे ऐकून फकीर जोरजोरात हसू लागला. तो म्हणाला, तुझ्यात मला काहीही वेगळं दिसत नाही. तू महान असल्याचं जाणवत नाही. उलट मी तुला गरीब आणि दरिद्री समजतो. मला तुझी कीव येतेय.

हे ऐकून सिकंदर अजूनच वैतागला. म्हणाला, तुला वेड लागलंय का? मी जग जिंकून आलोय.



फकीर म्हणाला, तू आजही सर्वसामान्य माणून आहेस. तू एवढं म्हणतोस तर मी तुला एक प्रश्न विचारतो. तू वाळवंटात अडकला आहेस. तहानेने व्याकूळ झालेल्या तुझ्या आसपास पाणी नाही. हिरवळ नाही. पाण्याचा थेंब मिळण्याची सुतराम शक्यता नाही. अशा वेळी पेलाभर पाण्याच्या बदल्यात तू काय देशील?

सिकंदर विचारात पडला. थोडा वेळ विचार करून म्हणाला, मी अर्धं राज्य देईन.

फकीर म्हणाला, अर्धं राज्य देऊनही मी ऐकलं नाही तर काय करशील?

सिकंदर म्हणाला, पूर्ण राज्य देईन.

फकीर पुन्हा हसू लागला. म्हणाला, तुझ्या राज्याचं मोल काय तर एक पेला पाणी आणि तू अहंकाराने मातला आहेस.

हे ऐकताच सिकंदरचा अहंकार गळून पडला. त्याने फकिराकडून आीहशशर्वाद घेतला आणि पुढे निघाला. आपण महान आहोत हे जगाला दाखवणं म्हणजे मूर्खपणा आहे, हा बोध आपल्याला या कथेतून घेता येईल.

---

## लाभ विंड चाईमचे...



वास्तु भक्ती

वास्तुशास्त्रात सौभाग्यवृद्धीसाठी 'फेंगशुई' तंत्राचा, काही वस्तूंचा वापर के ला जातो. विंड चाईम त्यापैकीच एक. विंड चाईमचा किणकिणणारा ध्वनी सुखावह अनुभव देऊन जातो. पण यासाठी विंड चाईम योग्य दिशेला आणि योग्य पद्धतीने लावणं गरजेचं आहे. विंड चाईम वापराच्या अनेक पद्धती आहेत. विंड चाईममुळे आपण घरातली नकारात्मक ऊर्जा बाहेर घालवू शकतो. यामुळे घरात सकारात्मक वातावरण निर्माण होतं. यासाठी विंड चाईममधल्या नळ्यांच्या संख्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

* विंड चाईमच्या शक्तीचे लाभ मिळवण्यासाठी ती उत्तर-पश्चिम किंवा पश्चिम दिशेला लावा. यामुळे अनेक लाभ मिळतात.

* धातू, लाकूड किंवा सिरॅमिक पाईपपासून विंड चाईम बनवल्या जातात. हवेमुळे या नळ्यांची हालचाल होऊन किणकिणणारा ध्वनी कानांवर पडतो. विंड चाईमच्या नळ्या पोकळ असल्या पाहिजे. यामुळे यातून नकारात्मक ऊर्जा जाऊन सकारात्मक ऊर्जेचा वास राहिल.

* पाच किंवा सात नळ्या असलेली विंड चाईम घेतल्यामुळे घरातली नकारात्मक ऊर्जा बाहेर पडते. सहा किंवा आठ नळ्या असलेली विंड चाईम ड्रॉईंग रूमच्या उत्तर-पश्चिम भागात लावावी. यामुळे सौभाग्यवृद्धी होते.

---

## मानवमुखी विनायक...

तीर्थक्षेत्र

गणपती म्हटला की त्याला हत्तीचं शीर असतं. माणसाचं शीर असलेल्या गणेशमूर्तीचा आपण कधीही विचार करत नाही. हत्तीच्या मुखामुळेच गणपतीला गजानन असं म्हटलं जातं. पण तामिळनाडूतल्या एका मंदिरात भगवान गणेशाचं शीर हत्तीचं नाही तर मानवाचं आहे. या ठिकाणी गणपती मानवरूपात विराजमान आहे. विशेष म्हणजे मानवाचं शीर असलेल्या गणपतीचं हे जगातलं एकमेव मंदिर असल्याचं मानलं जातं. तामिळनाडूतल्या कूटनूर जिल्ह्यापासून दोन किलोमीटरच्या अंतरावर तिलतर्पणपुरी नावाचं स्थान आहे. इथेच भगवान गणेशाचं 'आदी विनायक मंदिर' आहे. या ठिकाणची गणपतीची मूर्ती मानवमुखी आहे. तसंच इथे पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी पूजा केली जाते.



या ठिकाणी भगवान श्रीरामाने आपल्या पूर्वजांच्या शांतीसाठी पूजा केल्याचं मानलं जातं. हीच परंपरा वर्षानुवर्षं सुरू आहे. तिलतर्पण या शब्दाचा अर्थ आहे पूर्वजांना समर्पित तर पुरी म्हणजे शहर. तिलतर्पणपुरी म्हणजे पूर्वजांना समर्पित शहर.

इथे गणपतीसोबतच भगवान शंकराचं मंदिर आहे. मंदिर परिसराच्या मधोमध शंकराचं मंदिर असून बाजूला गणपतीचं मंदिर आहे. इथली मानवमुखी गणेशमूर्ती अनेक भक्तांचं आकर्षण आहे. या गणपतीचं दर्शन घेण्यासाठी भक्तांची गर्दी होते.

---

**पितृ पक्ष सुरू होतोय. या काळात पितरांचं स्मरण केलं जातं. काहींच्या कुंडलीत पितृ दोष असतात. हे पितृ दोष काही उपायांनी दूर करता येतात.**

## उपाय पितृपक्षातले...

धर्मशास्त्रातून

या काळात पहिली पोळी गायीसाठी काढून ठेवावी. पोळीवर थोडं दही, साखर आणि तुळशीपत्र ठेऊन गायीला खायला द्यावं.

* रविवार सोडून इतर दिवशी पिंपळाला कच्चं दूध आणि पाणी अर्पण करा.

* पिंपळाच्या झाडाखाली बसून पितृ गायत्री मंत्र किंवा गायत्री मंत्रांचं पठण करा. घरात गीतेचं पठण करा. पितृपक्षात ब्रह्मचर्य व्रताचं पालन करा.

* घराच्या गच्चीवर किंवा मोकळ्या ठिकाणी अन्नाचे तुकडे पसरवून ठेवा. कावळे हे अन्न खातील. यामुळे पितृदेवता प्रसन्न होते, असं मानलं जातं.



* घरात अकाली मृत्यू झाला असेल तर पितृ पक्षातल्या अमावस्येला त्या व्यक्तीच्या स्मरणार्थ तांब्याचं भांडं, कपडे आणि भोजन दान म्हणून दिलं पाहिजे.

## थोडक्यात

### बीडमधून लढण्यावर ज्योती मेटे ठाम

■ **बीड :** ज्योती मेटे या बीडमधून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत. या आधी देखील त्यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी तयारी केली होती. त्या काय निर्णय घेतात? याकडे लक्ष लागले आहे.



विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर शिवसंग्राम पक्ष कोणत्यातरी पक्षात विलीन होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, शिवसंग्राम पक्ष कोणत्याही परिस्थितीत विलीन होणार नसल्याचे ज्योती मेटे यांनी स्पष्ट केले आहे. आगामी काळात होणाऱ्या निवडणुका लढवण्यावर आमचा भर असेल, असे देखील ज्योती मेटे यांनी सांगितले आहे.

मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या पाच विभागात पाच जागा लढण्याची तयारी शिवसंग्राम पक्षाच्या माध्यमातून केली जात आहे. तर बीडमधून स्वतः ज्योती मेटे या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. बीडमधून कोणत्या मतदारसंघातून लढणार यावर महायुती आणि आघाडी सोबत त्यांची चर्चा सुरू आहे. बीडमधून कोणत्या मतदारसंघातून लढावे याची चाचपणी त्यांनी सुरू केली आहे.

### आमदारकी घरातच ठेवण्याचा प्रयत्न

**गडचिरोली :** मंत्री धर्मरावबाबा आत्राम व त्यांची कन्या भाग्यश्री यांनी एकमेकांविरोधात लढण्याचे चित्र निर्माण केले आहे. पण मुळात हे दोघेही आतून एकच आहेत. त्यांनी कोणत्याही स्थितीत आमदारकी आपल्या घरातच रहावी यासाठी एकमेकांना आव्हान देण्याचे नाटक सुरू केले आहे, असा आरोप धर्मरावबाबा आत्राम यांचे पुतणे अंबरिशराव आत्राम यांनी केला आहे.

धर्मरावबाबा आत्राम व त्यांची कन्या भाग्यश्री यापैकी कुणाचाही विजय झाला तरी आमदारकी त्यांच्याच घरात राहील. हा त्या दोघांचा प्लॅन आहे. मी भाजप सोडणार की नाही हा विषय नाही. एका तिकीटाची घोषणा होऊ द्या. आमदारकी घरातच रहावी यासाठी हे नाटक आहे. ही निवडणूक त्यांची शेवटची आहे, असे अंबरिशराव आत्राम म्हणाले.

# पत्रकारिता म्हणजे तत्व व मुल्यांशी एकनिष्ठा

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन ■ स्व. अनिल स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे वितरण





■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४:**

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली पत्रकारिता म्हणजे सामाजिक दायित्व जपत लोकशाही, वस्तुनिष्ठता व जीवनमानातील मूल्य व तत्वे यांची एकनिष्ठता जपणे होय. अशी उत्कृष्ट पत्रकारिता करणाऱ्यांना प्रोत्साहन व पाठबळ देण्यासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघ यांनी घेतलेल्या पुढाकार हा स्तुत्य आहे असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. विदर्भ गौरव प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. अनिल कुमार पत्रकारिता पुरस्कार २०२३ च्या वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रेस क्लब सिव्हिल लाईन्स नागपूर येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अरुण चौधरी अतिथी म्हणून विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट, प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रह्मशंकर त्रिपाठी, प्रगती पाटील, निलेश खांडेकर, प्रेम लुनावत, अतुल दुरुगकर उपस्थित होते.

कवी, विचारवंत व पत्रकार म्हणून प्रसिद्ध असलेले व त्यांच्या काळात त्यांनी केलेले कार्य अजूनही लोकांच्या स्मरणात असलेले जेष्ठ पत्रकार अनिल कुमार यांच्या स्मृती प्रित्यर्थ विदर्भ गौरव प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने चार दशकांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना स्व. अनिल कुमार पत्रकारिता पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो.



वर्ष २०२३ च्या पुरस्काराचे यावेळी वितरण करण्यात आले. २६ वर्षांपासून दैनिक लोकसत्तामध्ये कार्यरत सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि शहरातील विविध समस्यांवर लेखन करणारे तसेच विदर्भासह महाराष्ट्रातभर शास्त्रीय संगीत व सुगम संगीताच्या मैफिली गाजविणारे विजय (राम) मधुकर भाकरे, मेळघाटातील कुपोषण, आदिवासी संस्कृती, वनसंपदा व वन्यजीव रक्षण, विदर्भाचा सिंचन अनुशेष, शेतकरी आत्महत्या यासारख्या विषयांचे उत्कृष्टरित्या हाताळणी करीत विविध पुरस्कारांचे मानकरी लोकमतचे ( विदर्भ आवृत्ती), संपादक म्हणून कार्यरत श्रीमंत बाळकृष्ण माने, ग्रामीण पत्रकारितेचा स्टेटमेंट अवॉर्ड, रामनाथ गोयंका पुरस्कार, वाईल्ड लाईफ रिपोर्टिंग साठीचा सेंचुरी अवार्ड यासारख्या विविध पुरस्कारांचे मानकरी द इंडियन एक्सप्रेस मधून सहाय्यक संपादक म्हणून निवृत्त झालेले विवेक देशपांडे तसेच टाइम्स ऑफ इंडियाचे ज्येष्ठ पत्रकार रामू भागवत यांना खासदार नितीन गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी नितीन गडकरी पुढे म्हणाले की जशी निष्ठावंत पत्रकारिता आहे तशीच सुपारी पत्रकारिता देखील आहे, याला कुठेतरी पायबंद बसला पाहिजे. शिवाय या क्षेत्रात नव्याने पाऊल टाकणाऱ्यांसाठी रिसर्च इन्स्टिट्यूट व ज्येष्ठ पत्रकारांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन मिळायला हवे.

अध्यक्ष म्हणून लाभलेले माजी न्यायमूर्ती अरुण चौधरी यांनी गिरीश गांधी प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित स्वर्गीय अनिल कुमार पत्रकारिता पुरस्कार गेल्या ४० वर्षांपासून अखंडपणे देण्यात येत आहे ही एक वंदनीय बाब असल्याचे सांगितले.

डॉ. गिरीश गांधी आपल्या भाषणात म्हणाले की पत्रकारितेच्या क्षेत्रात उत्कृष्ट शोध पत्रकारिता करणाऱ्यांना शिष्यवृत्ती मिळायला हवी. तसेच प्रत्येकी रोख २१ हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे रूप असलेल्या या पुरस्काराचे स्वरूप आगामी काळात बदलविण्याचे प्रयोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. बाळ कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नागपूर शहर आणि विदर्भाच्या विविध भागातील ज्येष्ठ संपादक यांच्यासह पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## गांधी हे हिंदीचे समर्पित सेवक : बनवारीलाल पुरोहित

### राजभाषेच्या रूपात हिंदीचे ७५ वर्ष विषयावर व्याख्यान





■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १४:**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात शनिवारी गालिब सभागृहात हिंदी दिवस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त हिंदी पंधरवड्याची सुरुवात राजभाषेच्या रूपात हिंदीचे ७५ वर्ष या विषयावर विशेष व्याख्यानाने करण्यात आली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित करताना माजी राज्यपाल बनवारीलाल पुरोहित म्हणाले की, गांधी हे हिंदीचे समर्पित सेवक होते. महात्मा गांधी हे हिंदीचे मोठे समर्थक होते. ३० जानेवारी रोजी गांधी गेल्यानंतर हिंदीला मोठा फटका बसला. हिंदीच्या प्रश्नावरही गांधीजींचे राजगोपालाचारी यांच्याशी मतभेद होते. गांधींच्या कार्याच्या भूमीवर आल्याचा अभिमान वाटत असल्याचे पुरोहित म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कृष्णकुमार सिंह होते. अतिथिंच्या हस्ते मीडिया समयचे लोकार्पण करण्यात आले. ज्यांचे कलादिग्दर्शन राजेश आगरकर यांनी केले.

स्वागतपर भाषण व विषय प्रास्ताविक जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांनी केले. हिंदी अधिकारी राजेश कुमार यादव यांनी पुरोहित यांचा परिचय व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा संदेश वाचून दाखविला. यावेळी कुलगुरू प्रो. सिंह यांनी पुरोहित यांचे शाल, सुतमाळ, विश्वविद्यालयाचे मानचिन्ह व चरखा देऊन स्वागत केले.

आपल्या भाषणात पुरोहित पुढे म्हणाले की, हिंदीचा मनापासून स्वीकार केल्यास जीवन गांधीसारखे होईल. गांधी आणि हिंदीत साधेपणाचा सारखाच भाव आहे. त्यांनी भारतेंदू प्रेमचंद, तुलसीदास, कबीर, मैथिली चरण गुप्ता आणि हरिवंशराय बच्चन यांच्या हिंदीतील योगदानाचे स्मरण केले आणि त्यांच्या कविता उद्धृत केल्या. अध्यक्षीय उद्धबोधनात कुलगुरू प्रो. कृष्णकुमार सिंह म्हणाले की हिंदीची ताकद आणि ओळख मोठी आहे. अहिंदी भाषिकांनी हिंदीच्या प्रचारात योगदान दिले आहे.

संचालन गांधी आणि शांति अध्ययन विभागाचे अध्यक्ष डॉ. राकेश कुमार मिश्रा यांनी केले. कुलसचिव प्रो. आनंद पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विविध विद्यापीठांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, केंद्र निदेशक, प्राध्यापक, विद्यार्थी, शोधार्थी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कोलकाता आणि प्रयागराज क्षेत्रीय केंद्र व सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा आणि तत्त्वज्ञान अध्ययन केंद्र, रिद्धपूर येथील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी ऑनलाइन सहभागी झाले.

## पोलिसांकडूनच छत्रपती आणि देवीची विटंबना



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४:**

छत्रपती शिवाजी महाराज व देवी लक्ष्मी यांची पोलिसांकडूनच विटंबना केली जात आहे. पोलिसांच्या वसाहतीमधले हे दृश्य संताप आणणारे आहे.

पोलीस लाईन टाकळी मधील पोलीस वसाहतीमध्ये पिंपळाच्या झाडाखाली शिवराय महालक्ष्मी यांच्या मूर्ती तुटलेल्या अवस्थेत ठेवण्यात आलेल्या आहेत. मूर्ती ठेवण्यात आल्या तेथे लगतच पोलीस चौकी सुद्धा आहे.

पोलिस वसाहत असल्यामुळे पोलिसांनीच ह्या मूर्ती येथे ठेवलेल्या असाव्यात, अन्य कोणी इसम हे धाडस करू शकत नाही, हे स्पष्ट आहे.

ज्यांच्याकडे या वसाहतीची जबाबदारी आहे त्यांना, येथे वास्तव्यास असलेले पोलीस तसेच पीआय तिवारी यांना हे दृश्य दिसले नाही का? यावर गृह विभाग कार्यवाही करणार का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

## गांधीबाग सुत व हँडलूम मार्केट गणेश उत्सवात उसळते आहे भाविकांची अलोट गर्दी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४:**

आजच्या सोशल मीडियाच्या काळात तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या असामाजिक तत्त्वांचा ऱ्हास करून मुख्यत्वे हिंदू धर्मीय तत्वांना प्रोत्साहित करण्याच्या व तरुणांना एकत्रित आणून सामाजिक दायित्व जपण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन 2001 सालि गांधीबाग सुत-एवम हॅण्डलूम मार्केट गणेश उत्सव मंडळाची स्थापना झाली आणि 23 वे वर्ष यंदा बद्रीनाथ धामच्या शंकराच्या रूपातील गणेश मूर्तीची स्थापना करून साजरे करण्यात येत आहे.

बद्रीनाथ येथील नंदी महाराजांवर बसलेल्या एका हातात त्रिशूल व एका हातात फरसा अस्त्र असणाऱ्या भव्य व आकर्षक गणेश मूर्तीची स्थापना यंदा करण्यात आली आहे. कोरोना काळापासून बारा ज्योतिर्लिंग व चारधाम येथील शंकराची पिंड व मूर्तीच्या प्रतिकृती गणेशाची स्थापना करण्याचे ध्येय या गणेश मंडळांनी ठरविले असून त्याप्रमाणे यापूर्वी अमरनाथ व केदारनाथ येथील देखावा सजविण्यात आला होता.

या प्रत्येकच देखाव्याची भक्तांकडून सराहना होऊन लोकांची तुंबळ गर्दी जमत आहे. यंदा 4000 च्या घरात भाविक गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सकाळचे चार वाजेपर्यंत गर्दी करीत आहेत.

व्यापारी संकुलात स्थापित या गणेश मंडळाच्या स्थापनेसाठी व्यापारी वगार्तून व मंडळाच्या सदस्यांकडून स्वेच्छेने जमावण्यात आलेल्या चार लाख रुपयांच्या निधीतून यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. सामाजिक दायित्व जपत यंदा टी-शर्टचे वाटप व महिलांना सौंदर्यवर्धक मेडिमिक्स क्रीमचे वाटप करण्यात आले.

याशिवाय येथे रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात येणार आहे. येथे



आरती व पूजा पाठासाठी अतिथींना बोलावण्याची परंपरा असून ती कायम राखली आहे.

येथे खासदार नितीन गडकरी, आमदार विकास कुंभारे, भाजपाचे नेते प्रवीण द टके याशिवाय बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे मोठमोठे नेते गणरायाचे दर्शन घेण्यासाठी वर्णी लावतात. याशिवाय पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांचीही वेळ मिळालेली आहे.

स्व. अतुल डहरवाल यांच्या मार्गदर्शनाचा आदर्श ठेवून व त्यांच्या कायार्ने प्रेरित होऊन या मंडळाद्वारे वर्षभर गणेशोत्सवाव्यतिरिक्त विविध सामाजिक उपक्रम राबविल्या जातात. यामध्ये हनुमान जयंतीला मोठ्या प्रमाणात प्रसादाचे वाटप होते. रामनवमीला निघणाऱ्या शोभायात्रेचे भव्य स्वागत केले जाते.

शिवाय गोकुळाष्टमीला दहीहंडीचा मोठा कार्यक्रम घेण्यात येतो. भाजप युवा मोर्चाचे कोषाध्यक्ष सागर रहाटे, मध्य नागपूर भाजपचे उपाध्यक्ष मिलन राय यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव व कोषाध्यक्ष अनिकेत अग्रवाल व सदस्य अभिषेक बारापात्रे, निखिल हेडाऊ, अखिल डहरवाल, दीपक राठोड, कुलदीप दुबे, शुभम बारस्कर, संदीप लीडर, राहुल अडुलकर, प्रवीण वाघेला, आयुष सराफ, आयुष केवलकर, कार्तिक केवलकर, राहुल गौर, रवी राठोड, सारंग ठाकूर यांच्या संयोगाने मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

## महाविकास आघाडीत काँग्रेस मोठ्या भावाच्या भूमिकेत

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४:**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात जोरदार हालचाली सुरू आहेत. राजकीय पक्षांमधील जागावाटपापासून ते मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यापर्यंत अनेक प्रकारचे प्रश्न राजकीय वतुर्ळात विचारले जात आहेत. यात काँग्रेस पक्ष हा महाविकास आघाडीमध्ये मोठा भाऊ आहे. मुख्यमंत्रीपदाचा दावा कुणी सोडत नाही, असे काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी म्हटले आहे.



नितीन राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्रीपदाचा प्रश्नच समोर येत नाही. कारण काँग्रेस कधीच मुख्यमंत्रीपदाचा चेहरा समोर ठेवून निवडणुका लढत नाही. आमचा चेहरा हा एकमात्र चेहरा तो म्हणजे राहुल गांधी आहे. विधानसभा निवडणुकीसाठी आमचा चेहरा हे राहुल गांधी असतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

नितीन राऊत म्हणाले की, राजकारणामध्ये कुणी कुणाचा दावा सोडत नाही. आम्ही मविआमध्ये असून ही आघाडी समानतेवर अधारित आघाडी आहे. तिच्यामध्ये आम्ही मोठ्या भावाची भूमिका बजावणार आहोत असे म्हणत त्यांनी सूचक वक्तव्य केले आहे. आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाबाबत चेहरा निश्चित करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली होती. संजय राऊत यांनी ठाकरे यांच्या नावाची घोषणाच केली होती. नंतर काँग्रेस आणि शरद पवार गटाने राऊत यांच्या या घोषणेला विरोध केला होता.

## ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांचे दुःखद निधन

### ८२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४:**

ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष, एकता विनायक संस्थेचे उपनगरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मागाठाणे मित्र मंडळ, प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय अशा विविध संस्थांचे संस्थापक, आधारस्तंभ श्री विजय दत्तात्रय वैद्य यांचे आज सकाळी त्यांचे ज्येष्ठ सुपूत्र वैभव यांच्या बोरीवली पूर्व येथील ॲम्ब्रोसिया या निवासस्थानी दुःखद निधन झाले.

ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी वैशाली, सुपूत्र वैभव, विक्रांत, सुना प्रतिमा आणि अनघा, नातवंडे हर्षल आणि गौरी असा परिवार आहे. काल दिवसभर उपनगरचा राजा गणेशोत्सव मंडळाची आमंत्रणे वाटण्याचे काम करीत होते. आज सकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला पण त्यांची तिथेच प्राणज्योत मालवली.

दुपारी २ वाजता त्यांची अंत्ययात्रा एका सजवलेल्या रथातून ॲम्ब्रोसिया येथून निघाली. विजय वैद्य यांची कर्मभूमी असलेल्या जय महाराष्ट्र नगर येथील त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. तेथे अंतीम इच्छेनुसार आजच्या सर्व वर्तमानपत्रे त्यांच्या पार्थिवा जवळ ठेवण्यात आली. बॅंड पथकाने भक्तीगीते वाजवून त्यांना मानवंदना दिली.

हा स्वर्गरथ जय महाराष्ट्र नगर येथून बोरीवली पूर्व येथील दौलतनगर स्मशानभूमी येथे नेण्यात आला. सर्व वैदिक विधी पूर्ण करण्यात आले. ज्येष्ठ चिरंजीव वैभव याने पार्थिवाला शोकाकुल वातावरणात अग्नी दिला.

ॲम्ब्रोसिया, जय महाराष्ट्र नगर आणि दौलतनगर स्मशानभूमी येथे सर्व स्तरातील लोकांनी उपस्थित राहून साश्रुनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला.

मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे पदाधिकारी, वृत्तवाहिन्या, वर्तमानपत्रे यांचे प्रतिनिधी, विविध राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, रिक्षाचालक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, घरेलू कामगार असे सामान्य नागरिक सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय वैद्य यांना मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पा. सामक जीवनगौरव पुरस्कार तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव, आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला होता. अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते. उपनगर साहित्य संमेलन सुद्धा त्यांनी भरविले होते.

# तयारी सूकर, पण अवघड पेपर!

वेध
**अजय तिवारी**



**लो**कसभेच्या निवडणुकीप्रमाणे विधानसभेचा निकाल लागत नसतो, हे खरे आहे. लोकसभेला सहा विधानसभा मतदारसंघ एकत्र असतात आणि दहा-बारा लाखांच्या पुढे मतदान असते. विधानसभेला दोन-अडीच लाखांपर्यंत मतदार असतात. लोकसभेला अपक्ष निवडून येण्याचे प्रमाण कमी असते. विधानसभेला त्या उलट परिस्थिती असते. काही व्यक्ती व्यक्तिगत करिष्म्यावर निवडून येत असतात. लोकसभा निवडणुकीत छोट्या पक्षांचा फार प्रभाव पडत नाही. विधानसभेला तो पडतो. लोकसभा निवडणुकीत लढती दुरंगी झाल्या. विधानसभा निवडणुकीत त्या बहुरंगी होतील. कोण कुणाचे मतविभाजन करतील, यावर निवडणुकीचे गणित अवलंबून असेल. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर महायुतीने लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांचे वीजबील माफ, वृद्धांसाठी तीर्थाटन योजना आदी सत्तर हजार कोटी रुपयांच्या योजना जाहीर केल्या. लाखो कोटींच्या पायाभूत विकासाच्या कामांच्या

**महायुती सरकारने मतदारांवर विविध योजनांवर सत्तर हजार कोटी रुपयांची उधळण केली असली तरी त्यामुळे आरामात निवडणूक जिंकता येईल, अशी परिस्थिती नाही. महायुतीतील लाथाळी, शेतीविषयक धरसोडीचे निर्णय, विविध जातीसमूहांची आरक्षणाची मागणी- त्याला काही जातीसमूहांचा विरोध तसेच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था तसेच बेरोजगारी अधिक चर्चेत आहे. हा अवघड पेपर महायुती कसा सोडवणार?**

योजना जाहीर केल्या. महाराष्ट्र हे परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमाकांचे राज्य असल्याचे सांगितले जात असताना महाराष्ट्रातून काही उद्योग बाहेर जात आहेत, यावर मात्र कुणीच भाष्य करायला तयार नाही. या पार्श्वभूमीवर राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून अनेक तर्कवितर्क समोर येत आहेत. सगळ्या निदर्शकांनुसार महायुतीसाठी निवडणुकीच्या परिक्षेचा पेपर अपेक्षेइतका सोपा नाही, असे पहायला मिळत आहे.

राज्यात उद्योग-व्यवसाय अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. पुण्यातील अनेक कंपन्यांनी केवळ वाहतूक कोंडीने त्रस्त होऊन तसेच पायाभूत सुविधांअभावी अन्य राज्यात जाण्याचा निर्णय घेण्याबाबतच्या बातम्या पुढे आल्यानंतर त्यांना थांबवण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत. काही उद्योग तर गुंडगिरीला कंटाळून इतरत्र जात असल्याचीही चर्चा आहे. राजकीय कुरघोड्या आणि निवडणुकीला महत्त्व देताना दुसरीकडे रोजगारवृद्धीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. रोजगार मेळावे घेऊन अमूक लोकांना रोजगार दिल्याचे सांगितले गेले; परंतु मिळणारे रोजगार आणि रिकामे हात यांचे प्रमाण व्यस्त आहे. शेजारच्या राज्यांमध्ये उद्योगांना पायघड्या घातल्या जातात. वीज, पाणी, जमीन सवलतीत मिळते. महाराष्ट्रात आलेल्या उद्योगांसाठी भूसंपादनाचे प्रश्न दहा-दहा वर्षे निकालात निघत नाहीत. हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव नंतर रद्द होतात. उद्योजकांचा यासंदर्भातला अनुभव चांगला नाही. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कितीही चांगली असल्याचा दावा केला जात असला, तरी उद्योजकांकडून स्थानिक पातळी-वर कशी खंडणी वसूल केली जाते, हे काही उद्योजकांनी सांगितले होते. एखाद्याने गुंतवणूक करून उद्योग उभारायचा ठरवला, तरी त्याला सिमेंट, वाळू, स्टील, बांधकाम, कामगार, वाहतुकीसाठी बसेस यासाठी आपल्यालाच कंत्राट द्यावे, या दबावाला तोंड द्यावे लागते. या परिस्थितीमुळे अनेक ठिकाणचे उद्योग स्थलांतरित होतात.

या पार्श्वभूमीवर ही निवडणूक महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात अटीतटीची लढाई असेल. निवडणूक वैचारिक पातळीवर, जाहीरनाम्यांवर किंवा कामावर लढवली जाणार नाही, असे संकेत एकमेकांविषयी वापरल्या जात असलेल्या भाषेवरून दिसते. संपवून टाकू, तू राहशील किंवा मी राहीन या धमक्या, सुपारी, नारळ आणि शेणफेकीच्या घटना आणि सततच्या राजकीय कुरघोडी पाहता या वेळची निवडणूक किती खालच्या पातळीवर जाणार हे स्पष्ट होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कोसळलेल्या पुतळ्याचे राजकारण तोपर्यंत चालूच राहणार. महाराष्ट्रातील प्रमुख सहा पक्षांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित आघाडी, राजू शेट्टी यांची शेतकरी संघटना, बच्चू कडू, विनय कोरे, रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे, एमआयएम, हितेंद्र ठाकूर यांच्या संघटनांचे छोटेखानी पक्ष रिंगणात असतील. शिवाय जरांगे पाटील हा देखील कळीचा मुद्दा असू शकतो. ओबीसी संघटनेनेही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा इशारा दिला आहे. धनगर समाज आदिवासींच्या आरक्षणासाठी रस्त्यावर उतरणार आहे. त्यांना आपल्या आरक्षणामध्ये वाटेकरी बनू देण्यास आदिवासी समाजाचा विरोध आहे. त्यामुळे राज्य सरकारमधील सत्ताधारी पक्षांची कोंडी झाली आहे. मराठा आरक्षणाच्या आक्रमक आंदोलनामुळे मराठवाड्यात झालेले 'मराठा विरुद्ध अन्य सर्व' हे ध्रुवीकरण अतिशय चिंताजनक आहे. बहिष्काराची कृती वाढली आहे. एकमेकांच्या सुखदुखात धावून जाण्याची वृत्ती लोपली आहे. महाराष्टाच्या सामाजिक सौहार्दाला तडा गेला आहे.

असे असले तरी हे वातावरण निवळण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी आरक्षणाच्या तापत्या तव्यावर राजकारणाची पोळी भाजून घेण्यात राजकीय पक्ष धन्यता मानत आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठे यश मिळाले. त्या यशामुळे विधानसभा निवडणूक कितपत सोपी होते, यावर भाष्य करणारी अनेक मनोगते समोर येत आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये कांद्याच्या प्रश्नामुळे महायुतीला फटका बसला. विधानसभेच्या निवडणुकीतही कांदा नडणार असल्याचे चित्र आहे. कांद्याचा भाव वाढल्यानंतर सरकारने हस्तक्षेप करून ३५ रुपये किलो दराने कांदा विकायला सुरुवात केली. अतिवृष्टीने कांद्याचे नुकसान झाले असताना आता मिळत असलेला भावही पाडण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लक्षात घेऊन आता तीन महिने सोयाबीनची खरेदी ४९०० रुपये प्रति क्विंटल दराने करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. ९५ मतदारसंघांमध्ये त्याचा परिणाम होईल; परंतु २०१३ मध्ये सोयाबीनला ४९०० रुपये भाव होता आणि ११ वर्षांमध्ये उत्पादन खर्च तसेच महागाई मोठ्या प्रमाणात वाढली असतानाही तेवढाच भाव असल्याने शेतकरी किती समाधानी असतील, याबाबत साशंकताच आहे. 'लाडकी बहीण'चे दीड हजार रुपये देण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या सोयाबीनला उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्याची शेतकरी महिलांची भावना लक्षात घेतली, तर त्याचा परिणाम मतदानावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विधानसभेच्या निवडणुकीसाठी सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे जागावाटप आणि एकजिनसीपणाने महायुती निवडणुकीला सामोरी जाते का, हा सवाल. भारतीय जनता पक्ष दीडशेपेक्षा जास्त जागा लढवणार हे स्पष्ट आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाने १२० जागा लढवण्याची घोषणा केली आहे. महायुतीचे जागावाटप होण्याअगोदर ही रस्सीखेच सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला किमान साठ जागा हव्या आहेत. महायुतीतील अन्य मित्रपक्षांनीही ठराविक जागांची मागणी केली आहे. महायुतीतील वाद मिटवण्यासाठी कितीही प्रयत्न सुरू असले, तरी घटक पक्षांमधील वाद काही संपायला तयार नाहीत. अजित पवार यांना महायुतीत घेतल्यामुळे केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघच नाही, तर भाजपचे स्थानिक पातळीवरील नेतेही नाराज आहेत. ते अजित पवार यांच्या आमदारांविरोधात आंदोलन करत आहेत. त्यांनी अजितदादांच्या सन्मान यात्रेला काळे झेंडे दाखवले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पवार यांना महायुतीत घेणे फारसे आवडलेले नाही. त्यांनी ते बोलून दाखवले नसले, तरी त्यांचे आमदार अजित पवार यांना विश्वासघातकी मानतात. त्यांचे मंत्री तानाजी सावंत यांना अजितदादांच्या मांडीला मांडी लावून बसल्याने उलटी झाल्यासारखे वाटते, असे म्हटले. गुलाबराव पाटील हे मंत्री अजितदादांच्या अर्थखात्यावर टीका करतात. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादा बरोबर हवेत, असे सांगून आणि महायुतीच्या नेत्यांनी परस्परांवर टीका करणे टाळावे, असे बजावूनही कुणीच ते गांभीर्याने घ्यायला तयार नाही. रामदास कदम आणि रवींद्र चव्हाण यांच्यातला वाद, परस्परांना थोबाडण्याची भाषा महायुतीच्या कार्यकर्त्यांना एकत्र लढण्यास कसे बळ देईल? लोकसभा निवडणुकीतील अनपेक्षित पराभवानंतर केवळ नरेंद्र मोदी यांच्या नावावर मतदार प्रतिसाद देणार नाहीत, हे लक्षात आल्याने महायुतीतील पक्ष सावध झाले आहेत. शिवाय सहनुभूतीची लाट कमी करण्यासाठी हाती सरकार असल्यामुळे मतदारांना मोहात पाडणाऱ्या अनेक योजना मंजूर करण्याचा धडाका महायुती सरकारने लावला आहे. विधानसभा निवडणुकीत त्याचा किती फायदा होईल, हे आत्ताच सांगता येणार नसले, तरी महायुतीबाबतची नाराजी या योजनांमुळे किती कमी होते, ते पहावे लागेल. महायुतीतही सगळ्यात कळीचा मुद्दा जागा वाटपाचाच असेल. महायुतीच्या संभाव्य यशापयशातील कळीचा संभाव्य मुद्दा फडणवीस आहेत. भाजपचे नेते कितीही दावे करोत; पण आता महाराष्ट्र भाजपमध्ये फडणवीस यांचे एकमुखी नेतृत्व राहिलेले नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत केंद्रीय रस्तेबांधणी मंत्री नितीन गडकरी यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. खासगीत बोलताना अनेक लोकप्रतिनिधी फडणवीस यांच्या एकाधिकारशाही विषयी नाराजी व्यक्त करतात. केंद्रीय नेतृत्वाचा पाठिंबा असल्यामुळे केडरबेस नेते आणि कार्यकर्ते निमूटपणे फडणवीस यांना साथ देतीलही; पण बाहेरुन पक्षात आलेले ३२ ते ३५ टक्के नेते त्यांची साथ सोडू शकतात. हे सर्व लक्षात घेत येत्या निवडणुकीत सर्वात जास्त कस फडणवीस यांचाच लागणार आहे. हा अवघड पेपर महायुती कसा सोडवते, ते आता पहायचे.

◇◇◇

# काळोखाच्या वाटेवर युवक

दखल
**भास्कर खंडागळे**


**आज देशात उच्चशिक्षितांनाही लवकर नोकरी मिळत नाही. माहिती तंत्रज्ञान कंपन्यांसह स्टार्टअप कंपन्या अडचणीत आहेत. रोजगार वाढण्याऐवजी कमी होत आहेत. हरियाणामध्ये तर सफाई कामगार पदासाठी पदवीधर व पदव्युत्तर पदवीधरांसह सुमारे ४६ हजार उमेदवारांनी अर्ज केले. 'स्किल इंडिया', 'डिजिटल इंडिया' अशा अनेक योजना गेल्या दहा वर्षांमध्ये राबवूनही युवक काळोखाच्या वाटेवर का आहेत?**

**दे**शात रोजगाराची कमतरता नसल्याचे केंद्र आणि राज्य सरकार नेहमीच सांगत असले, तरी वस्तुस्थिती वेगळीच आहे. आता उच्चशिक्षितांनाही नोकरी मिळत नाही. माहिती तंत्रज्ञान कंपन्यांसह स्टार्ट अप कंपन्याही अडचणीत आहेत. रोजगार वाढण्याऐवजी कमी होत आहेत. या पार्श्वभूमीवर हरियाणातून आलेली बातमी वेगळीच परिस्थिती सांगत आहे. सफाई कामगार पदासाठी येथे पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधरांसह सुमारे ४६ हजार उमेदवारांनी अर्ज केले होते. अशी परिस्थिती केवळ हरियाणामध्येच नाही तर देशभरात आहे. 'स्किल इंडिया', 'डिजिटल इंडिया' अशा अनेक योजना गेल्या दहा वर्षांमध्ये सुरू झाल्या. गेल्या दहा वर्षांपासून केंद्र आणि हरियाणा या दोन्ही ठिकाणी भाजपचेच सरकार आहे. हरियाणा ही तरुणाईची भूमी आहे. तिथे मुले पहाटे चार वाजल्यापासूनच रस्त्यावर यायची आणि तयारीला लागायची. एक दिवस सैन्यात भरती होऊन देश-सेवा करायची, असे त्यांचे स्वप्न दिसायचे.

हरियाणातील तरुण केवळ नोकरीसाठीच तयारी करत नाहीत, तर शरीर तंदुरुस्त ठेवतात. हरियाणातील अनेक मुले यापूर्वीच भारतीय सैन्यात भरती झाली आहेत. लष्करात भरती होण्याची येथील तरुणांची इच्छा असते. मात्र सैन्यात भरतीसाठी राबवण्यात आलेल्या 'अग्निवीर' योजनेमुळे तरुणांचा सैन्यात भरती होण्याचा मार्ग बंद झाला. यामुळेही तरुणांमध्ये नैराश्य आहे. हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये याबाबत जास्त नाराजी आहे.

हरियाणामध्ये नोकरी-व्यवसायाचे दोनच प्रमुख मार्ग आहेत. पहिला सरकारी नोकरी आणि दुसरा शेती. त्यातही बहुतांश तरुण सैन्याकडे अपेक्षेने पाहतात. हरियाणा आणि पंजाब हे दोन्ही प्रांत कृषीप्रधान मानले जातात. दोन्ही ठिकाणच्या शेतकऱ्यांची आपल्यावर अन्याय झाल्याची भावना आहे. येथे शेतकऱ्यांची किमान हमी भावावर पिकांची खरेदी करण्याची मागणी आहे. त्यासाठी कायदा करण्याची मागणी आहे. अलिकडेच हरियाणामध्ये ४६ हजार पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांनी स्वच्छता कर्मचारी पदासाठी अर्ज केले आहेत. इंटरमिजिएट उत्तीर्ण झालेल्या १.२५ लाख तरुणांनीही अर्ज केले आहेत. मुंबईतही पदवीधरांनी उंदीर पकडण्यासाठी नेमावयाच्या कर्मचाऱ्यांच्या पदासाठी अर्ज केले होते. दरम्यान, आयआयटी मुंबईमधून उत्तीर्ण झालेल्या २५ टक्के युवकांना रोजगार मिळाला नसल्याचे आढळून आले. सफाई कामगार पदासाठी सुशिक्षित उच्चशिक्षित तरुण अर्ज करत आहेत, यावरून देशातील बेरोजगारीचा दर किती असेल याचा अंदाज बांधता येतो. प्रत्यक्षात १५ हजार रुपयांचा भरणा तरुणांना आकर्षित करत आहे. तरुण नोकरीच्या मागे धावत आहेत. नीरव मोदी देशाचे १२ हजार कोटी रुपये घेऊन पळून गेला. गेल्या दहा वर्षांमध्ये त्याला परत आणण्यात सरकार अपयशी ठरले आहे. मेहुल चोक्सी, विजय मल्ल्याही देशाचा पैसा घेऊन पळून गेले आणि देशातील तरुण १५ हजार रुपयांच्या नोकऱ्यांच्या मागे धावत आहेत, हे चित्र चिंताजनक आहे.

यापूर्वीही देशात सफाई कामगार पदासाठी भरती होत होती; मात्र सुशिक्षित तरुणांनी त्यासाठी अर्ज भरले नाहीत. आज महागाई आणि बेरोजगारीमुळे तरुण कोणत्याही नोकरीच्या मागे धावत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये नोकऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे; परंतु अलीकडच्या काळात काही नोकऱ्यांसाठी अर्ज येऊ लागले आहेत. हरियाणामध्ये सध्या निवडणुकीचे वातावरण आहे. उत्तर प्रदेशमधील ५९ हजारांहून अधिक शिक्षक लखनऊमध्ये कायमस्वरूपी नोकरीच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. पूर्वी तोटा सहन करूनही सरकार पगार देत असे. रिक्त पदे भरली जात नसल्याने अनेक तरुणांच्या स्वप्नांचा चुराडा झाला. गेल्या अनेक वर्षांपासून परीक्षेपूर्वी पेपर फुटण्याचे प्रकार वाढले आहेत. सरकारी नोकऱ्या कमी असल्याने तरुण खासगी कंपन्यांकडे जाऊ लागले. तेथे कमी पगार देऊन जास्त काम करुन घेतले जाते. खासगी संस्थांमध्ये अनेक वेळा कर्मचाऱ्यांना अचानक काढून टाकले जाते. अशा स्थितीत मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुणांना नोकऱ्या मिळण्यात खूप अडचणी येतात. सरकारनेही याकडे लक्ष देऊन खासगी संस्थांना चांगला निधी देण्यासाठी ठोस धोरण आणण्याची गरज आहे; जेणेकरून त्यांना अडचणी येऊ नयेत. संबंधित व्यक्तीला भविष्यात नोकरी शोधण्यात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी कंपन्यांनी त्यांना काढून टाकण्यापूर्वी काही महिने अगोदर माहिती द्यावी, असा नियम बनवण्याची गरज आहे. सरकारला प्रत्येक मुद्द्याकडे लक्ष देऊन काम करावे लागेल; जेणेकरून देशातील बेरोजगारी दूर होईल.



भारतासह जगातही मंदीची लाट आहे. अनेक कंपन्या कामगार कपात करत आहेत. 'ॲपल'ने कंपनीतील शेकडो कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. कंपनीने सेवा विभागातील सुमारे १०० लोकांना कामावरून काढून टाकले आहे. यामध्ये ॲपल बुक्स ॲप आणि ॲपल बुक स्टोअरचे कर्मचारी आणि काही अभियंते यांचा समावेश आहे. कंपनीच्या या टाळेबंदीमध्ये 'एआय'ने मोठी भूमिका बजावली आहे. कंपनी आता ॲपल बुक्स ॲप व्यवसायाला 'एआय'मध्ये रूपांतरित करण्याचा विचार करत आहे. 'एआय'च्या प्रवेशामुळे 'ॲपल न्यूज' विभागही धोक्यात आल्याचे वृत्त आहे. अमेरिकन चिप उत्पादक कंपनी इंटेल सध्या वाईट काळातून जात आहे. कर्मचाऱ्यांना नोकऱ्या गमावून त्याचा थेट परिणाम भोगावा लागत आहे. 'कॉस्ट कटिंग'च्या नावाखाली कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या १५ टक्क्यांनी कमी केली. या अंतर्गत १५ हजार लोकांना नोकरी गमवावी लागली. दुसऱ्या तिमाहीमध्ये महसुलात मोठी घट झाल्याने आणि भविष्यात व्यवसाय झेप घेणार नाही या भीतीने कंपनीने हा निर्णय घेतला. नेटवर्किंग उपकरणे बनवणारी कंपनी 'सिस्को'देखील टाळेबंदी करणाऱ्या टेक कंपन्यांमध्ये मोडते. कंपनी अंदाजे सहा हजार कर्मचारी कमी करत आहे. या वर्षी कंपनीतील टाळेबंदीची ही दुसरी फेरी होती. आपला खर्च कमी करणे आणि सायबर सुरक्षा आणि 'एआय' वर लक्ष केंद्रित करणे हा कंपनीचा या टाळेबंदीमागील उद्देश आहे. 'सिस्को' तीनही 'एआय' कंपन्यांमध्ये एक अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे.

दरम्यान, 'डेल टेक्नॉलॉजीज'मधील हजारो कामगारांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या आहेत. कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांपैकी दहा टक्के म्हणजेच १२,५०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. 'डेल'मधील टाळेबंदी हा 'एआय' आणि नव्या युगातील 'आयटी' सोल्यूशन्समधील गुंतवणुकीला प्राधान्य देण्यासाठी मोठ्या पुनर्रचनेचा भाग आहे. बऱ्याच टेक कंपन्यांप्रमाणे डेललादेखील आपले लक्ष 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'कडे वळवायचे आहे. गेल्या महिन्यात अमेरिकन टेक कंपनी 'आयबीएम'ने चीनमधील संशोधन कार्य बंद करण्याची घोषणा केली. या घोषणेमुळे हजाराहून अधिक लोकांच्या नोकऱ्या गेल्या. अलीकडे चीन आणि अमेरिका यांच्यातील व्यापारयुद्धाचा बहुराष्ट्रीय कंपन्यांना मोठा फटका बसला असून या साखळीत 'आयबीएम'चाही समावेश झाला आहे. 'ईनफिनॉन'ही कंपनी १४०० कर्मचाऱ्यांना काढून टाकत आहे. तिसऱ्या तिमाहीमध्ये समाधानकारक महसूल न मिळाल्याने कंपनीने हा निर्णय घेतला आहे. बंगळुरूस्थित 'शेअरचॅट'ने ऑगस्ट २०२४ मध्ये कर्मचाऱ्यांमध्ये पाच टक्के कपात केली. यामध्ये ३०-४० लोक बाधित झाले. वेब ब्राउझर आणि सर्च स्टार्टअप 'ब्रेव्ह'नेही आपल्या सर्व विभागांमध्ये २७ कर्मचाऱ्यांना कामावरून काढले आहे. आर्थिक संकटामुळे ब्रेव्हने ऑक्टोबर २०२३ मध्ये आपले कर्मचारी नऊ टक्के कमी केले होते.

देशात निवडणुकांप्रसंगी भावनिक मुद्यांना दिले जाते, तेवढे महत्व बेरोजगारी, महागाईला दिले जात नाही. जगातील सर्वात तरुण देशातील तरुणांच्या हाताला काम नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे देशात युवकांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. तरुणांपेक्षाही युवकांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. सरकार, धुरीण याकडे कधी लक्ष देणार?

◇◇◇

# हे दोष दूर व्हावेत...

परामर्श
**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

**रिअल इस्टेट क्षेत्रातील संकटाबरोबरच बाजारात आत्मविश्वासाचा अभाव आणि देशांतर्गत अपुरी मागणी यांचा चीनी उद्योगांच्या विकासावर परिणाम होत आहे. भारत मात्र याचा फायदा उठवण्यात अपयशी ठरला. खड्डेयुक्त रस्ते, मालवाहतुकीचा मंदावलेला वेग, विजेचे प्रचंड दर, उदंड भ्रष्टाचार या त्रुटींवर आपण मात करु शकलेलो नाही. यामुळे निर्यातखर्च वाढतो आणि आपण स्पर्धेत टिकत नाही. हे दोष दूर व्हायला हवेत.**

जागतिकीकरणानंतर भारताची अर्थव्यवस्था अतिशय मोठ्या प्रमाणात जगाशी जोडली गेली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजाराचे पडसाद भारतात त्वरीत उमटू लागले. २००८ मध्ये जागतिक मंदी आली, त्याचा फटका आपल्यालाही बसला. परंतु तेव्हा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी वेळीच दक्षता घेतल्यामुळे इथल्या बँका आणि वित्तीय क्षेत्रावर त्याचा भयंकर परिणाम होण्याचे टळले. आता गेल्या दशकभरात आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित अशा क्षेत्रांमधील भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीही घटली असल्याचे निरीक्षण जागतिक बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी नोंदवले आहे. खरे तर चीनने रोजगारप्रधान उत्पादन क्षेत्रांमधून हळूहळू अंग कढून घेतल्यामुळे, भारताला त्या क्षेत्रातील मालाची निर्यात वाढवण्याची उत्तम संधी प्राप्त झाली होती. परंतु ती भारताने गमावली असल्याचे जागतिक बँकेला वाटते. आपण पंतप्रधान झाल्यानंतर भारताची जगात दखल घेतली जाऊ लागली, असा दावा नरेंद्र मोदी करत आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, ही वस्तुस्थिती धक्कादायक मानावी लागेल.



अॅपरेल, चर्मोद्योग, वस्त्रप्रावरणे आणि पादत्राणे या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. चीनमध्ये मजुरीचे दर वाढू लागल्यानंतर मात्र अनेक कंपन्यांनी या क्षेत्रातून माघार घेण्यास सुरुवात केली. त्याचा लाभ बांगलादेश, व्हिएतनाम, पोलंड, फ्रान्स या देशांनी घेतला आणि २०१५ ते २०२२ काळात जगाच्या व्यापारातील आपला या क्षेत्रातील हिस्सा वाढवला. उलट वस्त्र, चर्मोद्योग एवढेच नव्हे, तर रत्न आणि आभूषणे व सागरी उत्पादने या मजूरप्रधान उद्योगांमधील भारताची निर्यात १२ टक्क्यांनी घसरली आहे. भारताची वस्त्रनिर्यात ३५ अब्ज डॉलर्सपर्यंतच कुंठित झाली आहे. उलट, मुक्त व्यापार करार करून तसेच अल्पविकसित देशाच्या दर्जाचा लाभ उठवून, व्हिएतनाम आणि बांगलादेशने आपला बाजारहिस्सा वाढवून घेतला आहे. वास्तविक, भारताची विकासगती गेल्या वर्षी ८.२ टक्के राहिली. त्यामुळे 'सर्वाधिक गतीने वाढणारा देश' म्हणून आपण ख्याती प्राप्त केली. असे असूनही, शहरी तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर १७ टक्के असणे, ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे जागतिक मूल्यसाखळीत भारताची अर्थव्यवस्था अधिक प्रमाणात रुजवणे आवश्यक आहे. तसे झाल्यास, देशाला नवनवीन संधी प्राप्त होऊन बेकारांना नोकऱ्या मिळतील. त्यासाठी केंद्र सरकारला आपल्या निर्यात धोरणात बदल करावा लागेल. आयात-निर्यात अधिक सुरळीत आणि कमी खर्चात होईल, अशी धोरणे आखावी लागतील.

भारताने विविध देशांशी मुक्त व्यापार करार केला असला, तरी त्यातून डिजिटल व्यापारासारखी क्षेत्रे वगळली असल्याचे सूक्ष्म निरीक्षण जागतिक बँकेने नोंदवले आहे.

दुसरीकडे, गेल्या काही वर्षांमध्ये भारत आणि चीनचे संबंध विकोपाला गेले आणि त्यानंतर भारताने चीनवर बहिष्काराचे अस्त्र उगारले. मागील काही वर्षांमध्ये भारत चीनकडून जेवढ्या मूल्याची एकूण आयात करत होता, त्याच्या केवळ एक पंचमांश इतक्या मालाची निर्यात आपण चीनला केली आहे. चीनला भारताकडून दर वर्षी सरासरी १३ अब्ज डॉलर्स इतकी निर्यात केली जाते तर चीनकडून होणाऱ्या आयातीचे प्रमाण सरासरी ६६ अब्ज डॉलर्स इतके आहे. भारतातून चीनला सेंद्रिय रसायने, शुद्धीकृत तांबे, कापूस धागा, मिरी, वनस्पती तेल, मासे, मसाले, लोह खनिज, ग्रॅनाईट दगड आणि पेट्रोलियम उत्पादनांची निर्यात केली जाते तर चीनकडून भारतात मुख्यतः विद्युत यंत्रसामग्री आणि अन्य यांत्रिक साधनांची आयात केली जाते. पूर्वी भारतातून चीनला कॉपर कॅथड्सची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जात असे. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये ही स्थिती राहिलेली नाही. गेल्या वर्षी कापूस आणि कापूस धाग्याची निर्यातही मंदावली. भारत चीनकडून स्वयंचलित डेटा प्रोसेसिंग मशिन्स, दूरध्वनी सामग्री, व्हिडिओ फोन, इलेक्ट्रॉनिक सर्किट्स, ट्रान्झिस्टर, सेमिकंडक्टर डिव्हायसेस, प्रतिजैविके, खते, टीव्ही कॅमेरे, रेकॉर्डिंगची साधने, वाहनांचे घटक वगैरेंची आयात करू लागला. भारतात दूरसंचार क्रांती झाल्यामुळे चीनकडून मोठ्या प्रमाणावर दूरसंचार सामग्री आणि मोबाईल फोनची आयात होऊ लागली.

भारतातील इलेक्ट्रॉनिक हार्डवेअरचे उत्पादन अजूनही प्राथमिक स्थितीत आहे. त्यामुळे चीनमधून त्याचीही आयात केली जाते. परंतु भारतात मोबाईल फोन्सचे अधिक उत्पादन होऊ लागले आहे. त्यामुळे आयात कमी झाली आहे. आजही भारत चीनला मुख्यतः कच्च्या मालाची निर्यात करतो. अर्थात अलीकडील काळात मूल्यवर्धित निर्यातही सुरू झाली आहे. कर्करोगावरील औषधे, वाहनांचे घटक, प्रक्रियायुक्त खाद्यान्ने यांची निर्यात वाढू लागली आहे. ही स्वागतार्ह बाब मानली पाहिजे. पूर्वी भारत चीनला कच्चा कापूस निर्यात करत असे आणि कापसाचा धागा आयात करत असे. परंतु आजकाल आपण कापसाचा धागा आयात करण्याऐवजी तो निर्यात करू लागलो आहोत. चीनने आपला मोर्चा रोजगारप्रधान उद्योगांकडून मध्यम आणि उच्च तंत्रज्ञानयुक्त उद्योगांकडे वळवला आहे. त्यामुळे तो भारताकडून कापूस धागा आयात करू लागला आहे. इतरही काही उद्योगांसंदर्भात हीच बाब लागू पडते. १९व्या शतकात भारत ब्रिटिशांना कच्चा माल पुरवत होता. त्यावर प्रक्रिया करून ब्रिटिश भारताला तयार उत्पादने पाठवत. त्या काळात भारत कच्चा कापूस, नीळ, अफू, ताग, चहा, कच्चे चामडे या वस्तूंची निर्यात करत असे तर ब्रिटनमधून कापूस धागा, लोखंड आणि पोलाद उत्पादनांची आयात करत असे. वासाहतिक काळात ब्रिटन हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश होता. 'सेंटर फॉर इकॉनॉमिक स्टडीज अँड प्लॅनिंग' या दिल्लीस्थित संस्थेचे प्राध्यापक विश्वजित धर यांच्या मते भारत आणि चीनमधील सध्याचा व्यापार हा वासाहतिक काळासारखाच आहे.

चीनच्या स्पर्धेत भारताचे उत्पादन क्षेत्र टिकू शकत नाही. चीनमध्ये प्रचंड उत्पादन होते. त्याची निर्यात जगाला केली जाते. त्यासाठी चीनला इंटरमिजिएट इनपुट्सची किंवा आदानांची गरज होती आणि आहे. ही आदाने चीन भारताकडून खरेदी करत आला आहे. भारताप्रमाणे ऑस्ट्रेलियाकडूनही चीन मोठ्या प्रमाणावर कच्चा माल आणि सामग्रीची आयात करत असतो. चीनमधून आलेल्या मालावर बहिष्कार घालण्याच्या कितीही गर्जना केल्या, चिनी अॅप्सवर बंदी घातली, तरीदेखील आजही जागतिक बाजारपेठेत चीन भारताच्या कित्येक कोस पुढे आहे. मात्र आज केवळ भारत-चीन संबंधांचा प्रश्न नसून चीनच्या पिछेहाटीचा योग्य तो फायदा उठवण्यात भारत कमी पडत आहे, हा आहे. २०२४ च्या सुरुवातीला जागतिक उत्पादनाचा दृष्टिकोन अंधःकारमय दिसत होता. चीनमधील उत्पादन अपवाद नाही. सध्या सुरू असलेले गृहनिर्माण बाजारातील संकट, कमकुवत देशांतर्गत मागणी आणि उत्पादनाला जवळपासच्या प्रदेशात आणि स्वस्त ठिकाणी स्थलांतरित करण्याचा सततचा कल यामुळे निर्यात आणि देशांतर्गत मागणी कमी होत आहे. त्यामुळे चीनी उत्पादनावर दबाव येत आहे. 'इंटरॅक्ट अॅनॅलिसिस मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री' आउटपुट (एमआयओ) ट्रॅकर त्रैमासिक प्रकाशित केला जातो. तो वेगाने वाढणाऱ्या उत्पादन क्षेत्राबाबत महत्त्वाची अंतर्दृष्टी प्रदान करतो. अहवालात ४५ देशांमधील १०२ हून अधिक उद्योग आणि उप-उद्योगांचा समावेश असून पाच वर्षांच्या अंदाजासह १५ वर्षांचा ऐतिहासिक डेटा सादर केला गेला आहे.

नवीनतम 'एमआयओ' ट्रॅकर सूचित करतो की चीनमध्ये चलनविषयक आणि वित्तीय धोरणे प्रभावी होण्यास सुरुवात होईल आणि अधिक उत्तेजनात्मक उपाय अपेक्षित आहेत. तथापि, वाढ अजूनही कमकुवत आहे आणि २०२४ मध्ये चीनचा 'एमआयओ' किंमतवाढीचा अंदाज तीन टक्क्यांवरून २.६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. हे चीनच्या उत्पादन उद्योगासाठी निराशाजनक आहे. २०२५ पासून वाढीचा वेग वाढण्याची अपेक्षा आहे. रिअल इस्टेटच्या संकटाबरोबरच बाजारपेठेतील आत्मविश्वासाचा अभाव आणि देशांतर्गत अपुरी मागणी यांचाही चीनच्या उत्पादन उद्योगाच्या विकासावर परिणाम होत आहे. कोरोनानंतरच्या तीन वर्षांमध्ये खासगी उद्योगांकडून आत्मविश्वास आणि गुंतवणुकीला फटका बसला आहे तर गेल्या दोन वर्षांमध्ये रोजगार, ग्राहकांचा आत्मविश्वास आणि शेअर बाजार या सर्व गोष्टी मंदावल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने फायदा उठवायला हवा होता; परंतु आशियातील अन्य छोट्या देशांनी फायदा उठवला असताना भारत अपयशी ठरला. भारतातील रस्ते खड्डेयुक्त असल्यामुळे कारखान्यांमधून बंदरांपर्यंतच्या मालवाहतुकीचा वेग मंद असतो. विजेचे दरही प्रचंड आहेत आणि ठिकठिकाणी उदंड भ्रष्टाचार आहे. यामुळे निर्यातखर्च वाढत असतो आणि स्पर्धेत आपला माल टिकत नाही. हे दोष लवकरात लवकर दूर करण्याची गरज आहे.

◇◇◇

# 'सेबी'प्रमुखांची चोहोबाजूंनी कोंडी

दखल
**महेश जोशी**

**'हिंडेनबर्ग'ने 'सेबी'च्या प्रमुख माधवी पुरी बुच यांच्यावर केलेले ताजे आरोप, 'सेबी'च्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याविरोधात केलेले आंदोलन, आणि केलेले आरोप, एकाच वेळी लाभाच्या तीन पदांवर राहून त्यांनी घेतलेला फायदा, अर्थतज्ज्ञांनी याबाबत उपस्थित केलेले प्रश्न आणि आता लोकलेखा समितीने घेतलेला त्यांची चौकशी करण्याचा निर्णय हे सर्व पाहता माधवीजी चोहोबाजूंनी अडकल्या आहेत. त्या निमित्ताने घेतलेला वेध.**

'हिंडेनबर्ग रिसर्च'ने 'सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' (सेबी) च्या अध्यक्ष माधबी पुरी-बुच आणि त्यांच्या पतीवर अदानीशी संलग्न असलेल्या विदेशी निधीमध्ये हिस्सा असल्याचा आरोप केला; मात्र 'सेबी'प्रमुखांनी हा आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले. बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांचा अदानी समूहातील निधीच्या कथित गैरवापरासाठी वापरल्या गेलेल्या विदेशी निधीमध्ये हिस्सा आहे. बुच दांपत्याने एक संयुक्त निवेदन जारी करून हिंडेनबर्गचे आरोप नाकारले आणि त्यांना पूर्णपणे निराधार म्हटले. त्यांच्या मते अहवालात केलेले आरोप पूर्णपणे निराधार आहेत. यासंदर्भात सर्व आवश्यक खुलासे 'सेबी'ला आधीच देण्यात आले आहेत. पारदर्शकता, तपशीलवार निवेदन योग्य वेळी जारी केले जाईल. काँग्रेसने केंद्र सरकारकडे अदानी समूहाच्या नियामक तपासणीतील सर्व हितसंबंध दूर करण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्षाने घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी एक संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे. 'सेबी'वर अदानीविरुद्ध तपास न केल्याचा आरोप केला आहे. 'सेबी'ने मॉरिशस आणि परदेशातील शेल युनिट्सच्या अदानीच्या कथित अघोषित 'वेब'ची चौकशी करण्यात स्वारस्य दाखवले नाही. बुच आणि त्यांच्या पतीची अदानी समूहाच्या पैशांच्या गैरव्यवहार घोटाळ्यात वापरल्या गेलेल्या 'ऑफशोअर फंड्स'मध्ये भागीदारी होती, असे 'हिंडेनबर्ग'ने 'व्हिसलब्लोअर कागदपत्रे' उद्धृत करून सांगितले. 'हिंडेनबर्ग'च्या मते हा निधी गैरवापरासाठी वापरला गेला. समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांचे मोठे बंधू विनोद अदानी यांनी बर्मुडा आणि मॉरिशसच्या निधीवर ऑफशोअर फंड नियंत्रित केला आणि समूहाच्या शेअर्सची किंमत वाढवली.

बुच दांपत्याची एकूण संपत्ती एक कोटी डॉलर आहे. 'हिंडेनबर्ग'ने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, 'आयआयएफएल'मधील प्रमुखांनी केलेल्या निधी घोषणा, गुंतवणुकीचा स्रोत पगार हाच आहे आणि जोडप्याची एकूण संपत्ती दहा दशलक्ष डॉलर एवढी आहे असे नमूद केले आहे. कागदपत्रांवरून दिसून आले आहे की, हजारो सुस्थापित भारतीय म्युच्युअल फंड उत्पादनांची मालकी असूनही बुच आणि त्यांच्या पतीने कमी मालमत्तेसह बहुस्तरीय ऑफशोअर फंडांमध्ये भाग घेतला होता. 'हिंडेनबर्ग'च्या मते अदानी यांची मालमत्ता उच्च-जोखीम अधिकारक्षेत्रातून गेली आहे. घोटाळ्याशी कथित संबंध असलेल्या कंपनीने त्याची देखभाल केली होती. ही संस्था अदानी संचालकांद्वारे चालवली जात होती आणि कथित अदानी कॅश मॅनिप्युलेशन घोटाळ्यात विनोद अदानी यांनी वापरली होती. परदेशी बाजारात गुंतवणूक करणाऱ्या अशा फंडांना 'ऑफशोअर फंड' म्हणतात. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचाही 'हिंडेनबर्ग'ने आपल्या अहवालात हवाला दिला. त्यात अदानींच्या कथित परदेशी भागधारकांना वित्तपुरवठा कोणी केला याचा तपास 'सेबी'ने का केला नाही असा सवाल करत 'सेबी'ला स्वतःच्या प्रमुखाकडे निर्देश करणाऱ्या प्रकरणाचा पाठपुरावा करायचा नव्हता, असे अहवालात म्हटले आहे.

अहवालानुसार, व्हिसलब्लोअरकडून मिळालेल्या कागदपत्रांवरून दिसून आले की धवल बुच यांनी २२ मार्च २०१७ रोजी मॉरिशस फंड प्रशासक ट्रायडेंट ट्रस्टला एक मेल केली होती. बुच यांची 'सेबी'च्या अध्यक्षपदी नियुक्ती होण्याच्या काही आठवड्यांपूर्वी ही मेल पाठवली होती. त्यांच्या आणि त्यांच्या पत्नीच्या 'ग्लोबल डायनॅमिक ऑपॉर्च्युनिटीज फंड' (जीडीओएफ) मध्ये केलेल्या गुंतवणुकीबद्दल ती करण्यात आली होती. अदानी यांच्यावर शेअर्समध्ये फेरफार आणि अकाउंटिंग फ्रॉडचा आरोप होता. अदानी समूहाने हा आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले होते. 'अदानी ग्रुप'ची प्रमुख कंपनी असलेली अदानी एंटरप्रायझेस वीस हजार कोटी रुपयांची फॉलो-ऑन पब्लिक ऑफर (एफपीओ) लाँच करण्याच्या तयारीत होती. बंदरांपासून ऊर्जेपर्यंतच्या क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या अदानी समूहाने म्हटले होते की हा अहवाल चुकीच्या आणि निराधार माहितीवर आधारित आहे. नवीन हिंडेनबर्ग अहवालानंतर, अदानी समूहाने त्यांच्या फॉल बॅक परिस्थितीसाठी नियोजन सुरू केले. एका माहितीनुसार, अदानी समूह 'सेबी'च्या आगामी अध्यक्षपदासाठी आपल्या प्रभावातील एका व्यक्तीची नियुक्ती करण्याचा प्रयत्न करत आहे. स्टेट बँकेच्या अध्यक्षपदावरून नुकतेच निवृत्त झालेले दिनेश खारा यांचा अदानी समूह या पदासाठी विचार करत असून त्यांचे नाव पुढे करत आहे. यामुळे त्यांचा व्यवसाय कोणत्याही नियामक कारवाईपासून संरक्षित केला जाऊ शकतो, असा प्रयत्न आहे.

'हिंडेनबर्ग'च्या आरोपानंतर माधवी पुरी-बुच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिल्या आहेत. 'सेबी'प्रमुखांनी आतापर्यंत केलेले सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्यावर सेबीच्या अध्यक्षपदी असतानाही आयसीआयसीआय बँकेतून पगार घेतल्याचा आणि कर्मचाऱ्यांसाठी अन्यायकारक कार्यसंस्कृती निर्माण केल्याचा आरोप आहे. माधवी पुरी यांनी 'सेबी'प्रमुख पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस सातत्याने करत आहे. सार्वजनिक लेखा समिती (पीएसी)ने 'सेबी' आणि पुरी-बुच यांच्या चौकशीचा निर्णय घेतला आहे. संसदीय समितीने आपला अजेंडा सूचित केला असून पुनरावलोकन प्रक्रियेदरम्यान त्यांना बोलावले जाऊ शकते. माधवी बुच यांनी आपल्या सात वर्षांच्या कार्यकाळात सल्लागार कंपनीकडून महसूल मिळवणे सुरू ठेवल्याचा आरोप आहे. यामुळे नियामक प्राधिकरणांच्या नियमांचे उल्लंघन होते. 'रॉयटर्स'ने सार्वजनिक कागदपत्रांचा आढावा घेतल्यानंतर हा अहवाल प्रसिद्ध केला होता. 'हिंडेनबर्ग'ने असाच आरोप केला होता, त्यानंतर बुच यांनी आपण सल्लागार कंपनीची माहिती 'सेबी'ला दिल्याचे सांगितले होते. २०१९ मध्ये आपले पती 'युनिलिव्हर' मधून निवृत्त झाल्यानंतर हा सल्लागार व्यवसाय हाताळत होते. बुच यांनी २०१७ ते २०२४ दरम्यान 'आयसीआयसीआय बँक', 'आयसीआयसीआय प्रुडेन्शियल', 'ईएसओपी' यांच्याकडून १६.८० कोटी रुपये मिळवल्याचा आरोप काँग्रेसने केला होता. मात्र बँकेने हे आरोप फेटाळून लावले असून त्यांना निवृत्तीचे लाभ दिले जात असल्याचे म्हटले.



यानंतर काँग्रेसने आणखी काही आरोप करून बुच यांना अडचणीत आणले. 'सेबी'च्या पाचशे कर्मचाऱ्यांनी अर्थ मंत्रालयाला पत्र लिहून पुरी बैठकीदरम्यान ओरडतात आणि शिव्या देतात, जाहीर अपमान करतात असा आरोप केला. गेल्या दोन-तीन वर्षांपासून 'सेबी'मधील वातावरण दूषित झाले असल्याचा त्यांचा आरोप होता. कर्मचाऱ्यांनी त्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. त्यानंतर 'सेबी'ने कर्मचाऱ्यांचे वर्तन घटनाबाह्य असल्याचे स्पष्टीकरण दिले. यानंतर काँग्रेसने माधवी पुरी यांनी आपली मालमत्ता एका कंपनीला भाड्याने दिल्याचा नवा आरोप केला. 'सेबी' त्याची चौकशी करत आहे. पवन खेडा यांनी दावा केला की याबाबत 'वोक्हार्ट लिमिटेड'च्या तक्रारी 'सेबी'कडे करण्यात आल्या आहेत. 'सेबी' संबंधित तक्रारींची चौकशी करत आहे. खेडा यांनी दावा केला की माधवी पुरी-बुच २०१८ मध्ये 'सेबी'च्या पूर्णवेळ सदस्य बनल्यानंतर एक मालमत्ता भाड्याने दिली. २०१८-१९ या आर्थिक वर्षात त्यांना त्यापोटी सात लाख रुपये भाडे मिळाले. २०१९-२० मध्ये त्यांना ३६ लाख रुपये भाडे मिळाले होते. पुरी यांनी आपली मालमत्ता 'कॅरोल इन्फो सर्व्हिसेस लिमिटेड'ला भाड्याने दिली आहे. 'वोक्हार्ट कंपनी'त या कंपनीचा हिस्सा आहे. आतापर्यंत पुरी-बुच यांनी कंपनीकडून २.१६ कोटी रुपयांहून अधिक भाडे घेतले असल्याचा आरोप आहे.

'एस्सेल ग्रुप'चे अध्यक्ष आणि सरकारच्या जवळच्या असलेल्या डॉ. सुभाष चंद्रा यांनीही पुरी बुच यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'झी एंटरटेनमेंट' आणि 'सोनी एंटरटेनमेंट' यांच्यामधील डील तोडण्यासाठी पुरी-बुच प्रयत्नशील होत्या, असा आरोप त्यांनी केला. त्यासाठी त्यांनी शेकडो कोटी रुपयांची लाच मागितली होती, असा आरोप त्यांनी केला. पुरी बुच यांनी एप्रिल २०१७ ते मार्च २०२२ या कालावधीत अगोरा पार्टनर्स नावाच्या सिंगापूरस्थित सल्लागार कंपनीत शंभर टक्के हिस्सा घेतला होता. त्याच वेळी त्या 'सेबी'च्या प्रमुख होत्या, असाही आक्षेप घेण्यात आला आहे. 'हिंडेनबर्ग' संशोधन अहवालात दावा करण्यात आला आहे की सिंगापूरच्या संस्थांना आर्थिक तपशील उघड करण्यापासून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे सल्लागार व्यवसायातून बुच यांना किती महसूल मिळाला आणि त्यांचे ग्राहक कोण होते हे स्पष्ट होत नाही. अहवालानुसार, बुच यांची 'अगोरा अॅडव्हायझरी' या कंपनीमध्ये शंभर टक्के भागीदारी आहे, ज्यामध्ये त्यांचे पती संचालक आहेत. २०१९ मध्ये धवल बुच यांची प्रतिष्ठित अमेरिकन गुंतवणूक व्यवस्थापन समूह 'ब्लॅकस्टोन' या प्रतिष्ठीत कंपनीमध्ये वरिष्ठ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. याआधी कोणत्याही फंड, रिअल इस्टेट किंवा भांडवली बाजारात काम केले नसतानाही धवल यांना इतके महत्त्वाचे पद मिळाले. त्यांच्या कार्यकाळात 'सेबी'ने नियमांमध्ये अनेक बदल केले. त्यामुळे 'ब्लॅकस्टोन'सारख्या खासगी इक्विटी कंपन्यांना फायदा झाला. आता माधवी पुरी बुच या आरोपांना सामोऱ्या जात आहेत. मात्र एकूण परिस्थिती पाहता त्यांना विरोधकांच्या सातत्यपुर्ण आरोपांना तोंड द्यावे लागत आहे.

◇◇◇

# भारतात जन्मदर घटला, लोकसंख्या कमी होतेय..



'दीवार' चित्रपटात शशी कपूर अमिताभ यांची कार, बंगला आणि बँक बॅलन्सला तुच्छ लेखतो आणि म्हणतो, मेरे पास मां है. त्याचप्रमाणे आईचेही आपल्या मुलांसाठी असीम प्रेम, सद्भावना आणि समर्पण असते. आई होणे ही जगातील सर्वात सुंदर भावना असते असे म्हणतात. रॉबर्ट ब्राउनिंग यांनी म्हटले आहे की मातृत्व हेच आहे जिथे सर्व प्रेम सुरू होते आणि संपते.

पण जर एखादी स्त्री या आनंदापासून वंचित राहिली तर? काही स्त्रिया आरोग्याच्या कारणांमुळे आणि काही स्वतःच्या स्वेच्छेने माता बनत नाहीत. मग या महिला हीन आहेत का? सामाजिक रूढीवादी मानकांवर 'स्वार्थी आणि अपूर्ण'. या गोष्टी खऱ्या आहेत का?

आज आपण अचानक आई बनण्याच्या किंवा न होण्याच्या निवडीबद्दल का बोलत आहोत असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. वास्तविक, गेल्या काही वर्षांत आपल्या देशात जन्मदर घसरला आहे.

2019-21 मध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार, भारतातील एकूण प्रजनन दर प्रति महिला 2.2 मुलांवरून प्रति महिला 2.0 मुलांवर घसरला आहे. हा आकडा 2.1 च्या बदली दरापेक्षा कमी आहे. वास्तविक, बदली दर हा जन्मदर आहे ज्यामध्ये जन्म आणि मृत्यूचे संतुलन राखले जाते आणि लोकसंख्या स्थिर राहते. एखाद्या देशाचा जन्मदर बदली दरापेक्षा कमी झाला तर तेथील लोकसंख्या कमी होऊ लागते.

त्यामुळेच गेल्या काही वर्षांत भारतासह जगभरातील देशांमध्ये कमी मुले जन्माला घालण्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. माता न होण्याचा निर्णय घेणाऱ्या महिलांवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. कंझर्व्हेटिव्ह विभाग गर्भपातावर कठोर कायदे बनवण्याचा सल्ला देत आहे. जणू पृथ्वी चालवण्याची आणि कुटुंब वाढवण्याची संपूर्ण जबाबदारी फक्त महिलांवरच आहे.

आपल्या समाजातील काही लोक म्हणतात की आई झाली की स्त्री पूर्ण होते. याचा अर्थ जी स्त्री आई होऊ शकत नाही ती स्त्रीच नाही का? अमेरिकेतील मेन युनिव्हर्सिटीच्या समाजशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. एमी ब्लॅकस्टोन या देखील अशा महिलांपैकी एक आहेत ज्यांनी मूल न होऊ देण्याचा निर्णय घेतला. यानंतर त्यांना अनेक टोमणे ऐकावे लागले. डॉ एमींनी यावर एक पुस्तकही लिहिले... 'चाइल्डफ्री बाय चॉईस'.

जेव्हा डॉ. एमी लोकांना सांगतात की तिला मुले नाहीत किंवा तिला नको आहे, तेव्हा लोक तिच्याकडे न्यायाने, दया किंवा निषेधाने पाहतात. पण मुलांच्या बाबतीत असा निर्णय घेणारी ती एकमेव महिला नाही. आज जगभरात मुलं होण्याची इच्छा नसलेल्या लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. यामध्ये महिला आणि पुरुष दोघांचाही समावेश आहे. तो हे उघडपणे स्वीकारत आहे आणि त्याबद्दल बोलत आहे. तरीही ही निवड, आणि त्याचे वैयक्तिक आणि सांस्कृतिक परिणाम, अजूनही अनेकदा गैरसमज आहेत.

प्रसिद्ध पत्रकार आणि लेखिका रुबी वॉरिंग्टन, संडे टाईम्स, यूकेच्या माजी फीचर्स एडिटर यांनी एक पुस्तक लिहिले आहे- 'वुमन विदाऊट किड्सः द रिव्होल्युशनरी राईज ऑफ एन अनसंग सिस्टरहुड.' रुबी विचारते की मुले नसलेली स्त्री असणं हा एक वारसा बनला तर? या पुस्तकात रुबीने तिच्या वैयक्तिक कथा आणि प्रवासातून मातृत्वाशी संबंधित मोठ्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा शोध घेतला आहे. आई बनण्याची इच्छा नसलेल्या मुलीसाठी आपल्या समाजात कोणतेही अधिकृत स्थान नाही, असे ती लिहिते. ती उपेक्षित आहे.

ती लिहिते की मुले नसलेल्या स्त्रियांचे वर्णन दुःखी, आत्ममग्न असे करण्याऐवजी आपण त्यांच्याकडे धैर्याने पाहिले आणि त्यांना असे म्हणून स्वीकारले तर काय होईल.

**आईशिवाय स्त्री अपूर्ण आहे का?**

आपल्या समाजात महिलांवर माता होण्यासाठी नेहमीच दबाव असतो. तिला समाजाला सांगावे लागते की ती परिपूर्ण आहे, तिच्यात कोणताही दोष नाही. भारतात स्त्रीने आई होणे अपेक्षित आहे, परंतु तिने स्वतः आई होणे आवश्यक आहे म्हणून नाही. कारण मातृत्व तिच्या कर्तव्यात समाविष्ट आहे.

आई, पती-पत्नी, मुलांची काळजी घेणे आणि घर हे एकमेकांशी जोडलेले आहेत. पण हेच तिला एक चांगली स्त्री बनवते. ती मानत नाही, समाज म्हणतो. एकल माता किंवा अगदी एकल स्त्रीला तिच्या कुटुंबाच्या पलीकडे असलेल्या समाजात 'पवित्र स्त्री' म्हणून पाहिल्यासच तिचा समावेश होतो.

**बदल अवघड आहे, पण अशक्य नाही**

एकूणच, समाजाला आपल्या जुन्या परंपरा आणि प्रस्थापित पद्धतींचे पालन करायचे आहे. कोणत्याही प्रकारचा बदल स्वीकारणे त्याला फार कठीण जाते. पण त्याचवेळी सत्य हे आहे की बदल हे सृष्टीचे अंतिम सत्य आहे. सर्व काही सतत बदलाचा भाग आहे.

ज्याप्रमाणे एका ठिकाणी साचलेले पाणी सडते, त्याचप्रमाणे बदल नाकारणारा आणि काळाबरोबर स्वतःला बदलण्यास नकार देणारा समाजही हळूहळू नष्ट होतो.

पारंपारिक भूमिकेतून आधुनिक भूमिकेकडे वाटचाल करणाऱ्या स्त्रिया हाही त्याच अखंड बदलाचा भाग आहे. आज जर स्त्रिया मातृत्वाला नाही म्हणत असतील तर त्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांनी आता आर्थिक स्वातंत्र्याची चव चाखली आहे. दोन वेळच्या जेवणासाठी आणि डोक्यावर छप्पर यासाठी आता ती पुरुष आणि कुटुंबावर अवलंबून नाही. आता ती स्वतःचे पैसे कमवत आहे, स्वतःचे बिल भरत आहे, तिच्या डोक्यावर छप्पर बांधत आहे आणि तिच्या आयुष्याशी संबंधित प्रत्येक लहान निर्णय स्वतः घेत आहे.

महिला मातृत्वाच्या विरोधात नाहीत. मातृत्व त्यांच्या करिअरच्या, स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या मार्गात भिंत बनू नये, एवढेच तिचे म्हणणे आहे. मातृत्व ही केवळ महिलांची जबाबदारी असू नये. यामध्ये कुटुंब आणि समाजाचाही समान सहभाग असायला हवा. बदलाचा वेग मंदावला आहे, पण होत आहे. हा बदल स्वीकारण्याचा समाजाचा वेगही मंदावला आहे, पण तेही घडत आहे. त्यामुळे आशा कधीच सोडू नये.

● ● ● ● ●

# राजशिष्टाचाराचा उद्गाता



राजशिष्टाचार हा परराष्ट्र धोरणातील फार संवेदनशील घटक मानला जातो. तो अदृश्य स्वरुपात परराष्ट्र धोरणाला प्रभावित करत असतो. मुत्सद्देगिरीतील समीकरणे घडवण्याची आणि बिघडवण्याची ताकद या राजशिष्टाचारात असते.

संधी आणि आव्हाने यांचे संतुलन साधत विदेशी नेत्यांचा दौरा यशस्वीरीत्या पार पाडणे, तसेच कमी कालावधीत नेमकेपणाने आपल्या देशाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक सामर्थ्य दाखवण्याची जबाबदारी ही राजशिष्टाचार विभागाची असते. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला तेव्हा राजशिष्टाचाराचे महत्त्व अधोरेखित करण्याचे श्रेय मिर्झा राशिद अली बेग यांना जाते.

१८५९ मध्ये जन्मलेले बेग हे इंग्लंडच्या रॉयल मिलिटरी कॉलेजमधून पदवी प्राप्त करणाऱ्या पहिल्या भारतीय तुकडीचे पदवीधर होते. १९३० मध्ये लष्करी सेवेचा राजीनामा देऊन ते मोहम्मद अली जिनांचे स्वीय सहायक बनले. १९४२ मध्ये त्यांनी भारतीय विदेश सेवेत प्रवेश केला. आपल्या कारकिर्दीत त्यांनी गोवा, पॉंडेचेरी, थायलंड, फिलिपाइन्स आणि इराणमध्ये आपली सेवा बजावली.

परंतु, भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने १९५५ ते १९६१ या काळातील त्यांची कारकीर्द विशेष गाजली. या काळात ते भारतीय परराष्ट्र सेवेत राजशिष्टाचार विभागाचे प्रमुख होते. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने १९५० चे दशक अनेक अर्थाने ऐतिहासिक होते. पंतप्रधान पं. नेहरू यांनी जागतिक राजकारणात भारताचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी परदेशी पाहुण्यांना आमंत्रित करण्याचा धडाका लावला होता.

याचाच भाग म्हणून त्यांनी क्रुश्चेव्ह आणि बल्गॅनिन यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. जागतिक राजकारण आणि देशांतर्गत राजकारणाच्या दृष्टीने सोव्हिएत महासंघाचे असणारे महत्त्व पाहता त्यांना प्रभावित करणे गरजेचे होते. तसेच सोव्हिएत दौऱ्यात झालेल्या आपल्या अविस्मरणीय स्वागताच्या पार्श्वभूमीवर सोव्हिएत महासंघाच्या या दोन्ही नेत्यांचे अभूतपूर्व स्वागत व्हावे, अशी नेहरूंची इच्छा होती. ती इच्छा पूर्ण करण्याची जबाबदारी बेग यांच्यावर होती.

बेग यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान होते, ते म्हणजे ही भेट फक्त राजकीय न राहता भारतीय संस्कृतीचे दर्शन त्यातून घडले पाहिजे. भारताची सांस्कृतिक विविधता पाहता ही गोष्ट त्या काळी तितकी सोपी नव्हती.

बेग यांनी पत्नी तारा यांच्या सहाय्याने ही जबाबदारी लीलया पेलली. सोव्हिएत नेत्यांच्या स्वागतासाठी त्यांनी राष्ट्रपती भवनाची निवड केली. या स्वागत समारंभात बेग यांनी आदिवासी नृत्य आणि अभिजात भारतीय नृत्याच्या कार्यक्रमांचे आयोजन केले. हा बेग यांचा मास्टरस्ट्रोक होता.

मृणालिनी साराभाई यांनी तेवणाऱ्या हजारो दिव्यांच्या साक्षीने कार्यक्रमाला प्रारंभ केला, तेव्हा जमलेल्या समुदायाने सोव्हिएत नेत्यांना आपल्या घोषणांनी अक्षरशः मंत्रमुग्ध केले. पालम विमानतळापासून ते कॅनॉट प्लेसपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूचा जनसमुदाय भारत-सोव्हिएत मैत्री जणू काही बळकट करत होता. याच दौऱ्यात क्रुश्चेव्ह यांनी काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे हे ठणकावून सांगितले, हे विशेष.

इतकेच नव्हे, तर बेग यांनी सुरू केलेल्या तीन प्रथा आजही विदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी वापरल्या जातात. आता पाहुण्यांच्या आगमनावेळी जे दिमाखदार गालिचे अंथरलेले दिसतात, ते वापरण्याची सुरूवात बेग यांनीच केली. विदेशी नेत्यांच्या मागे जो त्यांच्या देशाचा झेंडा डौलाने फडकत असतो, ती नाविन्यपूर्ण कल्पनाही बेग यांचीच. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी तर बेग यांना खादीचे झेंडे बनवण्याची सूचना केली.

त्यावेळी खादीचा असणारा तुटवडा आणि पाहुण्यांची मांदियाळी यातून मार्ग काढत त्यांनी खादीच्या रुपात भारतीय झेंडा फडकवण्याची कामगिरी केली. बऱ्याचदा विदेशी पाहुण्यांच्या नावाचा नेमका उल्लेख करणे अवघड होते. त्यातून मानपानाचे प्रसंगही उद्भवतात. हे टाळण्यासाठी नेत्यांच्या समोर त्यांच्या नावाची पाटी लावण्याचे श्रेयही बेग यांचेच.

आपल्या कारकिर्दीत बेग यांनी दलाई लामा, आयसेन हॉवर, चाऊ-एन-लाय, हो ची-मिन्ह, राणी एलिझाबेथ (द्वितीय), घानाचे राष्ट्राध्यक्ष नक्रूमाह, गमाल अब्दुल नासीर, राजे सौद, इराणचे शाह, जपानचे राजपुत्र अकिहितो तसेच डेन्मार्क, स्वीडन आणि फिनलंडचे पंतप्रधान यांच्या स्वागत-आदरातिथ्याचे नेमके नियोजन करीत त्या त्या देशांबरोबरचे संबंध बळकट करण्याला मोठा हातभार लावला होता.

विदेशी नेत्यांच्या भव्य-दिव्य स्वागताची परंपरा अलीकडेच सुरू झाली असे मानणाऱ्या बहुसंख्य लोकांना बेग यांनी या प्रथेची सुरूवात केली होती, याची कल्पनाच नाही. जागतिक नेत्यांच्या स्वागत, आदरातिथ्य आणि मानपानातील एक छोटीशी चूकही संपूर्ण परराष्ट्र धोरणाचे संदर्भ बदलू शकते. अशा बिकट काळात बेग यांनी अतिथी देवो भवो या भारतीय संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करत भारतीय परराष्ट्र धोरणात बहुमूल्य योगदान दिले.

■ ■

# सलीम-जावेद जोडीचा कोरडा नॉस्टॅल्जिया

*जब तक बैठने को ना कहा जाये, शराफत से खडे रहो*
*कितने आदमी थे..?*
*मैं आज भी फेके हुए पैसे नहीं उठाता..*
*डॉन को पकडना मुश्किल ही नहीं, नामुमकीन हैं..*

हे डायलॉग कोणत्या सिनेमातील आहेत, असा प्रश्न करणं म्हणजे, तुम्हारा नाम क्या हैं बसंती? हे विचारण्यासारखं आहे. हिंदी फिल्म इंडस्ट्रीतील सिनेमे नायक-नायिकांच्या नावाने ओळखले जात होते, ओळखले जातात.

आजही असे मोजकेच दिग्दर्शक आहेत, ज्यांच्या नावावर सिनेमे बघितले जातात. सिनेमाची कथा-पटकथा-संवाद कोणी लिहिले आहेत, याबद्दल कोणीही चौकशी करत नसायचे. ज्यांच्या नावावर सिनेमे चालतात, त्यांनाच मुबलक पैसे मिळतात. त्यामुळं सिनेमांच्या टायटलमध्ये पटकथाकारांचे नाव ठळकपने दाखवले जात नव्हते. अशा काळात सलीम-जावेद यांनी पटकथा लिहिण्यास सुरूवात केली आणि सिनेमाच्या पोस्टरवर आपले नाव प्रामुख्याने दिसेल, अशा क्लुप्त्या केल्या. नेल्ला नेरम या तमिळ चित्रपटाचा हिंदी रिमेक हाथी मेरे साथी करताना या जोडीला संवाद लिहिण्याचे काम मिळाले. त्यानंतर सीता और गीता, जंजीर, यादो की बारात, हाथ की सफाई, मजबूर असे सिनेमे तीन वर्षांत रिलीज झाले आणि सलीम-जावेद यांचे नाव आदराने घेतले जाऊ लागले.

शोले आणि दीवार हे दोन सिनेमे एकाच वेळी शूट केले जात होते आणि एकाच वर्षात रिलीज झाले. त्यानंतर पटकथा लिहिण्यासाठी सलीम-जावेद यांनी पैसे किती मागितले असतील? अमिताभ बच्चन यांच्या मानधनापेक्षा जास्त पैसे मिळावेत, अशी मागणी त्यांनी केली आणि ती निर्मात्यांनी मान्य केली!

त्रिशूल, डॉन, काला पत्थरमुळे त्यांच्या यशाची कमान चढत गेली, तरी इमान धरम हा सिनेमा कोसळला. शोलेनंतर शानने भ्रमनिरास केला. शक्ती, क्रांती, मिस्टर इंडिया असे काही सिनेमे गाजले, पण तो पर्यंत सलीम-जावेद यांच्या लेखणीतील जादू ओसरली होती. हमखास



यशाचा फॉर्म्युला कुठेतरी हरवला होता. सलीम खान आणि जावेद अख्तर यांनी एकट्याने पटकथा लिहिलेले काही सिनेमे आले. सिलसिलापासून जावेद अख्तर यांनी गीतकार या नात्याने करिअर सुरू केले. या दोघांच्या पटकथा लेखनाबद्दल अनेक सिनेरसिकांच्या मनात प्रश्न आहेत, उत्सुकता आहे.

अशा सलीम-जावेद या द्वयीवर अँग्री यंग मेन ही तीन भागांची डॉक्युमेंटरी वेब सिरीज प्राइमवर नुकतीच रिलीज झाली आहे. या दोघांच्या पुढच्या पिढीने म्हणजेच सलमान-अरबाज-सोहेल खान, फरहान-झोया अख्तर निर्माण केलेली ही सिरीज बघताना नॉस्टॅल्जियाचा अनुभव येतो, कारण गाजलेल्या सिनेमांतील गाजलेले शॉट दिसतात.

सलीम खान आणि जावेद अख्तर (एकत्र न येता) त्यांच्या घरी त्या बद्दलच्या प्रश्नांना उत्तरे देतात. सलीम खान म्हणतात ते खरे आहे... गंगा जमुना, मदर इंडियाची पटकथा या सारखीच होती.. एक मुलगा गँगस्टर आणि एक पोलिस. यावर किमान २५ ते ३० सिनेमे असतीलही. कथा तीच असली, तरी पटकथा वेगळी होती. अभिनेता शरद सक्सेना म्हणतो, त्या काळी गॅस कनेक्शनसाठी ६ वर्षे लागायची, रेशन कार्डसाठी लाइन लावावी लागायची. सर्वसामान्य माणूस असंतुष्ट होता. ती आग भारताच्या प्रत्येक युवकामध्ये होती, तीच नस सलीम-जावेद यांनी नेमकी पकडली.

गाजलेल्या सिनेमांबद्दल अमिताभ-जया, शाहरुख-आमीर, फरहान-सलमान, शबाना-हेलन हे दोन-तीन मिनिटांचे बाईट देतात. पण, तीन भागांची वेब सिरीज बघितल्यावर सुनहरी यादें शिवाय प्रेक्षकांच्या हाती काहीच लागत नाही.

युवा पटकथा लेखक / लेखिका या डॉक्युमेंटरीकडे अभ्यासाच्या दृष्टिकोनातून बघू शकत नाहीत. कारण अँग्री यंग मेनमधील बराच वेळ सलीम आणि जावेद यांचे पूर्वीचे आणि आत्ताचे व्यक्तिगत जीवन दाखवण्यात गेला आहे. सलीम यांनी दोन विवाह कसे केले? दुसरी पत्नी त्यांच्या घरामध्ये कशी मिसळून गेली आहे? जावेद अख्तर यांची दुसरी पत्नी शबाना पहिल्या पत्नीबरोबर कसे जुळवून घेते? जावेद यांच्या मुलांनी शबानाला आपलेसे कसे केले? याबद्दल बराच खल केला गेला आहे, ज्याचा डॉक्युमेंटरीशी काही संबंध नाही.

शोले या उत्तम पटकथेनंतर तोच फॉर्म घेऊन शानची शहरातली पटकथा का लिहिली? त्यापेक्षा हटके काही का करावे वाटले नाही, शानमध्ये नेमके काय चुकले, यावर त्यात चर्चा होत नाही. पण एकूणच, पटकथाकारांच्या डॉक्युमेंटरीलाच पटकथा नाही, हीच या सिरीजची सगळ्यात मोठी उणीव आहे. कोणताही नवा पटकथाकार ही डॉक्युमेंटरी बघून काहीच शिकू शकणार नाही. ■ ■ ■



# लोकनायक, लोकसखा गणपती

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे

गणपती हा कलाधिपती असल्यामुळे त्याचे अस्तित्व प्रत्येक लोककलेत पाहायला मिळते. किंबहुना गणांचा - कलांचा अधिपती असतानाही गणपती इतकी सर्वव्यापी देवता दुसरी कुठली नाही. म्हणून तर विविध रुपांत, रंगात-ढंगात त्याला पाहता येतं. आपल्या लोककलावंतांनी गणेशाच्या या रूपातील लवचिकतेचा अन् व्यापकतेचा वापर आपल्या कलेत मोठ्या प्रमाणात केला आहे.

गणेशोत्सव आला की साऱ्या महाराष्ट्रातील, देशभरातील लोकांच्या आनंदाला उधाण येते. कारण गणेश गणनायक-लोकनायक आहे, तसा तो लोकसखाही आहे. तो विद्येची आणि कलांची देवता आहे. भगवान गणेशाच्या वेदप्रामाण्यवादी रूपापेक्षा त्याचे लोकमानसातील हे रूप अधिक लोभसवाणे आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी...

*ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या॥*
*जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥१॥*
*देवा तूंचि गणेशु। सकळ मति प्रकाशु॥*
*म्हणे निवृत्ति दासु। अवधारिजो जी॥२॥*

अशा शब्दांत गणेशाचा धावा केला आहे. हे गणेशाचे रूप सकळ मति प्रकाशु असे आहे. आपल्या संस्कृतीत भगवान श्रीकृष्णाप्रमाणे भगवान गणेशालाही लोकसखा मानले आहे. असा विघ्नहर गणेश ही मूळची यक्षकुळातील देवता. एका बाजूला या देवतेचे आर्य संस्कृतीतील वेदप्रामाण्यवादी रूप म्हणजे गणेश, तर दुसऱ्या बाजूला द्रविड संस्कृतीतील दंडनायक किंवा क्षेत्रपाल देव हे रूप.

आपल्या राजकीय, सामाजिक व्यवस्थेत एकेकाळी लोकनायक म्हणून नेतृत्व करणाऱ्यांचा सकारात्मक विचार व्हायचा. पण, अलीकडे अशा लोकनायक रुपातील गणेशाचे उत्सव साजरे करणारी मंडळी मात्र दंडनायक म्हणून पुढे येत असल्याचे दिसते. खरे तर समाजाला त्यांचे हे रूप अपेक्षित नाही, तर त्या ऐवजी क्षेत्रपालाचे, म्हणजे आपल्या भूमीच्या, लोकांच्या रक्षणकर्त्याचे रुप अभिप्रेत आहे.

**लोककलेतील लोभस रुपे**

आपल्या विविध साहित्य प्रकारांतून त्याची अगदी गौरीचा बालक यापासून ते सिंदूर राक्षसाचा वध करणारा गणेश ही वेगवेगळी रूपे लोकमानसात स्थिरावली आहेत. त्याचे दैवी रूप आणि लोकसखा म्हणून लौकिक रूप सर्वांना हवेहवेसे वाटते. क्षेत्रपाल देवतांचे परिमंडल लोकसंस्कृतीत स्थिरावले. त्याचे नेतृत्व खऱ्या अर्थी भगवान गणेशाने केले.

त्यामुळे कीर्तन, भारुड, भजन, दशावतार, गोंधळ, जागरण इतकेच काय; तमाशा, खडीगंमत यांसारख्या रंजनप्रकारांमध्येही कुठे संकीर्तन म्हणून, तर कुठे प्रत्यक्ष दर्शन म्हणून गणेशाचे आगमन होते. लोककलेतील या लोकनायक, लोकसखा गणेशाची रूपे खूप वेधक आणि तितकीच आश्वासक आहेत. गणेश ही कलेची देवता. तो लोककलांचा अधिपतीही आहे. लोककलावंतांनी कलेच्या सादरीकरणात विघ्ने येऊ नयेत म्हणून विघ्नहर्त्याची पूजा बांधली.

त्यामुळे कधी तो केवळ संकीर्तन रुपात, तर कधी साक्षात नाट्यरूपात भेटतो. त्याचे हे संकीर्तनरुप आणि नाट्यरूप लोककलांमध्ये कधी रांगड्या, तर कधी प्रासादिक रुपात सादर होते. गणांतील गणपती हा कधी बालरूपात, कधी सकल कलांचा अधिपती, तर कधी विघ्नविनाशक अशा स्वरूपात प्रगटतो. लोककलेतील गणेशाची ही रूपे खरोखरच लोभसवाणी आहेत.

**संकीर्तनच नव्हे, तर नर्तनही...**

पूर्वी गणेशोत्सवात नमन, खेळे, जाखडी, दशावतार, भारुड, मेळे सादर व्हायचे. जागरण, गोंधळ, भराड आदी विधिनाट्ये ही सर्व लोककलांच्या प्रारंभीची नाट्ये होत. या नाट्यांमध्ये आणि कलगी-तुऱ्यामध्येही गणेशाचे वंदन असते. कोकणातील रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांत नमन-खेळे, जाखडी या कलाप्रकारांत गणेशाचे फक्त संकीर्तनच नव्हे, तर नर्तनही असते.

ठाणे-पालघर जिल्ह्यांत बोहाड्याची परंपरा आहे. या बोहाड्यात टेंब्यांच्या प्रकाशात गणपती नाचत येतो. रात्रभर हे बोहाडे रंगतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गंगावणे आणि मसगे या ठाकर समाजातील लोककलावंतांनी कळसूत्री बाहुल्या आणि चित्रकथी परंपरेद्वारे गणेशाचे दर्शन घडवले आहे. सूत्रधार, भटजी, गणपती, सरस्वती, रिद्धी-सिद्धी यांच्या चित्रांच्या पोथ्या दाखवीत चित्रकथी गणपतीचे संकीर्तन करतो. तर, कळसूत्रीच्या खेळातही गणपती बाहुलीच्या रुपात दर्शन देतो.

**कलगी-तुऱ्यातील नाट्यमय सूचन**

भेदिकाद्वारे आध्यात्मिक कुटे सादर करणारे कलगीपक्ष, तुरापक्षाचे शाहीर गणाच्या उत्पत्तीसंबंधी परस्परांना कूट प्रश्न विचारीत असत. पठ्ठे बापूराव आणि भाऊ फक्कड यांच्या गणांवरून हे स्पष्ट होते.

गणपती ही यक्षकुळातील देवता असल्याचे भाऊ फक्कड यांना ज्ञात होते. गणांची निर्मिती करताना त्याद्वारे परस्परांना आव्हान देण्याचा गानप्रकार म्हणूनही या रचनाकारांनी गणांचे उपयोजन केले. पठ्ठे बापूरावांचा हा गण पाहा...

*लवकर यावे सिद्ध गणेशा*
*आतमधी कीर्तन वरूनी तमाशा।।*
*माझा भरवसा तुम्हावरी खासा*
*विघ्न पिटविशी दाही दिशा।।*
*झेंडा मिरवशी आकाश पाताळी*
*वैरी करीती खाली मिशा।।*
*पठ्ठे बापूराव कवींच्या कवनी*
*बाजार बुणग्याचा झाला हशा।।*

पठ्ठे बापूराव हे कलगीपक्षाचे शाहीर होते. त्यांनी या गणातून, तुरेवाल्या शाहिरांना भेदिकाच्या लढतीत नामुष्की पत्करावी लागेल, असे एकप्रकारे आव्हानच दिले आहे. अशा रीतीने गणांच्या निर्मितीतही कलगी-तुरा संघर्षाचे नाट्यमय सूचन झालेलं आहे.

जागरणासारख्या विधिनाट्यातून गण सादर होताना भेदिकांच्या लढतीचे स्वरूप नसते. गणपतीचे संकीर्तन एवढाच मर्यादित हेतू त्यात असतो.

**गणांमधील विविध रूपे**

गणांतील गणपती हा कधी बालरूपात, कधी विद्येचा अधिपती, कधी सकल कलांचा अधिपती, तर कधी विघ्नविनाशक अशा स्वरूपात येतो. या गौरीनंदन अशा गणपतीचे शंकरराव जाधव - धामणीकर यांनी जागरणात शब्दबद्ध केलेले रूप पाहा...

आज वंदन करितो गौरीनंदन
*नवविध विद्या करितो भक्ती। भक्तासी द्यावी मुक्ती*
*हीच आमुची सर्व शक्ती लावितो पणा।।१।।*
*चौदा विद्येचा गणपती। चौसष्ट कला तुझे हाती*
*बालकासी द्यावी स्फूर्ती। गावचा गुणा ।।२।।*

**विधिनाट्यातील गणांचे आशयसूत्र**

जागरण या विधिनाट्यात सादर होणारे गण पाहता या गणांच्या सादरीकरणामागे जे आशयसूत्र दिसते ते असे... १) कार्यारंभी आशीर्वचन प्राप्तीसाठी गणाचे वंदन करावे.

२) कलेच्या प्रारंभीच सकल कलांच्या या देवतेकडून रंगऊर्जा घ्यावी.

३) अरिष्टांचे निवारण होण्यासाठी गणपतीचा धावा करावा. ही अरिष्टे दोन प्रकारची असतात. भौतिक पातळीवरची आणि अधिभौतिक पातळीवरची. भौतिक अरिष्टे म्हणजे आर्थिक आपत्ती, रोगराई आदी. अधिभौतिक अरिष्टे म्हणजे काम, क्रोध आदींपासून अभय प्राप्त व्हावे म्हणून गण सादर करणे.

४) गणातून गणाहृशी संवाद. गण म्हणजे व्यक्तींचा समूह. या समूहाशी आणि प्रत्यक्ष गणपतीशी संवाद साधण्याचा प्रयत्न या गणांद्वारे होत असतो. शंकराची आराधना, खंडोबाची आराधना आणि गण यानंतर जागरणात इष्ट देवतांना पाचारण केले जाते, ते पदरूप आवाहनाच्या रूपाने गोंधळातही असेच गण सादर होतात.

**भक्तिनाट्यातील आराधना**

भारुड या भक्तिनाट्याचा प्रारंभही मुळात गणेश स्तवनाने होतो. ह्यविठ्ठल, गणपती दुजा नाही..ह्व ही संतांची भावना भक्तांमध्येही अवतरलेली असते. लालबाग, परळ, माझगाव, भायखळा या परिसरांमध्ये एकेकाळी भारुडी भजन मंडळी होती.

प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर तालुक्यांतील मंडळे ही भारुडे सादर करायची. भारुड, दशावतार, लळीत ही तिन्ही भक्तिनाट्ये. त्यामुळे त्यामध्ये गणपती, रिद्धी - सिद्धीचे सोंग हमखास असते. अशाच एका भारुडातील गण असा...

*तुज नमो नमो ओमकार स्वरूपा।*
*ओमकार स्वरूपा नमो नमो।।*
*ओमकार स्वरूपा। सद्गुरू समर्था*
*अनाथांच्या नाथा। तुज नमो।।*

गणपती हा कलाधिपती असल्यामुळे त्याचं अस्तित्व प्रत्येक लोककलेत पाहायला मिळते. किंबहुना गणांचा-कलांचा अधिपती असतानाही गणपती इतकी सर्वव्यापी देवता दुसरी कुठली नाही. म्हणून तर विविध रुपांत, रंगात-ढंगात त्याला पाहता येतं.

आपल्या लोककलावंतांनी गणेशाच्या या रूपातील लवचिकतेचा अन् व्यापकतेचा वापर आपल्या कलेत मोठ्या प्रमाणात केला आहे. या कलांचे केवळ सादरीकरणच नव्हे, तर सातत्यपूर्ण जतन आणि संवर्धन करणे, हीच गणरायाची आराधना मानली पाहिजे.

● ● ●

# !! अष्टविनायक !!

अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते.महाराष्ट्रातील या विशिष्ट ह्यआठह्न ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून ह्यअष्टविनायकह्न म्हणले जाते. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत. गणपती ही विद्येची देवता असून तो, सुखकर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.

श्री गणेशाच्या अनेक प्रतिमा (मूर्ती) तयार केल्या गेल्या परंतु दगडावर कोरीवकाम करून निर्माण केलेल्या प्राचीन मूर्तींचा शोध ज्या ठिकाणी लागला, तसेच जेथे स्वयंभू प्राचीनतम मूर्ती सापडल्या अशा स्थळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. याच मंदिरांना अष्टविनायकांची मंदिरे समजले जाते. महाराष्ट्रातील असंख्य भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविनायक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्ह्यात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्ह्यात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्ह्यात एक (सिद्धटेक) या ठिकाणी अष्टविनायक स्थाने आहेत. या गणपतींपैकी महड, सिद्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे.



## मोरगांव

अष्टविनायकांपैकी पहिला गणपती हा मोरगावचा मोरेश्वर गाणपत्य संप्रदायाचे हे महत्त्वाचे स्थान आहे. या गणपतीस श्री मयुरेश्वर असेही म्हणतात.

थोर गणेशभक्त श्री मोरया गोसावी महाराज यांनी श्री मयुरेश्वराची प्रचंड प्रमाणात भक्ती केली होती. त्यामुळे त्याने श्री मोरयाना हे मोरया, मी तुज्या भक्तीने प्रसन्न झालो आहे. मी तुला वरदान देतो की भविष्यात माझ्या नावापुढे लोक तुझे नाव घेऊन जयघोष करतील असा आशीर्वाद दिला. तेव्हा पासून, मंगलमूर्ती मोरया हा जयघोष प्रचलित झाला असे म्हणले जाते.

श्री मोरेश्वर गणेशाचे, हे स्वयंभू व आद्यस्थान आहे. प्रत्येक घरात म्हटली जाणारी सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती श्री समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली, असे म्हणले जाते.

जवळच कऱ्हा ही नदी आहे. मंदिरावर अनेक प्रकारचे नक्षीकाम केलेले आहे. श्री मोरेश्वराच्या डोळ्यांत व बेंबीत हिरे बसवलेले आहेत. या मंदिराच्या भोवती बुरूजसदृश दगडी बांधकाम प्राचीन काळापासून आहे.

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात मोरगांव हे ठिकाण आहे. मोरगाव हेरावर आहे. तर बारामतीपासून ३५ कि. मी. अंतरावर आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा हा मोरगावपासून अगदी १७ कि. मी. अंतरावर आहे. या तीनही ठिकाणांपासून मोरगांवला जाण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीची सोय आहे. मोरगाव गणेश मंदिर हे आदिलशाही काळात पराक्रमी सुभेदार गोळे यांनी बांधले आहे.



## थेऊर

अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंतामणी हा दुसरा गणपती आहे. चिंचवडचे सत्पुरुष श्री चिंतामणि महाराज देव यांनी सुमारें ४०,००० रु. खर्चून हैं गणमतिमंदिर बांधले. चिंचवडकर श्री नारायण महाराज तथा श्रीधरणीधर महाराज यांच्या काळात या वैभवात भर घालण्यात आली आहे. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनीं थोरले माधवराव पेशवे यांनी देवालयाचा सागवानी लाकडाचा घडवलेला भव्य सभामंडप श्रीचरणी समर्पित केला व देवळाचा विस्तार वाढविला.

त्यानंतर हरीपंत फडके यांनी व इतर अनेक भक्तांनी या देवालयांची शोभा व भव्यता वाढविली आहे. श्री मंदिराला पेशवेकालीन भव्य तटबंदी असून त्यात प्रशस्त ओवऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत. पुण्यातील पेशव्यांच्या घरातील अनेक जण थेऊरला सतत येत असत. पेशवे घराणे खूप मोठे गणेशभक्त होते. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला. माधवराव पेशव्यांचे निधन थेऊरलाच झाले. यांच्याबरोबर सती गेलेल्या रमाबाई यांची समाधीदेखील या ठिकाणी आहे. श्रीचिंतामणींची मूर्ती भव्य, पूर्वाभिमुख व डाव्या सोंडेची आहे. मूर्ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत आहे. श्री मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उत्तरमुखी असून श्री चिंतामणीचा विग्रह पूर्वाभिमुखी आहे. देवालयाचा महादरवाजा उत्तरेकडे तोंड करून आहे. मुख्य मंदिराच्या बाहेर तीन बाजूंना तीन कोनाड्यात तीन छोट्या मूर्ती आहेत. उत्तर दिशेला दक्षिणमुखी हनुमान स्थापित आहेत.

श्री चिंतामणीच्या पाठीशी पश्चिमेला असणाऱ्या गणेशांना लंबोदर गणेश अशी संज्ञा आहे. श्री मुद्गल पुराणात पश्चिम दिशेची देवता म्हणून श्री लम्बोदरांचे वर्णन आहे. तर उत्तर दिशेला उत्तरेश्वर नावाच्या गणेशाची स्थापना केली आहे. मंदिरात प्रवेश करताच लक्ष वेधून घेणाऱ्या विशाल दीपमाला दिमाखात उभ्या आहेत. श्री चिमाजीअप्पा यांनी वसईच्या विजयाच्या वेळी पोतुर्गीजां कडून हस्तगत केलेली विशाल घंटा श्रीचिंतामणींच्या प्रांगणाचे एक विशेष आकर्षण आहे.

ज्या स्थानी कपिल महर्षींनी श्री चिंतामणींना त्यांचे चिंतामणी रत्न परत केले. त्या स्थानी कदंब वृक्ष नावाने आजही भव्य वृक्ष पाहायला मिळतो. थेऊर पुणे-सोलापूर महामार्गाला जोडलेल्या रस्त्यावर, तालुक्यात असून पुण्यापासून हे ३० कि. मी. अंतरावर आहे. पुण्यापासून बसेसची सोय आहे.



## सिद्धटेक

सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक हा अष्टविनायकांपैकी तिसरा गणपती. उजवी सोंड असणारा एकमेव अष्टविनायक.हे भीमा नदीवर वसलेले सिद्धिविनायकाचे स्वयंभू स्थान आहे.

हे मंदिर अहिल्याबाई होळकरांनी बांधले आहे. मंदिरात आत जातांना डाव्या बाजूला शंकर, विष्णू, सूर्य, गणपती, आदिमाया असे पंचायतन आहे. श्रींचे मंदिर उत्तराभिमुख आहे. श्री सिद्धिविनायकाची मूर्ती स्वयंभू आहे. गाभारा १५ फूट उंच व १० फूट रूंद आहे. श्री सिद्धिविनायकाच्या भोवती चांदीचे मखर आहे. श्रींच्या डाव्या उजव्या बाजूला जय विजयाच्या मोठ्?या मूर्ती आहेत. सिंहासन दगडी आहे. मधल्या गाभाऱ्यात देवाचे शेजघर आहे. सभामंडपाच्या पुढे महाद्वार आहे. त्यावर नगारखाना आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात हे ठिकाण असून दौंडपासून १९ कि. मी. अंतरावर आहे. तर राशिनपासून २३ कि. मी. अंतरावर आहे.

राशीन येथे पण जगदंबा देवी चे प्रसिद्ध मंदिर आहे आणि येथे जगप्रसिद्ध दगडाच्या हलत्या दीपमाळा प्रसिद्ध आहे.दौंडहून गेल्यास वाटेत भीमा नदी लागते, ती ओलांडायला होड्या असतं मात्र सध्या पूल झाला आहे.



## रांजनगाव

अष्टविनायकांपैकी हा चौथा गणपती. या गणपतीला महागणपती असे म्हणतात. हे महागणपतीचे स्वयंभू स्थान आहे. पुणे-अहमदनगर मार्गावर शिरूर तालुक्यात हे ठिकाण आहे.

या स्थानासंदर्भात एक दंतकथा आहे ती अशी की, त्रिपुरासुर या दैत्यास शिवशंकरांनी काही शक्ती प्रदान केल्या होत्या. या शक्तीचा दुरूपयोग करून त्रिपुरासुर स्वर्गलोक व पृथ्वीलोक येथील लोकांना त्रास देऊ लागला. शेवटी एक वेळ अशी आली की, शिवशंकराला श्री गणेशाचे नमन करून त्रिपुरासुराचा वध करावा लागला. म्हणून या गणेशाला त्रिपुरारिवदे महागणपती असेही म्हणले जाते.

अष्टविनायकांपैकी सर्वाधिक शक्तिमान असे महागणपतीचे रूप आहे. श्री महागणपती उजव्या सोंडेचा असून गणेशाला कमळाचे आसन आहे. माधवराव पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे इतिहासात आढळते.

इंदूरचे सरदार किबे यांनीदेखील या मंदिराचे नूतनीकरण केल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी या देवळातला लाकडी सभामंडप बांधून दिला आहे. हे श्री महागणपतीचे स्थान इ.स. १० व्या शतकातील आहे. श्री गणेशाला दहा हात आहेत आणि प्रसन्न व मनमोहक अशी श्रींची मूर्ती पाहायला मिळते.




## ओझर

ओझरचा विघ्नेश्वर हा अष्टविनायकांपैकी पाचवा गणपती आहे. येथील श्रींची मूर्ती लांब रूंद असून अष्टविनायकांपैकी सर्वात श्रीमंत गणपती म्हणून श्री विघ्नेश्वराला ओळखले जाते. श्रींच्या डोळ्यात माणिक असून, कपाळावर हिरा आहे. अशी प्रसन्न व मंगल मूर्ती असलेला श्रीगणेश विघ्नांचे हरण करतो, म्हणून या गणपतीला विघ्नेश्वर म्हणतात. ही गणेशाची स्वयंभू मूर्ती आहे.

मंदिराच्या चारही बाजूंना तटबंदी-बांधकाम असून, मध्यभागी गणेशाचे मंदिर आहे. कुकडी नदीच्या तीरावर असलेले हे मंदिर एक जागृत स्थान आहे. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो.

मंदिराच्या परिसरात भाविकांना राहण्यासाठी धर्मशाळेची उत्तम व्यवस्था करण्यात आलेली आहे. जुन्नर तालुक्यातील हे स्थान लेण्याद्रीपासून १४ कि. मी. वर तर पुण्यापासून ८५ कि. मी. अंतरावर आहे. येथून जवळच आर्वी उपग्रह केंद्र व खोडद येथील आशिया खंडातील सर्वात मोठी इलेक्ट्रॉनिक दुर्बिण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला हादेखील जवळच आहे.



## लेण्याद्री

अष्टविनायकांपैकी सहावा गणपती लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज. किल्ले शिवनेरीच्या सान्निध्यात, जुन्नर तालुक्यातील प्राचीन जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात डोंगरावर श्री गिरिजात्मज गणेशाचे हे स्वयंभू स्थान आहे.

श्री गणेशाची प्रसन्न मूर्ती असून ती दगडामध्ये कोरलेली आहे. मंदिर परिसरातील खडकामध्ये कोरीवकाम, खोदकाम केलेले आहे. पेशवे काळात या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता.

मंदिरात दगडी खांब आहेत व त्यावर वाघ, सिंह, हत्ती असे सुंदर नक्षीकाम केलेले आहे. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत. लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज हा जुन्नरपासून ७ कि.मी. अंतरावर आहे, तर पुण्यापासून सुमारे ९७ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे.



## महड

महडचा वरदविनायक हा अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे. हे स्वयंभू स्थान असून त्याला मठ असेही म्हणतात. श्री वरदविनायकाचे मंदिर साधे, कौलारू असून मंदिराला घुमट आहे व त्याला सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे.

या मंदिरासंदर्भात एक कथा प्रसिद्ध आहे. एका भक्ताला स्वप्नात देवळाच्या मागील तळ्यात पाण्यात पडलेली मूर्ती दिसली. त्याप्रमाणे त्या व्यक्तीने शोध घेतला व मूर्ती मिळाली. तीच या मंदिरातील प्रतिष्ठापना केलेली मूर्ती होय.

मंदिरात दगडी महिरप असून गणेशाची मूर्ती सिंहासनारूढ आहे व उजव्या सोंडेची आहे. इ.स. १७२५ मध्ये पेशवे काळात हे मंदिर बांधले गेले. रायगड जिल्ह्यातील महड हे पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर खोपोली - खालापूरच्या दरम्यान आहे.



## पाली

पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे. या गणपतीला श्री बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचे हे स्वयंभू स्थान आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. गणेशाचे कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत. मंदिर चिरेबंदी आहे. मंदिरात प्रचंड घंटा असून ती चिमाजी अप्पांनी अर्पण केली आहे.

हे स्थान रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात असून, सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबा नदीच्या निसर्गरम्य सान्निध्यात बल्लाळेश्वराचे मंदिर वसले आहे. पालीपासून जवळच उन्हेरचे गरम पाण्याचे झरे व सरसगड हा प्राचीन किल्ला आहे. पाली खोपोलीपासून ३८ कि. मी. अंतरावर आहे तर पुण्यापासून १११ कि. मी. अंतरावर आहे. खोपोली - पेण रस्त्यावर पालीस जाण्यास रस्ता फुटतो, तर पनवेल - गोवा या राष्ट्रीय महामार्गावर वाकणपासून पालीस रस्ता जातो.

भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला या आठही ठिकाणी यात्रा भरते. सर्व जाती-धमार्चे लोक या ठिकाणी येऊन श्रद्धापूर्वक दर्शन घेतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या काळात श्री गणेशाचा उत्सव सर्वत्र साजरा केला जातो.